सालअखेर ,, ७ ,, ३०८
किरकोळ अंकास ................. ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.... ०३०६
दुसरे खेपेस ........ ०१

Single copy........................... 4 as.

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines...2 Rs.
per line over 10...4 as
Repetition perline 3 as

THE BERAR SAMACHAR

VOL XXVIII AKOLA MONDAY 3 DECEMBER 1894 NO. 47

वर्ष ८ आकोला सोमवार तारीख ३ माहे डिसेंबर सन १८९४ इ० अंक ४७

चार तास होऊन गेले आतां
आशा सोडा.

अरे देवा! मी तीन चार तास व्यर्थ घालविले ते जर परत आणता आले असते तर किती मजा झाली असती. पहा! एका क्षणांत मनुष्यावर किती संकटें येऊन पडतात!!

मिस्तर जेम्स कार्टीस आणि मिस्तर सी. एस बेनेट हे दोघेजण पुष्कळ वर्षें अगदीं जिवलग मित्र होते. तें स्थान फ्रानासिसको शहरांत राहत असत. गेल्या उन्हाळ्यांत पहिल्याच वेळेस एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढून बरेंच भांडले. सुविचार मनांत आले व पुन्हां त्यांची गट्टी जमली परंतु एकदां घडी बिघडली ती बिघडली. विचार दोघींनी आपल्या स्मरणवहींत टिपून ठेविले होते. तें एकमेकांपासून अलग राहण्याबद्दल खबरदारी घेत होते. ह्या द्वयांची गांठ एका रस्त्यांत पडली. पुन्हां भांडण सुरू झालें. कार्टीसच्या मुखांतून फारच कठोर व काळजाला झोंबण्या सारखे शब्द निघाले आणि त्यानें रागाच्या सपाट्यांत पिस्तुल काढली व बेनेटवर झाडून त्यास लागलीच राम ह्मणावयास लावलें. पुढें हा तो स्वनिंदेनें व दुःखानें नाहक गेल्यामुळें वाऱ्याच्या सारख्याच लाखो रुपया वाहत असे.

हें पहा असें वागणें किती निरर्थक, कुचकामाचें व दांभिक आहे बरें!

परंतु कार्टीस ह्मणत असे कीं एका क्षणांत मनुष्यावर कोणतीं संकटें येतील ह्याचा नेम नाहीं. असें आपणास क्षणभर खरें वाटतें परतु ह्या पेक्षां दुसरा अगदीं खोल विचार आहे तो कोणाच्या ध्यानांत येतो! ह्या संकटाचें खरें स्वरूप समजलें नाहीं तर कांहीं चिंता नाहीं. तर ह्याच मुद्यावर दुसऱ्या एका गोष्टीचा विचार करूं.

एक सुज्ञ बाई ह्मणते कीं सन १८६० साली अक्टोबर महिन्यांत मला असा ज्वर जडला होता कीं त्यांतून मी वाचेन असें मला वाटत नव्हतें. माझ्या शरिरांत सर्व ठिकाणीं वेदना होऊं लागल्या व खोकल्यानें मला इतकें जर्जर करून टाकलें कीं माझ्या शरिराचा भेंदा बेंदा होतो कीं काय असें मला वाटलें. मी बिछान्यांत पडून राही परंतु रात्रंदिवस झोंप ह्मणाल तर देवाचें नांव! माझ्यानें उठून बसवत नसल्यामुळें मला चमच्यानें अन्नरस माझ्या तोंडांत वाढीत असत. माझी छाती इतकी धडधडत असे कीं ती उशीवर तुह्मांस साफ पाहिलें असता दिसून येईल.

आणि वेदना इतक्या जालीम होत होत्या कीं जसे कोणी मला भोंसकत आहे. मी अशी पंगु होऊन अंथरुणाशीं खिळून राहिलें व मला दम बरोबर घेतां येईना. वैद्य बोवा आह्मास सतत एक महिनाभर औषधोपचार करीत होते. परंतु दिवसानुदिवस क्षीण होत चाललें. कधीं कधीं रात्रीं माझी अशी गाळण होऊन जाई कीं सकाळपर्यंत मी जगेन किंवा नाहीं ह्याची मला शंका वाटत असे. त्यांनीं आपल्या दुसऱ्या वैद्याची सल्ला मसलत घेऊन असें ठरविलें कीं हा रोग बरा होणें कठिण आहे. मला तकवा आणण्यास थोडीशी दारू पाजीत असत. माझे यजमान व मुलगी नेहमीं माझ्या जवळ असत. कोणत्याही औषधापासून मला काडी इतका गुण ह्मणून आला नाहीं. मी आतां यमसदनीं जाणार असें मला वाटूं लागलें.

अशा वेळीं प्लिपथ जवळच्या मोटली गांवांतील मिसीस किर्लींग माझी मैत्रिण होती ती धांवून आली व मला मदर सिजेलचा क्युरेटिव सिरप (ह्मणजे माता सिजेलचा रोगहारक पाक) घेण्यास गळ घातली. मी लागलीच एक बाटली पैदा करवून औषध घेण्यास सुरू केलें. थोड्याच दिवसांनीं मला अन्न घेतां येऊन पचविण्याची शक्ती आली आणि वाईट लक्षणें कमी होत चाललीं. ह्या वरून असें दिसून येतें कीं ज्या उपाधीनें हिच्या शरिरांत आपला पूर्ण अमल बसवून इतक्या शिखरास पोंचविला होता कीं तिच्या आयुष्याची दोरी तुटण्याची वेळ जवळ येऊन ठेपली. आपल्याला उपाधि समजो व न समजो, परिणाम असाच व्हावयाचा. कार्टीसनें जो अपराध केला होता त्याचें मुख्य कारण त्याचें एकदम रागावणें व त्या भरांत धिःकार व सूड घेण्याच्या विचारास उत्तेजन देणें व मग असल्या दुष्ट हेतूस स्वाधीन होऊन अशा प्रकारचे खून करण्यास तयार होणें हें होय. ह्याचप्रमाणें ह्या बाईच्या रागाची उपाधि ह्मटली असतां अग्निमांद्य व अजीर्ण होय. कीं जी अखेरीस बेकाम होऊन जिवास धका बसविण्यास कारणीभूत झाली ह्याचें सार म्हणाल तर एकच. अरिष्टाची टेहळणी प्रारंभींच करावी व पुढें वाढूं देऊं नये म्हणजे तें अरिष्ट आपल्या आटोक्यांत सहज ठेवतां येतें.

ह्या औषधीच्या सहा बाटल्यांचा फन्ना केल्यावर माझी तब्येत पूर्ण ताळ्यावर आली आणि तीस वर्षांपूर्वी पेक्षां मला आतां हजार हिशानें बरें वाटत आहे. माझ्या दोन मुली पण अजीर्णा पासून त्रासल्या होत्या. त्या ह्या औषधानेंच बऱ्या झाल्या. मला कोणी विचारतील त्यास मी मोठ्या आनंदानें सांगेन.

(सही) मिसिस लुई ज्याकसन
बिलडर्स आर्मिस होटेल
बिजरोड, ह्यामरस्मिथ, लंडन
तारीख १४ माहे जानेवारी
सन १८९२

वर लिहिलेल्या ओळी ज्या पत्राचें सार आहे त्यांत मिसिस जानसन बाई असें प्रदर्शित करते कीं सन १८६० च्या आक्टोबरांत जें दुखणें लागलें होतें त्याच्या वीस वर्षां पूर्वी तिचे पित्ताशय व पक्वाशय बिघडले होते. तिच्या तोंडाची रुची बिघडून गेली होती. आणि थोडें जरी खालें तथापि तिच्या पोटांत कळा मारीत. तिला थकल्यासारखें व गळून गेल्यासारखें आणि उदास झाल्यासारखें वाटे आणि पोट अगदीं खोल गेल्यासारखें वाटल्यामुळें तिला फारच वाईट वाटे. तिच्या छातींत, बरगड्यांत तीव्र वेदना होत, छाती धडधड होई, घेरी येई व वारंवार रस्त्यांत पडे व तिला घरीं कोणी तरी उचलून आणीत. F. L.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफीकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

( वर्ग १९ ) दि. की. मि. नंबर $\frac{२०}{१८९४}$

दिपुटी कामिशनर साहेब जिल्हा इलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव हिंदपाल व गणपत

बापाचें नांव तेजी आहीर अ० पा० आई रुखमी मर्द तेजी

राहणार कातखेड तालुके दर्यापूर

जिल्हा इलिचपूर यास मयत.

तेजी बापाचें नांव धवलाल राहणार कातखेड तालुके दर्यापूर जिल्हा इलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याच मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांणीं तारीख १९ माहे दिसेंबर सन १८९४ इसवी रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल त्य वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी. तारीख १९ माहे नोवेंबर सन १८९४ इ०

C. E. Biddulph
Offg. Deputy Commissioner
डिस्ट्रिक्ट जडज्य. इलिचपूर.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसुल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

दि० कि० मु० नंबर $\frac{२०}{१८९४}$

वर्ग १९

सन १८८९ चा आक्ट नंबर ७ प्रमाणें

विद्यमान डिपुटी कमिशनर साहेब जिल्हे इलिचपुर यांचे कोर्टांत.

नांव किसनलाल

बापाचे नांव सिताराम मारवाडी

राहणार ब्राह्मणवाडा थडी तालुके इलिचपूर.

जिल्हे इलिचपूर यांस मयत.

रुपा बाई जवजे छोटमल मारवाडी राहणार ब्राह्मणवाडा थडी तालुके एलिचपूर जिल्हे येलिचपुर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहुं अर्जदार याणें अर्ज केला आहे त्याजकरितां सदर्हू मयत मनुष्याचे माल मिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्याणीं तारीख १९ माहे दिसेंबर सन १८९४ इसवी रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल. त्या वेळीं या कोर्टात हजर होऊन आपआपले हक्का विषयीं लेखी हकिकत दाखल करावी. तारीख २० माहे नोवेंबर सन १८९४ इसवी.

C. E. Biddulph
Offg. Deputy Commissioner.
Ellichpur District.
डि० जडज्य
इलिचपुर.

---

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष शुद्ध ६ शके १८१६

## हिंदुस्थानांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार.

सर ए. मेन आपल्या "व्हिलेज कम्युनिटीस इस्ट अँड वेस्ट" यांत असें ह्मणतात कीं "इंग्रज लोकांनीं हिंदुस्थान जिंकून आपल्या हस्तगत केल्यावर त्यांत चालू केलेली राज्य व्यवस्था अशी आहे. कीं तिजमुळें सर्व पृथ्वींतील लोकांचें मत इंग्लंड विषयीं चांगलें झालें आहे." शिवाय ते असें ही ह्मणतात कीं "हिंदुस्थान देशाची सत्ता इंग्रज लोकाच्या हातीं अगदीं अकल्पित रीतीनें आली. पण इतर देशचे लोक असें समजत नाहीं." परंतु ह्या देशांतील इतिहास व इंग्रज सरकारची हल्लींची राज्यव्यवस्था ह्या वरून वर सांगितलेल्या ह्मणण्यांत कोणतें खरें हें लोकांच्या लक्षांत लागलीच येण्या जोगें आहे. हिंदुस्थान देश विशेष श्रम न पडतां व प्रथम तो घेण्याचा उद्देश नसतांही तो प्राप्त झाला या बद्दल इंग्रज लोकांना मोठा अभिमान वाटतो व तो वाटणें अगदीं वाजवी आहे.

प्राचीन कालीं जीं नामांकित राष्ट्रें होतीं त्यांपेक्षा लोक निरनिराळ्या जाती, भाषा व धर्म हीं सर्वच हिंदुस्थानांत त्या मानानें फार आहेत. विस्ताराच्या मानानें पाहिलें असतां हा देश ब्रिटीश उत्तर अमेरिका, युनायटेड स्टेट, रशिया, चीन ह्यांच्या खालोखाल आहे. परंतु ह्या देशांपेक्षां हिंदुस्थान फारच सुपीक असून वर सांगितलेल्या पहिल्या राष्ट्रांपेक्षां ४० पट, दुसऱ्या पेक्षां ४ पट, तिसऱ्याच्या तिप्पट लोक संख्या ह्यांत जास्त

आहे मात्र चीन देशाच्या मानानें हिंदुस्थानचा दुसरा नंबर लागेल. शिवाय आफ्रिकेचें क्षेत्रफळ हिंदुस्थानपेक्षां ज्यास्त आहे तरी तिची लोकसंख्या ह्यापेक्षां पुष्कळ कमी आहे. युरोपांतील रशिया व स्वपांडे नेव्हिया हे देश खेरीजकरून बाकीच्या सर्व युरोपियन राष्ट्रांची लोकसंख्या व क्षेत्रफळ हिंदुस्थानच्या बरोबरच आहे. इतकें जरी आहे तरी हिंदुस्थानांत जितक्या जाती, भाषा व धर्म आहेत तितक्या जाती, भाषा व धर्म युरोप खंडांतही नाहींत त्याचप्रमाणें ग्रेट ब्रिटन व आयर्लंड यांच्या क्षेत्रफळाचें १३ पट क्षेत्रफळ व त्यांच्या लोकसंख्येच्या सुमारें ८ पट लोकसंख्या हिंदुस्थानांत आहे. ह्याप्रमाणें हिंदुस्थानच्या विस्तार किती मोठा आहे हें वरच्या एकंदर प्रमाणांवरून लक्षांत येईलच. आतां हिंदुस्थानला स्वाभाविक देणग्या किती आहेत हें पाहूं. ह्यांत मोठमोठाल्या पर्वताच्या रांगा—फार लांबवर वाहत जाणाऱ्या मोठ्या नद्या— ज्या जमिनींत मनुष्याला आपल्या बुद्धी कौशल्याच्या योगानें वाटेल. तें उत्तम पीक तयार करितां येतें अशी सुपीक जमीन, अशा जमिनीवर राहणारे लोकही बरेच उद्योगी, बुद्धिमान व शांततप्रिय असे आहेत. असा हा सोन्याचा तुकडा इंग्लिश लोकांना इच्छा केल्यावाचून मिळाला असेल तर त्यांच्या सुदैवाबद्दल त्याना अभिमान कां वाटू नयेहें समजत नाहीं.

हा सुंदर व विस्तीर्ण देश इंग्लिश लोकांच्या ताब्यांत गेल्यावर त्यांनीं आपली राज्यव्यवस्था तर सुरू केलीच— इंग्लिश लोकांचा व आमचा संबंध राजे आणि प्रजा असा असल्यामुळें आमच्यापूर्वीच्या सर्व गोष्टींत फरक पडत चालला. त्याप्रमाणें आमच्या धर्मांतही पुष्कळ फरक पडत चालला आहे. ह्मणजे राजे परधर्मी असल्यां कारणानें प्रजेच्या धर्मांत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें बदल होत जातो. यामुळें हल्लीं धर्मस्थिति कशी आहे हें पाहणें जरूर आहे

ह्या देशांतील मूळचे राहिवाशी फारसे माहीत नाहीत व त्यांत कोणत्याही प्रकारचा मेळ दृष्टीस पडत नाहीं. ह्या मूळच्या लोकांची संख्या किती आहे ह्मटली तर ब्रिटिश उत्तर अमेरिका, आस्ट्रेलिया व न्युझिलंड यां तीहींतील लोकसंख्येपेक्षां किंचित ज्यास्त येईल. त्याचप्रमाणें सर्व प्राटेस्टंट पंथाचे लोक व ग्रीक चर्च पंथाचे लोक मिळून किंवा ग्रेटब्रिटन, आस्ट्रिया, इतकी जर्मनी, व फ्रान्स ह्या सर्व देशांतील लोक संख्ये इतके हिंदु लोक आहेत. ह्या शिवाय ह्या देशांत मुसलमानही आहेत. त्यांची संख्या हिंदुस्थानचे लोक संख्येच्या ⅕ किंवा पृथ्वींतील सर्व मुसलमानांच्या ⅙ पेक्षां ज्यास्त आहे. तुर्कस्थान, अरबस्तान, इराण व अफ्रिकेच्या उत्तरेची ९ संस्थानें यांत महमदी पंथाचे जितके लोक आहेत त्यापेक्षां हिंदुस्थानांतील महमदी पंथाच्या लोकांची संख्या ज्यास्त येईल. हिंदुस्थानांतील मुसलमान त्यांच्या धर्मामुळें सर्व एकच आहेत. असें वाटतें. परंतु वास्तवीक तसें नाहीं. ह्यापैकीं निमे लोक इतर देशांतुन आलेल्या लोकांचे वंशज होत. ११ वे शतकांत महमद ( गिझनी ) बरोबर जे व्यापारी, शिपाई, व बाजार बुणगे वगैरे लोक आले व त्यापुढें सुमारें ६०० वर्षें पर्यंत जे मुसलमान इकडे आले— त्यापैकीं ज्यांना येथें वसाहत केली त्यांचे वंशज आहेत. व मुसलमानांस ह्या देशांत वर्चस्व मिळाल्यावर त्यांच्या धर्म वेडा ला प्रसाद मिळाल्यामुळें ज्यांना स्वधर्म सोडुन यवनी धर्म स्वीकारणें भाग पडलें अशा एतद्देशीय व मूळच्या हिंदु लोकांची संख्या आहे. ह्या प्रमाणें इंग्लिशांच्या अमलाखाली एशियांतील धर्मांच्या मुख्य शाखापैकीं दोन शाखा होत्या— त्यांत अलीकडे ब्रह्मदेश जिंकल्यानें त्यांची सत्ता आणखी एका प्रचंड शाखेच्या साडे तीन कोटी लोकांवर अमल सुरू झाला. ही शाखा बौद्धधर्माची होय. हिंदुस्थान व ब्रह्मदेश ह्या ठिकाणीं वर सांगितल्या एशियांतील तीन मुख्य धर्मांचे लोक इंग्लिशाचे सत्तेखालीं आहेत. दुसरेही बारीक सारीक पंथ आहेत पण त्यांतील अनुयायांची संख्या फारशी लोकांचा धर्मशीक पंथ, नवीन सुधारलेला हिंदु धर्म हे असून ही ह्या शिवाय अलीकडे राजधर्माचा ही प्रसार होत चालला आहे. अगोदरच हिंदुस्थानांत धर्मांच्या शाखा फार थोड्या व त्यांत पाश्चात्य धर्मांची भर पडत असल्यामुळें हिंदुस्थांतील प्रजेस अलीकडे बरेंच धर्मवैचित्र्य येत चाललें. आहे.

जवळ जवळ २९ कोटी लोकवस्तीचे हें प्रचंड व सुंदर राष्ट्रच्या राष्ट्रच ख्रिस्ती करून टाकावे असा तो प्राटेस्टंट नांवाच्या पाश्चात्य ख्रिस्ती मंडळीचा प्रयत्न जारीनें चालूं आहे. हें काम खरोखरच दुर्घट आहे. ह्मणण्यास कांहीं हरकत दिसत नाहीं. ह्मणून हा त्यांचा यत्न सफल होईल काय? असा प्रश्न सहजच एखाद्याचे मनांत येणार आहे. तर हल्लींची स्थिति कशी आहे, येथें ख्रिस्ती धर्माच्या व तीनें काम करणाऱ्यांची स्थिति, त्यांच्या कामापासून होणारा परिणाम व शेवटीं त्यांस त्यांच्या कामांत यश येईल. असें मानण्यास कांहीं जागा आहे कीं नाहीं हें पाहूं.

हिंदुस्थान व ब्रह्मदेश या दोहोंची लोकसंख्या मिळून २८८१५९६७२ आहे त्यापैकीं २८७०००००० लोकांच्या धर्माचा निर्णय करितां येतो तो असाः—

२०७७००००० हिंदु १७३००००० मुसलमान ७१००००० यापेक्षां ज्यास्त बुद्ध. २२८४१९१ ख्रिस्ती; ९२००००० रानटी ( द्वैत मताचे ) १९००००० शीख; १४००००० जैन ९१००० पारसी, १७००० यहूदी—

आतां हिंदुस्थानांत खिस्ती धर्माचा प्रसार होणें संभवनीय आहे कीं काय ह्या प्रश्नाचा विचार केला ह्मणजे त्यांच्या उद्योगाची दिशा बरोबर आहे किंवा चुकीची आहे हा मोठा वादग्रस्त मुद्दा निघतो. स्थूळ मानानें पाहिलें असतां इतर देशांपेक्षां हिंदुस्थानांत कोणकोणत्या गोष्टी अनुकूल नाहींत हें पाहणें जरूर आहे. मुख्य गोष्ठ ही कीं ज्या देशांत मूळचा धर्म नसून लोक अगदीं रानटी स्थितींत आहेत अशा देशांत मिशनरी लोकांच्या परिश्रमास यश येणें साहजीकच आहे. उदाहरणार्थ—आफ्रिकेंतील कित्येक देश त्या देशांत खिस्ती धर्माचा पाया बळकट बसला आहे. कारण त्या देशांत मूळचा धर्मच नाहीं. यामुळें लोकांचीं मनें ख्रिस्तीधर्माकडे वळविण्यास फारसे आयास पडत नाहींत पण अशा ठिकाणीं मिशनरी लोकांना जे हाल आणि विपत्ति भोगावी लागते. ती अवर्णनीय आहे. तथापि असें आढळतें कीं अशा ठिकाणींही लोकांकडून त्यांचा योग्य सन्मान न होतां ते लोकांच्या निंदेस व तिरस्कारास पात्र होऊन कियेक मिशनरी लोक रानटी क्रूरतेला बळी पडल्याचीं उदाहरणें पुष्कळ घडलीं आहेत. ह्याचेही मुख्य कारण त्यांच्या उद्योगाची चुकलेली दिशा होय.

हिंदुस्थानसारख्या देशांत त्यांना हाल सोसावे लागत नाहींत हें अगदीं उघड आहे परंतु त्यांच्या उद्योगाला यावें तसे यश येत नाहीं इतकेंच नाहीं पण त्यांच्या संबधानें लोकांच्या मनांत वाईट ग्रह उत्पन्न होतो. असें होणें ह्या देशांत अगदीं साहजीक आहे. कारण ह्या देशांतील लोकांस धर्म ह्मणजे काय, त्याचें स्वरूप कसें असतें व त्यापासून काय झालें पाहिजे ह्या गोष्टी बिनओळखीच्या आहेत असें नाहीं. ज्या काळीं युरोपमध्यें धर्म ह्या शब्दाची व्याख्या बरोबर समजली नव्हती त्याकालापूर्वीं फार दिवसापासून धर्माचे खरें तत्व हिंदुस्थानांतील लोकांस ठाऊक होतें. आतां ही गोष्ट खरी आहे कीं त्या वेळेस धर्माचें जें स्वरुप होतें. तें पुढें बदलत जाऊन अगदीं ओळखेनासें होत आलें आहे. तथापि समंजस लोकांना धर्म ह्मणजे काय हें पक्कें माहीत होतें. शिवाय अगदीं अलीकडच्या काळांतही रामदास, तुकाराम एकनाथ वगैरे सत्पुरुषांनीं धर्माच्या पुढें काढून टाकून धर्माचें स्वरूप लोकांना दाखवून त्यांचीं मनें पुन्हा जागृत केली आहेत. ह्मणून हिंदुस्थाना सारख्या देतांत खिस्ती धर्माचा प्रसार सर्वत्र होणें किती अवघड आहे हें निराळें सांगणें नको.

मिशनरी लोक हिंदुस्थानांत प्रथम आलें तेव्हां त्यांच्यापैकीं कित्येक हुशार लोकांच्या गोड गोड बोलण्याला भुलुन कित्येक एतद्देशीय लोकांनीं त्याच्या धर्माची दीक्षा घेतली. त्यामुळें युरोपांतील कित्येक लोकांचा असा ग्रह झाला कीं हिंदुस्थानांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार फारच लवकर होईल. पण लोकांना शिक्षण मिळून खरें तत्व समजूं लागलें तेव्हां पासून आतां पर्यंत ख्रिस्ती धर्माचा प्रसार ह्मणण्या सारखा ज्यास्त झाला नाहीं असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं तथापि ज्या प्रमाणें मोठ्या इमारतीला घूस लागली असतां इमारती खालचा भाग पोकळ होऊन सर्व इमारत एकदम खालीं बसेल ह्याचा अदमास करवत नाहीं त्या प्रमाणें ही मिशनरी घूस हिंदू धर्म रूपीं इमारतीस केव्हां खळग्यांत घालील हें आजच सांगतां येणार नाहीं परंतु लोकांनीं वेळेवर सावध होऊन योग्य खबरदारी ठेवलीतर मात्र हा धोका टळेल ह्यांत शंका नाहीं.

वर सांगितलेला धोका कित्येकांच्या लक्ष्यांत आला असेल. पण त्याबद्दल कोणी कांहीं व्यवस्था केलेली आढळत नाहीं.

---

आमचे प्रांतांतील हायस्कुलांत नवीन मुलें घ्यावयाचीं तीं कोणतीं घ्यावयाचीं या संबंधानें वयाची कांहीं इयत्ता असावी अशा संबंधानें स्थानिक सरकाराकडे लिहून गेल्याचें आमचे वाचकांस स्मरत असेलच. त्यावर आमचे येथील हल्लींचे डायरेक्टर रा. सा. पटवर्धन यांनीं असा कायदा करण्याची सध्यांच अवश्यकता नाहीं असा आपला अभिप्राय दिला होता. परंतु सरकारांनीं त्या कडे दुर्लक्ष करून तो कायदा मंजूर केल्याचें कळतें. मात्र एखादा मुलगा अजारीपणा मुळें ह्मणा अगर दुसऱ्या कांहीं खाजगी अकल्पित येणाऱ्या अडचणी मुळें परीक्षेस न येऊन तो ह्या कायद्याचे तडाक्यांत सापडत असल्यास त्यास हायस्कूल मध्यें घेण्यास परवानगी देण्याची मे. डायरेक्टर साहेबांस सवलत दिली आहे असें समजतें ह्या मुळें कित्येक श्रीमंताचे मुलांस व बहुतेक गरीब लोकांचे मुलांस हायस्कूलांत जाण्यास अडथळा येणार आहे. ह्याचा परीणाम इतका होईल कीं, सध्यां जो हायस्कूलांत मुलांची संख्या आहे ती कमी होऊन शिक्षकांची संख्या कमी करावी लागेल. व लवकरच होन्ही हायस्कुलें मोडून त्यांचे ऐवजी एक हायस्कूल होऊन, उच्च प्रतीचे शिक्षणाकडे जो रुपयां खर्च होत आहे तो कमी करण्याचा जो सरकारचा बेत आहे तो मात्र सिद्धीस जाईल. आमच्या नवीन विद्वान् मंडळीना वऱ्हाडात एक नूतन इंग्रजी विद्यालय स्थापन करण्याची संधी आली आहे.

---

हल्लींच्या विद्याभ्यास क्रमामुळें शारीर शिक्षणाची जितकी गोडी असावी व जितकें त्या कडे लक्ष पोंचवावें तितकें पोंचत नाहीं व मानसिक श्रम ज्यास्त होतात. ह्या मुळें मुलांचे मनावर परीणाम होऊन तीं मोडावतात ह्या कारितां ज्या प्रमाणें युनिव्हार्सिटीची परीक्षा देण्यास अमुक मुलगा अमुक लेक्चर ऐकण्यास कांहीं विवाक्षित दिवस हजर होता, असें कॉलेजच्या प्रिन्सिपालचें सार्टिफिकीट लागतें तसें त्या वर्षीं कांहीं ठरीव दिवस पर्यंत कसरत करण्यास अमुक मुलगा हजर होता, असें कसरत मास्तरचें सार्टिफिकीट असल्या वांचून त्या मुलास वर्षीक परीक्षेस बसू देऊं नये. असा एक कायदा करून द्यावा. अशा संबंधानें मुंबई इलख्यांतील लोकांनीं सरकाराकडे अर्ज केला होता. परंतु सरकांराला तो ओरड बरी न वटून "आह्मांस ह्यांत सध्यांच हात घालण्याची जरूर दिसत नाहीं" असें ह्मणून त्यांनीं तो अर्ज झुगारून दिला. उघड आहे. ज्या गोष्टींत आमचें कल्याण होण्याचा संभव आहे त्यांत सरकारास हात घालण्याची जरूरी कशी दिसेल.

---

वाई येथील दंग्याचे खटल्यांत विनाकारण सांपडलेल्या त्या तेरा जणांस ज्या दिवशीं शिक्षा दिल्या त्याच दिवशीं संध्याकाळीं तेथील मुसलमान लोकांनीं आनंद प्रदर्शनासाठीं सदहू म्याजिस्ट्रेट साहेबास टोलेजंग पानसुपारी केली. व हिंदु लोकांस दिलेल्या त्रासाची फुशारकी मिरवीत ते म्याजिस्ट्रेट मोठ्या आनंदानें गेले. सदहू तेरा जणांस केदेंतून सुटल्यावर मोठ्या गौरवानें आणावें अशा करितां वाई येथें मोठी सभा भरली होती. परंतु तसें करण्याची सदहू अधिकाऱ्यानीं मनाई केली. इतकेंच करून ते स्वस्थ बसले नाहींत तर त्या तेरा जणांपैकीं कित्येक जण ज्या दिवशीं तुरुंगांतून सुटले त्या दिवशीं त्यास सातार्‍यास आपापले मित्र अगर ना ते वाईकरचें घरीं जाऊन नेऊन सुख दुः

खाच्या गोष्टी सांगू न देतां त्यांस तडक वाई कडे लाऊन दिलें. करतील तितकें थोडें. राज्या लुटी जरी प्रजा जनाला शरण कुणा जावें!

The Berar Samachar

MONDAY DECEMBER, 3, 1894

## AGRICULTURAL LABOURERS AND THEIR FRIENDS

The Berar Sarvajanik Sabha has done us an immense good. It has pointed to us the directions in which we ought to work. It has brought home to us a variety of real grievances felt but not definitely laid down. The Sabha was till now an unheard of body silently doing some important business or other in a large town like Amraoti. But through the months that closed it rose from its torpor to a dazzling activity showing germs of a still more productive function. We shall in our today's and some two or three subsequent issues try to show what ought to be done for our agricultural labourers, whose interest was in fact the fundamental key stone in last week's mass meeting unprecedented in our Province. The direction was the most fitting; the subjects chosen were the most appropriate and in our Vernacular columns we have fully published the interesting proceedings. To turn to what we propose to ourselves.

Mr. Joseph Arch is known to us as the modern leader of agricultural labourers. Whatever mistakes he may have made in that capacity his sagacity in making the extension of the franchise to them the principal object of his politicial agitation has been abundantly vindicated. When the demand for that extension was first made, not a few critics derisively asked what good a vote would do to the labourer. It would neither supply him with the necessaries of life, nor clothe his shivering body. Moreover, it was contended, the labourers would not be independent voters, but would be driven to the poll, like sheep to the fold, by their employers, while the few rebellious exceptions, if any, would lose their employment and become marked men in their villages.

The men themselves as a class were not at all anxious for the franchise. Utterly unfamiliar with public life and with no idea of the reciprocal services done by the country and cities, the advantages of political power never touched their immagination. Till there is a cooperation between the country and the cities, no identity of interest can indissolubly, blend together the various elements that go to the making up of an entire nationality. Even when a nation is far advanced, the farmers in it have their ambition centered in an advance of wages, better food, a more liberal administration of outdoor relief, and at the most the acquisition of a little land to till on their own account paying a direct rental to the Government. This is the summum bonnum of a farmer's lookout on life. Even in Europe it required a greatdeal of eloquence to persuade even a considerable mincrity of them that the surest and the quickest method of obtaining attention to their grievances was the indirect one of first getting political power. They are so scattered that they can not be expected to have any combinations. We hear of Mill labourers' combinations of indigo planters' looks-out, and of several other combinations. But to imagive a farm labourers' combination under existing circumst' ances apart from the consideration whether any such are just or unjust would be an impossibility atterly repuguant to our sense judging of the things as they at present are. Even if political franchise were given them, they can not be without fear of the evils that might follow any assertion of political independence Some of us will no doubt ask us what good the franchise will do to the farmers. Again people will ask us, when India herself is forcipe even to the notion of a franchise in the Parliamentary sense of the word, as to what we mean by the franchise we so much profress here. These two queries will be answered of themselves as we progress with our subject. The leaders of the labourers are far wiser than they, as every one must admit, always supposing that what the men ask for, will be really for their good in the long run.

Labouring class is by its peculiar nature a militant class. The net produce on a farm is distributed among the capitalist, the labourers, and the rental. Whatever diminishes interest on capital or the rental all other circumstances remaining the same adds to the wages of the labourers. The effect of political influence on a farm labourer is rather difficult to be imagined. Stopford Brooke says Milton's poetry (or rather *Paradise Lost*) is hard to be realised as it contemplates man before he sinned. We are sinners and we can not raise our imagination to the sublimity of abstractions in which we are to create and realise fancies destitute of a the remotest tinge of sin. So can our assertion be not realised thinking of the abstractions introduced into the subject. Yet one thing is certain. Milton created an order of things rendered impossible and impractical by the sinful state of man. We are dwelling upon a theme likely to be made possible out of the present confusion. Milton deals with things as would have been had man not sinned. We deal with things that would be if our attentions were properly directed and we are not purblind.

The various enactments of the British Parliament, such as Mr. Collings's Small Holding's Bill, accepted a few years ago in principle by both the parties in the House of Commons, and the further developments occurred since, doubtlessly indicate the power of the farm labourers or their leaders to sway the policy of their political parties. The influence of a farm labourer on his leaders is being now felt at the close of the nineteenth century in civilised countries of Europe.

Even in the British Parliaments, in English literature we find, the tendancies of certain politicians and writers exclusively towards farmers. From Adam Smith to Cairn and Marshall, we find the farmer class advocated and sympathised with. But of late we notice the labouring class as a whole advocated. The farmer appears to have been regarded as a political nobody. Although members of his class till very recently in the Irish Land League questions never sufficiently united to secure the redress of even their real grievances, neither party could afford to ignore the power of the majority of their votes in a country election. Now however workmen have completely swamped their votes and they are divided. Being divided they may be neglected.

But in India, inspite of the efforts of our people to start and encourage infant industries and infant manufactures, the bulk of population is entirely agricultural. More than 85 per cent of the whole population live either directly or indirectly on the wages of agricultural labour.

If a wise statesman were asked what laws he would give his country he would at cnce say like Solon he would give such as would meet the requirements of the people and not such as *he* would want them to have. While we are making violent efforts to progress ourselves, while we are striving hard to plant, cultivate and develop new industries, the principle pervading every movement of ours is the same. There is an unnatural crowding in one monotonous employment. Compitition, unfavourable circumstances, ignorance, low ideas of comfort have reduced the unfruitflly employed farm—labourer to a brink of starvation. What should be done to raise him? How should he be directed from a low or almost nonpaying, compulsory and heriditary employment, to a more paying, voluntary and free earning? This is our most solemn problem of the day. We certainly congratulate ourselves on having leaders bent upon materially advancing the condition of our agricultural labourers. We have long ago given in our columns the definition of a leader. The agricultural labourer's excuse is ignorance; he may also justly complain he has no other outlet too, to direct his labour to.

Now then if this desire to benefit the agricultural labour were based upon a genuine awakening of conscience in favour of a long neglected class, we for one should rejoice at it. The schemes put forward on behalf of the labourers appear to be just, but an increasing population will baffle every scheme calculated to be beneficial. But such is the short coming of everything human that no scheme can be permanently so. No proposition is more true than this in economics. But at present, we are neither to look to the motives, nor to permanency but to that which we can temporarily turn to the best account.

## वऱ्हाड.

हवामान— अलीकडे कालमानाप्रमाणें थंडी बरीच पडूं लागली आहे. गावांत देवीची सांथ बरीच आहे.

गेल्या दिवाळीचे सुमारास जो पाऊस आला त्यामुळें आमचे प्रांतांतील कापसाचें पिकास बराच धक्का बसला. नाहीं तर यंदाचे सालीं गेल्या दहा वर्षांत जें पिकाचें प्रमाण होतें त्या पेक्षां जास्त होईल असा अंदाज होता. अमेरिकेंत यंदा कापसाचें फार पीक आलें आहे. व चायना व जपान यामध्यें युद्धें चालत असल्यामुळें आमचे प्रांतांतील कापसाची कमी मागणी आहे. त्याच मानानें भावही फार उतरला आहे.

आमचे येथील म्युनिसिपाल कमिटीमध्यें कांहीं मतवैचित्र्यामुळें ह्मणा, किंवा दुसऱ्या गोष्टीमुळें ह्मणा पण सभासद मंडळीमध्यें हमरा तुमरी सुरूं झाली आहे. हे चांगलें नाहीं. व असेंच फार दिवस न राहूं देण्या संबंधानें अधिकारी मंडळी जास्त खबरदारी ठेवतील अशी आशा आहे. नाहीं तर "उपरसेतो खुपवनी अंदरकातो रामजानी" या ह्मणी प्रमाणें मे० रेसिडेंट साहेब हे बाहेरून आमचे म्युनिसिपालिटीची चांगुलपणा संबंधानें पाठ थोपटून दुसरे म्युनिसिपाल कमिटीस आमचे येथील कमेटीचा कित्ता घेण्यास सांगत आहेत व आमचे येथें तर असा प्रकार आहे.

रजेवरून परत आले— मे० इलियट साहेब सहा दिवसाचे रजेंत हवा पालटण्यासाठीं मुंबईस गेले होते ते परत आले. मे० डायरेक्टर साहेब किरकोळ सहा दिवसांचे रजेवर पुण्याकडे गेले होते ते परत आले. मि० पुरुषोत्तमराव केळकर हेही बरेच दिवसांचे रजेवर गेले होते ते परत येऊन त्यांनीं आपले कायमेच जागचा वाशिमास चार्ज घेतला.

मे० कमिशनर साहेब याच तालुक्यांत फिरत आहेत. मे० डे० कमिशनर साहेब आज खुद्द अकोटास आहेत. मे० स्यानिटरी कमिशनर साहेब गेल्या आठवड्यांत येथें येऊन गेले. मे० डायरेक्टर साहेब आज उद्या अकोटाकडेस जाणार आहेत. मे० एज्युकेशनल इन्स्पेक्टर साहेब हे वणीकडेस आहेत. मे० सिंपसन साहेब अ० क० उद्या ह्याच तालुक्यात फिरावयास निघणार, अशी वदंता आहे.

## नोटीस

अंबाई मर्द येहोजी फाळके राहणार मोन तालुके जळगांव जिल्हा अकोला इसम खालीं सही करणार लक्ष्मीबाई मर्द येहूजी फाळके राहणार मोन तालुके जळगाव इजकडून या नोटीशीनें तुह्मास असें कळविण्यांत येतें कीं तुमचे व माझे भतार नामें येहूजी हे मरण पावले त्याचें लोकांकडे कर्ज घेणें होतें व त्याच लोकांकडे हल्लीं आहे त्याबद्दलच्या सावकारीच्या व ह्या आपल्या नवऱ्यानें ठेवलेला गुमास्ता नामें मारुती शिरस्कार याचे व तुझे जवळ आहेत करितां मला जुन्या वह्या शिवाय असाम्यांचे हिशेब करून घेता येत नाहींत व कर्ज वसूल करण्याचें सरटीफिकीटही घेतां येत नाहीं यास्तव संमतीशिवाय तूं कर्ज वसूल करूं नये. कारण मी वडील आहे. गुमास्ता हा तुझे मेळांत आहे सर्व माझें नुकसान असल्याचें कर्ज वसूल करण्याचें बाबतींत तूं व इसम मजकूर करीत आहां. माझें हिशोब होणारें नुकसान जर तुह्मी मला वह्या ८ दिवसांचे पोटांत न दिली तर मी तुह्मा दोघांवर फिर्याद करून भरून घेईन. व भगू ब० कडू फाळके याचें खरेदीखत माझें तुह्मी स्वाधीन करून द्यावें. कारण सर्वे नंबरचे शेतांत मी व भगूनें साल मजकुरीं कडबा व पराटी पेरली आहे फक्त सर्वे नंबर यांत माझा निमे हिस्सा आहे. खरेदीखत तुजजवळ आहे. करितां ८ दिवसांत वह्या आणून पंचासमक्ष मला द्यावी कारण जिचें काम पडेल तिनें कोर्टांत असामीची तकरार असल्यास न्यावी असें ठरलें होतें. पुढें होणारें नुकसानाबद्दल प्रत्येक कामांत तुला व मारुती याजला मी जबाबदार धरीन करितां लिहिलें मुदतींत वह्या द्यावी न द्याल तर गुमास्त्यानें दगाबाजी केल्याबदल फौजदारींत माजिस्त्रेट याजकडे फिर्याद करीन व नोटीशीचा खर्चही भरून घेईन. ह्मणून दिली नोटीस सही ता. २८-११ ९४,

सही

लक्ष्मीबाई मर्द येहूजी फाळके राहणार मोन तालुके जळगांव निशाणी खुद्द बांगडीची असे.

## वर्तमानसार.

पोर्ट आर्थरच्या बंदराकडे चीनची बरीच सरशी झाली, व त्यावरून असें दिसूं लागलें आहे कीं, चीन आपला आळस सोडून पुन्हां तरतरीत झालें आहे त्यामुळें या आठवड्यांत जपाननें विशेष चढाई केल्याचें कळण्यात आलें नाहीं. चीनच्या वतीनें लढाई मिटविण्याचें कामीं, इंग्लंडचे मुख्य प्रधान लॉर्ड रोझबरी यांनीं जो गार्म पत्करला होता तो अगदीं अव्यवस्थित असल्यामुळें इंग्लंडची बरीच मानहानि झाली असें प्रसिद्ध राजकारस्थानी पुरुष मि० लाबुशर यांनीं आपलें मत प्रसिद्ध केलें होतें कीं, या मध्यस्थींत चीनचा कांहीं फायदा व्हावा अशा हेतुनें इंग्लंडास मध्यस्थी करण्यास सांगितलें असून तें कांहींच न करितां इंग्लंडनें उलट चीनचा कमीपणा प्रसिद्ध केला, व त्यामुळें चीनला आपल्या नफ्यास मुकावें लागलें आहे. अर्थांतच याही बाजूनें लार्ड रोझबरी यांना ठपकाच मिळाला आहे. मि० लाबुशर यांनीं लार्ड रोझबरीकडून प्रधानकीचें काम चांगलें होणें अवश्य आहे असें सिद्ध करून मि० ग्लाडस्टननी पुन्हां आपलें काम पहावें अशी सूचना केली आहे. शिवाय अशी शंका प्रगट केली आहे कीं या लढाईच्या मध्यस्थींत चीनकडून थोडासा मुलूखही मिळविण्याचा लार्ड रोझबरीचा हेतु होता असें वाटण्यास जागा आहे. एकंदरीनें आतां खुद्द चीनच जर आपल्या पायावर उभा राहील व जपानशीं टक्कर देईल तर जुळणार आहे असें दिसतें. बाकी कोणीही मध्यस्थी करूं लागला कीं अशा या गडबडी निवावयाच्याच!

चीननें आपल्या लढाई संबंधाच्या आरमारी खात्यावर कॅप्टन मेक्युलन या इंग्रज गृहस्थाची नेमणूक केली आहे. इंग्रजाचें बोट इतपत तरी शिरलें! या लढाई मुळें इंग्लंडांमधील बार्मिंगहाम शहरांतील हत्यारें व दारूगोळ्यांच्या कारखान्यास अतोनात किफायत होऊं लागली आहे.

एकसारखी तीन दिवस पाण्यांत राहूं शकेल अशी एक आगबोट आस्ट्रेलियांत एकानें काढली आहे.

मादागास्कर प्रांतावर फ्रेंचाचा हल्ला बहुतेक लौकरच होणार. पण त्याविरुद्ध कुरकुर बऱ्याच इंग्रज पत्रांनीं चालविली आहे. कुरकुर करून काय उपयोग?

वानरास अग्निसंस्कार— पंजाब प्रांतांतील पठाणकोट येथें एक वानर मोठा प्रसिद्ध होता त्याच्यावर सर्व लोकांची मोठी पूज्यबुद्धि होती. तो नुकतांच वारल्यामुळें चहूंकडे मोठें दुःख होऊन त्याच्या शवास सर्व लोकांनीं अतिशय मोठ्या समारंभानें अग्निसंस्कार दिला. त्यावेळीं शेंकडों वानरेंही बरोबर होतीं, व त्यांच्याही डोळ्यांतुन अश्रुबिंदु पडत होते. एकंदरींत चमत्कार खराच! स. वि.

फौजेनें भरलेलीं दोन रशियन गलबतें यांस रशियानें ताबडतोब लाडी बोस्टकवर रवाना केलें आहे.

असमगड प्रांतांत इतका महापूर झाला कीं दोन नद्यांचें पाणी आवरण्या करितां काय तजवीज करावी याचा विचार करून रिपोर्ट करण्या करितां एका कामदाराची नेमणूक करणे सरकारास भाग झालें आहे.

रायपूर येथें नवें राजकुमार कालेज सुरू झालें आहे.

वसंत कगारी गोसावी हा रेल्वेची खोटी टिकिटें करून चालवीत असे. पुढें त्याबद्दल त्यास शिक्षा झाली. सुटल्यावर घड्याळें नेट करण्याचा धंदा सुरूं केला. कासोली येथ पुष्कळांचीं घड्याळें जमा करून कलकत्यास नेऊन विकून पैसे खाल्ले त्यावरून त्यास आता केदेची व फटक्यांची शिक्षा झाली त्यांत रेल्वेची दुसरी टिकिटें खोटीं केल्याचें बाहेर आल्यावरून पुन्हा चवकशी सुरूं आहे अ० द०

आल्जीरिया प्रांतांत एक लहानशी नदी आहे. तिचें पाणी रसायन शास्त्रीया शाई बनलें आहे. नदी दोन ओढ्यांच्या संगमामुळें झाली आहे. एका ओढ्याच्या पाण्यात लोहाचा अंश अतिशय आहे व दुसरा एका दलदलींतून वाहत येतो. त्या दलदलींतून येतांना मायफळाचा अर्क त्या पाण्यांत येतो. लोह व मायफळ यांच्या मिश्रणानें शाई तयार होते. त्या प्रमाणें त्या दोनही ओढ्यांचा संगम झाल्यामुळें शाई बनली आहे. त्याचा उपयोग लिहिण्याच्या कामीं शाई प्रमाणें उत्तम होतो. बहुरत्नावसुंधरा ह्मणतात तें खोटें नव्हे! क०

## नोटीस

नोटीस— बेशमी शेक्रटरी म्युनिसिपालिटी शहर इलिचपूर यांस.

नोटीस देणार नबाब दाउदखा आणि युजसखा वा तालेमदखा रहाणार इलिचपूर.

नोटीस देतों अशी कीं आमचे मालकीचे पुरे पेठ सरमसपुरा १, सवाईपुरा २, नसीबपुरा ३, नामदार गंज ४, रिकाब ५, विलायतपुरा ६, जिवनपुरा ७, आणि सुलतानपुरा ८, येथील सर्व जमीन पांढरी वरील आमचे मालकीची आहे सदर्हू पुऱ्याचे जमिनी पैकीं कांहीं कांहीं लहान पडीत टुकड्यावर म्युनिसिपालिटीचा कांहीं हक्क वगैरे नसतां सदर्हू जागा म्युनिसिपालिटीनें अन्यायानें आपले ताब्यांत घेऊन त्याजवर मालकी हक्कानें कांहीं कृत्यें केलीं आहेत सबब या नोटिशीनें म्युनिसिपालिटी तर्फे तुह्मांस असें कळविण्यांत येतें कीं ही नोटीस पावल्या पासून एक महिन्याचे आंत सदर्हू जाग्यावरील आपला ताबा दूर करून यापुढें सदरील पुऱ्यांतील अशा सर्व जमिनीवर तुह्मी मालकी हक्काप्रमाणें कांहीं कृत्यें करणार नाहीं असें आह्मांस कळवावें आणि त्याप्रमाणें व्यवस्था करावी असें न केल्यास आणि झालेल्या चुकीची दुरुस्ती न झाल्यास आह्मांस कायदेशीर तजवीज करणें भाग पडेल व खर्चाचा बोजा म्युनिसिपालिटीवर पडेल कळावें. ता० १७ माहे नोवेंबर सन १८९४ इ०

( सही )

नवाब दाऊदखा आणि युजसखा तालेमदखा तर्फे मुक्त्यार
लक्ष्मण गोविंद रहाणार शहर
इलिचपूर द० खु०

### नोटीस

रा. रा. शिवराम राघव, व रामराव राघव ब्राह्मण कटीकर राहणार उमरखेड तालुके पुसद जिल्हे वाशीम यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मास आमचे मौजे बेलखेड जाहागीर तालुके पुसद येथील जाहागीर संबधानें काम करण्यास कुलमुखत्यार पूर्वी नेमलेले होते. तें तुमचे मुखत्यार पत्र तारीख १ नवंबर सन १८९४ रोजीं आह्मी रद्द करून नवकरींतून कमी केलें आहे. सदरील बेलखेड जाहागीर गांवचे कागद, पत्र, सिक्का वगैरे जे तुमचे जवळ आहेत ते व तुह्मी नवकर राहिले दिवसापासून हिशोब तुमचे कडून आह्मास घेणें असोन तो हिशोब दाखवून राहिलेली बाकी रक्कम आणि कागदपत्र वगैरे तुह्मास मागतां तुह्मी देत नाहींत. जाहागीर गांवचे कागदपत्र आमचे जवळ नसोन तुमचे जवळ असल्यामुळें असामी लोकांकडून पैसा वसूल करण्याचें काम बंद झालेलें आहे सबब सदरी हिशोब व कागदपत्र वगैरे ही नोटीस पावल्या पासून ४ दिवसांत आह्मास अगर आमचे कुलमुखत्यार महमद लुतफोद्दीन वल्द गुलाम समदानी राहणार उमरखेड यांस समजाऊन द्यावेत, असें न केल्यास पैसा असामी लोकांकडून वक्तसीर न आल्यामुळें श्रीदत्तात्रय संस्थान उमरखेड यांचे उच्छाहाचे संबंधानें वगैरे जें नुकसान होईल तें तुमचे पासुन भरून घेऊं करितां अगाऊ नोटीस दिली आहे कळावें तारीख २७ माहे नवंबर सन १८९४ इसवी.

( सही )

श्री दत्तात्रय साधु माहाराज वहिवाटदार हनुंमत बाळा भाऊ जहागीरदार दस्तुर खुद्द.

नमुना नंबर. ९८

ऋणकोनें आपणांस नादार ठरविण्याविषयीं केलेल्या अर्जाचे हुकूम नाम्याचे मालकास व इतर धनकोस नोटीस.

आक्ट नंबर १० सन १८७७ इसवी. ह्यांतील कलमें ३४७ व ३४८ प्रमाणें.

वर्ग ७ दिवाणी किरकोळ दावा नंबर १ सन १८९४

विद्यमान माणीकशा रतनजी दस्तुर सिव्हील जडज्य कोर्ट इलिचपूर जिल्हे इलिचपूर याचे कोर्टांत.

बंकटलाल पन्नालाल तर्फे मुकत्यार सिताराम व श्रीचंद ठाकूरदास मे. वा. सिवकोरबाई राहणार इलिचपूर वादी.

लक्ष्मण वा गणोबा पुराड राहणार वानोस तालुके दर्यापूर. प्रतिवादी.

हुकूम नाम्याची रकम रुपये.

सर्वत्र लोक राहणार यांस ज्या पेक्षां ऋणको लक्ष्मण बापाचें नांव गणोबा पुराड राहणार वानोस तालुकें दर्यापूर जिल्हा इलिचपूर यांस हल्लीं कैद केलें असून अगर कैदेंत ठेविलें असून त्याणें आपणास नादार ठरविण्याविषयीं लेखी अर्ज केला आहे. ज्यापेक्षां तुह्मांस त्या अर्जाची नकल या सोबत पाठविली आहे, व तुह्मास अशी नोटिस देण्यांत येत आहे कीं, तारीख २१ दिसेंबर सन १८९४ रोजीं १० वाजतां कोर्ट मजकुरीं सदर्हू अर्जाची चोकशी करण्यांत येईल.

आज तारीख २२ माहे नवंबर सन १८९४ रोजीं आमचे सहीनिसी व कोर्टाचे सिक्यानिसी दिली.

अर्जदार प्रतिवादीची जिंदगी खालीं लिहिल्या प्रमाणें दिली आहे.

८ ताटे दोन पितळेची.
१ गंज पितळेचे दोन.
१२ तांबे पितळेचे दोन.
१० गडवा पितळेचा एक.
४ तांब्या एक तांब्याचा.
४ पंचपात्र एक पितळेचे.
२ पळी पितळेचा एक.
१ तवा एक लोखंडी.
६ टोपलें लोखंडी.
१०८ भरणें तांब्याचें एक.
१०७

M. R. Dastur
सि० जडज्य.

## जाहिरात,

हे पाक पौष्टीक पहा, व त्वरित गुणपण–तो मजेबाज–किंमत थोडी, व फायदा जास्त– हे सेवन करून अनुभव घ्या. ह्या पासून धातुवृद्धि होऊन मर्दुमी वाढते, व शक्ति स्फूर्ति व स्मरणशक्ति फार मिळेल. आणि श्रम पडून मेंदु बिघडतो तो मस्तक मेंदु तरावट होईल. हात पाय व कंबर व सर्व सांधे दुखतात तो वायु व बाळंत वायु व सर्दी हे सर्व दूर होतील. सर्व त्रिपास व हटकून वाळांतीनीस व तिचे रोगावर खाण्यास गुण देणार योग्य–सौभाग्यसुंट. हे सर्व आमचे दवाखान्यात विक्रीस तयार आहेत. ज्यांना लागेल त्यांनीं रोख पैसे पाठवून अगर व्ह्याल्युपेबल पार्सलनें मागवावें. खाण्याचे रीतीचा खर्डा या सोबत देऊं. दर खालीं लिहिले प्रमाणें.

त्वरा करा! पोटास खा!! गेला दिवाळा येणार नाहीं!!! वाचा पहा— सालंमिश्री पाक दर १ शेरास किंमत रु० ३; बदाम पाक दर शेरास २॥; गोखरू पाक शेरास रु० १ पाव; कहळे पाक शेरास रु० ४; सौभाग्य सुंट उत्तम शेरास रु० २. प्रत दुसरी—सालंमिश्री व बदाम पाक दर शेरास रुपये २.

पत्ता व सही.
शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर
दवाखाना अकोला वऱ्हाड.


## घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचें (ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसाविलेले आहेत) चावी देण्यास मोगरा. कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक बिलोरी काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षे दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता–
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक


☞ हें पत्र आकोलें येथें कैं० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

साळअखेर ” ७ ” १८८
किरकोळ अंकास ………………०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस…. ०।०६
दुसरे खेपेस…….. ०१

Six monthly ……… 3 ,, 8 as.
Single copy……………………… 4 as

Advertisement
Below 10 lines… 2 Rs.
per line over 10… 4 as
Repetition perline 3 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXVIII AKOLA MONDAY 10 DECEMBER 1894 NO. 48

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख १० माहे डिसेंबर सन १८९४ इ० अंक ४८

ESTABLISHED IN 1880.
HEALTH REGAINED ANE STRENGTH MAINTAINED.

जी. बी. कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या पुतळया, कडीं, लेखण्या व गळपट्टे वगैरे.

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

१०,००० वर विकल्या, रोग पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे.




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग, अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें, कैंपेरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धशिशी, मस्तक शूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात. लेखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहा वांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्या पासून रोगी बरे झाले आहेत. ह्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपट्या किं. रु. १॥ |

केबर पट्टा किं. रु. ९

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

जी. बी. नाईक आणि कंपनी.

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालू असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकूड, लोखंड, किराणा, हार्डवेर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कसोशीनें व त्वरित पाठवूं. एकवेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्ह्याल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवुन मागवावा. पण व्ह्याल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट, मुंबई.

विक्रीस तयार

**SAPKAR'SDIARY**
**FOR 1895**
**WITH**
A CALENDAR FOR 1896.

## सापकराची रोजनिशी.
## सन १८९५ सालाकरितां

ह्यांत मराठी तिथि, वार, महिने, सूर्योदयास्त, विशेष उपवास, ग्रहणें, सण, सरकारी ऑफिसांत व दिवाणी कोर्टांस असणाऱ्या सुट्या, मौंजीविवाहाचे मुहूर्त. इंग्रजी व मुसलमानी महिने, तारखा. रेल्वे, तारायंत्र, स्टांप मनीआर्डरी, पोस्ट, मुंबई ब्यांकेच्या रुल्हे, सिव्हिल प्रोसिजर, मुदतीचा. विशेष न्यायाचा, दस्तैवज नोंदण्याचा. जनरल स्टाप, कोटफी, पोलिसगार्ड, डिस्ट्रिक्ट आणि गांवचें पोलिस, क्रिमिनल प्रोसिजर, इत्यादि नेहमी जरूर लागणाऱ्या विषयांची माहिती दिली आहे व रोजमुरा चुकता करण्याच्या माहितीचें कोष्टक दिलें आहे अखेरीस जमा खर्चाच्या सदराची व कांहीं कोरी पृष्ठें जोडली आहेत.

| रोजनिशीची किंमत | किं. | ट. हां. |
|---|---|---|
| प्रत नंबर १……………… | ०१२ | ०२ |
| प्रत नंबर २……………… | ०८ | ०१॥ |
| प्रत नंबर ३……………… | ०७ | ०१॥ |

किमतीबद्दल रोख पैसे आह्मांकडे पाठविले असतां रोजनिशी रवाना करण्यांत येईल.

भाऊ गोविंद सापकर,
ज्ञानचक्षुचे मालक.

## जाहिरात,

हे पाक पौष्टीक पहा, व त्वरित गुणपण—तो मजेदार—किंमत थोडी, व फायदा जास्त— हे सेवन करून अनुभव घ्या. ह्यापासून धातुवृद्धि होऊन मर्दुमी वाढते, व शक्ति स्फूर्ति व स्मरणशक्ति फार मिळेल. आणि श्रम पडून मेंदु बिघडतो तो मस्तक मेंदु तरतरीत होईल. हात पाय व कंबर व सर्व सांधे दुखतात तो वायु व बाळंत वायु व सर्दी हे सर्व दूर होतील. सर्व स्त्रियांस व हटकून बाळंतीनीस व तिचे रोगावर खाण्यास गुण देणार योग्य—सौभाग्यसुंट. हे सर्व आमचे दवाखान्यांत विक्रीस तयार आहेत. ज्यांना लागेल त्यानीं रोख पैसे पाठवून अगर व्ह्याल्युपेबल पार्सलनें मागवावें. खाण्याचे रीतीचा खर्डा या सोबत देऊं. दर खालीं लिहिले प्रमाणें.

त्वरा करा! पोटास खा!! गेला हिंवाळा येणार नाहीं!!! वाचा पहा— सालंमिश्री पाक दर १ शेरास किंमत रु० ३; बदाम पाक दर शेरास २०८; गोखरू पाक शेरास रु० ५ पांच; कोहळे पाक शेरास रु० ४; सौभाग्य सुंट उत्तम शेरास रु० २. प्रत दुसरा—सालंमिश्री व बदाम पाक दर शेरास रुपये २.

पत्ता व सही.
शिवचरणगीर रामगीर वैद्य कुरणखेडकर
दवाखाना अकोला वऱ्हाड.

नोटीस

नोटीस बेशमी— सिताबाई मर्द जव्हारी लाल कलाल राहाणार शिरसगांवबंड तालुके व जिल्हे इलिचपूर इजला खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं जव्हारीलाल हा माझा लहान बंधु असून आपण सर्वजण एकत्रांत असून अन पाणी जेवणखाण वगैरे सर्व प्रकार एकेठिकाणीच आहे. आमच्या कोणत्याही इस्टेटची वाटणी वगैरे कांहींएक अजून पावेतों झाली नाहीं. जव्हारी लाल मयत झाल्या पासून तुह्मी लोकांचे फंदानें तंटा करूं लागला स्थावर जंगम मालाची अफरातफर करूं लागला. स्थावर जंगम इस्टेट जी आहे. त्याजबद्दल कोणच्याही प्रकारची व्यवस्था करण्याचा अधिकार तुह्मांस बिलकूल नाहीं. तुह्मी स्थावरजंगम इस्टेट कोणास गाहाण खरेदी किंवा बक्षिस किंवा इतर कोणचेही दुसरे रूपानें व तोंडी अगर लेखी करारा स्थावर जंगम इस्टेटची बक्षीस खरेदी किंवा गहाण वगैरे देण्याचा अधिकार नाहीं. फक्त अन्न वस्त्राचे अधिकारी तुह्मी आहा. सबब तुह्मांस ह्या नोटिशीनें असें कळवितो कीं आपली स्थावरजंगम मिळकत अगर त्या पैकीं कोणताही भाग दुसऱ्यास कोणत्याही रूपानें देण्यास ह्या नोटीशीनें मनाई केली आहे. व तुह्मी देऊं नये जर तुह्मी दिल्यास तुमचे करणें अजन अधिकारी गैर कायदा व रद्द असें समजले जाऊन त्या संबंधानें दुसरें कोणास कांहीं हक्क प्राप्त होणार नाहीं. अगर त्याजबद्दल दुसऱ्याची मालकी कोणत्याही प्रकारानें चालणार नाहीं. हे तह्मांस कळावें ह्मणून दिली ही नोटीस सही तारीख ४ माहे डिसेंबर सन १८९४ इ०

( सही )
शितलदास ठाकुरलाल कलाल रहाणार
सिरसगांवबंड ता० व जिल्हे
इलिचपूर तर्फे मुक्त्यार
अयोध्या प्रसाद ब्राह्मण कलाल दस्तुर
खुद्द.

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष शुद्ध १३ शके १८१६

## लाहोरचा दरबार

कित्येक महिन्या पासून गाजत असलेला लाहोरचा दरबार यथाकाळ संपूर्णतेस गेला हें कळविण्यास आनंद वाटतो. हा दरबार मोठा प्रेक्षणीय व रमणीय झाला असें चालेल्या हकीकती वरून कळतें. महाराणी सरकारचे खुद्द प्रतिनिधी ज्यां स्थळीं जातात तेथें आनंदोत्सवाचा शिगलोट होत असेल यांत कांहीं नवल नाहीं. हिंदुस्थानच्या लोकांच्या पाहुणचाराच्या पद्धति जगविख्यात आहेत आणि निस्सीम राज्यनिष्ठेनें त्या नानाविध आदरातिथ्याला भरतीच आली होती. तशांत दरबार भरविण्या विषयीं व्हाइसराय साहेबांची आज्ञा होती तेव्हां सर्व गोष्टी यथासांग होऊन पुष्कळ पैशाचा फन्ना उडाला असेल हें स्पष्ट दिसतें. हल्लीं पैशाची मोठी तुट पडली आहे तथापि राजकीय कारणा निमित्त दरबारची अवश्यकता होती असें घडलेल्या प्रकारा वरून मानलें पाहिजे.

लाहोरच्या दरबारास आसपासचे मांडलिक राजे रजवाडे पुष्कळ जमले होते. मोठमोठे हुद्देवाले अधिकारी यांचा जमाव मोठाच होता. आणि त्या शिवाय दरबारच्या मानाला पात्र असे निवडक सुखवस्तु व श्रीमान लोकही दरबारला गेले होते. लार्ड एल्जिन यांनीं जमलेल्या दरबारी मंडळीस उद्देशून सार्थ, गोड व उपयुक्त असें संभाषण केलें. समग्र भाषण व्हाइसराय साहेबांचा मुत्सद्दीपणा उत्तम प्रकारें व्यक्त करितें. त्यांच्या राज्यपद्धतीचें दर्शक असेंही हें भाषण आहे. यांतील विचार वक्त्याच्या उदारमनाची चांगली साक्ष देतात. यांच्या भाषणांतील ठोकळ मुद्दे आह्मी खालीं नमूद करितो.

( १ ) लाहोरास दरबार भरविण्याचा उद्देश कळवितांना लार्ड एल्जिन बोलले कीं आपण एकत्र मिळून एकदील व्हावें. आणि आपापले मनोगत परस्पर कळवून सर्वजणांनीं आपापली कार्यमाला अशी ठेवावी कीं ज्या योगें या देशांत सर्वत्र शांतता होऊन देशाची अबादानी व भरभराटी सुयंत्रपणें प्रचलित राहातील.

( २ ) आपल्या कर्तव्याचो मूळ दिशा हीच आहे तथापि हा मनोरथ सिद्धीस जाई पर्यंत इंडिया सुरक्षित व शांत ठेवण्या साठीं च आपण कडेकोट तयारीनें असलें पाहिजे. लढाईच्या सिद्धतेला योग्य असा लष्करचा बंदोबस्त हल्लीं ठेविला जात आहे त्याचा अर्थ असा नाहीं कीं आह्मास ब्रिटिश राज्यसीमा वाढवावयाच्या आहेत किंवा नव्या लढाया मारून नवे मुलूख जिंकावयाचे आहेत. या देशाच्या नजिक नजिकच्या राष्ट्रवाल्यांशी आह्मी स्नेहसंबंध राखण्यास मनापासून इच्छितों.

( ३ ) अफगाणचे अमिर इंग्रज सरकारचे पक्के दोस्त आहेत हें आपल्या लाभास मोठें कारण आहे. या खेरीज इंग्लंड व रूस देश या उभयता मध्यें प्रेमसंबंध व सख्यभाव दुणावत चालला आहे तेव्हां मोठीशी भिती बाळगण्याचें प्रयोजन नाहीं. हल्लीं उत्तर हद्दीवरच्या डोंगराळ लोकांशीं आमचा संबंध पडतो तो नियमाला अनुसरून चांगुलपणाचा असावा अशी आमची व्यवस्था चाललेली आहे. परंतु वजिरिस्थाना सारख्या ठिकाणीं जे बंडाळ्याचे ढग अढळूं लागतात ते नाहींसे करण्यासाठीं आह्मास तद्देशांतील शर्ती प्रमाणें आणि मनुष्यपणाच्या वागणुकी प्रमाणें जीवित व वित्त हीं त्या मुलखांत सुरक्षित राहतील असा बंदोबस्त करावा लागतो आणि एवढ्याच करितां दुसऱ्या राज्यांत हात घालावा लागतो.

( ४ ) इतर सुधारलेल्या राष्ट्रा प्रमाणें हा काल या देशाच्या आसमंत सीमा पक्क्या व ठरीव करण्याचा आहे. वायव्य कोंपऱ्याकडील इराणची व इंडियाची सरहद्द कायम झाली. ब्रह्मदेशाची चीनच्या बाजूकडील हद्द कायम करण्यांत आली आहे शिवाय तारायंत्रें वगैरे स्थापून तिबेट व नेपाळ या देशांशीं स्नेहसंबंधाचें व व्यापाराचें दळण वळण चालू केलें आहे. या सर्व गोष्टी वरून पुढील शांततावह योजना सहजीं लक्ष्यांत येतील.

( ५ ) या प्रमाणें बाह्य व्यवस्था समाधानकारक होत चालली आहे तेव्हां या देशाचा अभ्युदय तीन प्रकारच्या अंतर्व्यवस्थेनें होईल हें स्मरून आपण वागलें पाहिजे. या देशांतील अंगभूत सांपत्तिक द्रव्याचा आपण फायदा करून घेतला पाहिजे. दुसरें जमिनीचें उत्पन्न व उद्योगाचें फळ हें बिनधोक पूर्ण मालकीनें उपभोगता येईल अशी योजना असली पाहिजे. तिसरी गोष्ट, आपली प्रगती होण्यास आपण विद्यादानानें अज्ञानाचा लोप केला पाहिजे, आणि कायद्याची अंमलबजावणी निःपक्षपातबुद्धीनें व समतोलदृष्टीनें करून बेकायदा वर्तन व गुन्हे यांस हद्दपार केलें पाहिजे. या वरील तत्वाच्या धोरणानें सर्व राज्यव्यवस्था चालली आहे हें दाखविण्यासाठीं लार्ड एल्जिन यांनीं पंजाबाचेंच उदाहरण सांगितलें. अव्वल इंग्रजीच्या वेळीं जेथें १९५ लाख रुपये उत्पन्न होतें तेथें हल्लीं २४१ लाख झालें आहे. याला कारण कीं कालव्याच्या पाण्याच्या सोयींनीं शेतीचें उत्पन्न वाढलें आणि रेल्वेच्या फैलावानें व्यापार वाढून पंजाबचा माल मुंबई व कराची मार्गे विलायतच्या बाजारांत विकूं लागला. पंजाबच्या हिंदु मुसलमानामध्यें सख्यभाव आहे हें अमृतसर येथें उभारलेल्या स्वागतप्रदर्शक कमानी वरून चांगलें व्यक्त होते.

( ६ ) अशी जरी ब्रिटिश राज्यव्यवस्थेनें भरभराटी होत चालली आहे तथापि कांहीं दुःखें व निराळ्या आपदा या प्रगतिचक्राच्या फेऱ्यांत नवीन उद्भवतात त्याच्या दूरी करणा विषयीं आह्मी फार खोल विचारानें व अती कसोशीनें खटपट करीत आहो. जमिनी संबंधानें पुष्कळ प्रश्न आह्मा समोर आहेत. शेतकरी लोकांच्या सुखासाठीं नामदार म्याकडोनाल्ड यांच्या साह्यतेनें नुकताच आह्मी जंगल खात्यासंबंधानें ठराव प्रसिद्ध केला आहे त्यावरून आमच्या काळजीची लोकांस कल्पना येईल.

(७) मागील गत गोष्टी निवेदन करण्याचा आशय इतकाच कीं त्यावरून आपण येऊन चुकलेला अनुभव ध्यानांत वागवावा आणि पुढील कर्तव्य बजावते वेळीं जुन्या अनुभवांतले नियम पाळावे. ब्रिटिश सरकारचें राज्य न्यायी, पायाशुद्ध व दयाळू आहे याच गोष्टीच्या मजबुतीवर एतद्देशीय लोकांनीं राजनिष्ठ असावें असें ह्मणतांना आह्मांस मोठा अभिमान व प्रौढी वाटते.

(८) जमलेल्या राजेरजवाड्यांत संबोधून व्हाइसराय साहेब बोलले कीं आज आपणास ज्या ढार्याच्या कार्यानिमित्त आमंत्रण केलें नाहीं. आपणांत शांततेच्याच लढाया माराव याच्या आहेत आपण स्वसुखा विषयीं अभिलाष न धरिता कर्तव्यदक्ष व्हा, स्वकीय ऐषआरामाकडे राज्याचा वसूल न खर्चिता लोककार्यांकडे त्याचा विनियोग करा, आणि श्रेष्ठ पद थोर घराणें, व विपुल संपत्ति यांच्या साह्यतेनें आपणास ज्या लोककल्याणाच्या संधी प्राप्त होतील त्या दवडूं नका ह्मणजे आपण प्रजाजनाचें व महाराणी सरकारचे धन्यवाद संपादाल.

येणें प्रमाणें व्हाइसराय साहेबांचें संभाषण आटोपल्यावर नेहमीच्या रिती रिवाजा प्रमाणें दरबार बरखास्त झाला.

मेहेरबान रेसिडेंट साहेब बहादूर यांचे कडून सन १८९३—९४ सालच्या म्युनिसिपालिटीच्या रिपोर्टाची एक प्रत आह्माकडे आली आहे तिचा अह्मी आभार पूर्वक स्वीकार करून त्यांतील गोषवारा देतो.

वऱ्हाडांतील म्युनिसिपल कमेट्या मध्यें साधारणपणें दोन प्रकारचे मेंबर्स असतात एक लोकांनीं निवडलेले लोक व दुसरे मेहेरबान रेसिडेंट साहेबानीं नेमणूक केलेले लोक. कमेटींतील लोकांच्या एक चतुर्थांशा पेक्षा नेमणूक केलेले लोक जास्त नसतात.

सन १८९३ मार्च तारीख ३१ पर्यंत खालील आठ शहरीं म्युनिसिपालिटीचा कायदा अमलांत होता तीं गावें. १ उमरावती शहर २ उमरावती क्यांप ३ आकोला ४ खामगांव ५ शेगांव ६ आकोट ७ इलिचपूर ८ वाशीम. व खालील तीन शहरी ता. १ एप्रील १८९३ पासून तो कायदा अमलांत आणिला गेला. १ बुलढाणा २ यवतमाहाल ३ इलिचपूर सिव्हील स्टेशन. एकंदर या वरून असें दिसतें कीं सन १८९३–९४ सालीं वऱ्हाडांत ११ म्युनिसिपाल कमेट्या होत्या. या ११ म्युनिसिपाल कमेट्या पैकी १ उमरावती क्यांप, २ बुलढाणा ३ यवतमाहाल व ४ इलिचपूर सिव्हील स्टेशन येथील कमेट्यामध्यें लोकांनीं निवडलेले सभासद बसण्याचा त्याना मुळींच अधिकार दिलेला नाहीं. प्रत्येक म्युनिसिपालिटींत खालील प्रमाणें मेंबर्स लोकांची संख्या असते. उमरावती शहर, आकोला व इलिचपूर शहर येथें प्रत्येकी २४ मेंबर्स पैकी १८ लोकांनीं निवडलेले व ६ सरकारानीं नेमलेले. वाशीम १४ पैकी ९ निवडलेले व ५ सरकारानीं नेमलेले. खामगांव शेगांव आणि आकोट येथें प्रत्येकी १२ मेंबर्स पैकीं ९ लोकांनीं निवडलेले व ३ सरकारानीं नेमलेले. यवतमहाल येथें १४ हे सर्व सरकारातून नेमलेले आहेत. तसेंच इलिचपूरास सिव्हील स्टेशन व बुलढाना येथें १२ व उमरावती क्यांप येथें १० हे सर्व सरकारानीं नेमलेले आहेत. या वरील एकंदर मेंबरांपैकीं १३५ नेटीव्ह व ३१ युरोपियन्स होते. साधारणपणें म्युनिसिपालिटीची सभा महिन्यांतून एक वेळ तरी निदान भरली पाहिजे त्या प्रमाणें आकोले म्युनिसिपालिटीच्या १८९३–९४ सालांत ४२ सभा भरल्या सगळ्यांत जास्त ह्मणजे खामगांव म्युनिसिपालिटीच्या एकंदर ६२ व सगळ्यांत कमी ह्मणजे १३ उमरावती क्यांप कमेटीच्या मेंबर लोकांची हजर राहण्याची संख्या सरासरीचे मानानें शेकडा १३ असे. ही संख्या इलिचपूर शहर म्युनिसिपालिटीच्या सभेंत हजर राहणाऱ्या मेंबर लोकांची होय. व या कामांत त्या म्युनिसिपालिटीचा पहिला नंबर आला आहे. मेंबर लोकांची हजर राहण्याची सगळ्यांत कमी संख्या ह्मणजे उमरावती क्यांप म्युनिसिपालिटीची होय एकंदरींत सन १८९३–९४ सालीं सभेंच्या संख्येंत व त्यांत हजर राहणाऱ्या मेंबर लोकांचे संख्येंत आकोला म्युनिसिपालिटीचा नंबर २ रा लागला हें कळविण्यास आह्मास फार अभिमान वाटतो.

( पु० चा० )

पुण्यास निःपक्षपाताच्या निकालानें विख्यात झालेले सेशन जज्य मि. जेकब यांच्या अध्यक्षते खालीं गेल्या आठवड्यांत मुलामुलीच्या मुनसिपाल शाळेचा बक्षीस समारंभ झाला त्यावेळीं सर्व सभास्थान पुणेकरांनीं अगदीं फुलून गेलें होतें आणि सर्वतो मुखीं जेकब साहेबाचा जयजयकार होत होता. त्या न्यायी न्यायाधीशावर चहोंकडून पुष्पवृष्टी होत होती. सद्गुणाची वाहवा सर्वत्र होतेच पण अशा प्रसंगीं राजनिष्ठा व लोकप्रेम हीं चांगलीं व्यक्त होतात.

येत्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष नामदार आरधर वेब हे विलायतेहून निघाले असून सभेच्या वेळीं मद्रासेस दाखल होतील. मद्रासेस राष्ट्रीय सभेची बैठक दुसऱ्यानें यंदा भरणार आहे तिच्या व्यवस्थेवरून या सभेस पुष्कळ सभासद जमतील असा अंदाज दिसतो. राष्ट्रीय सामाजिक सभा त्या समयीं जी भरणार आहे तिच्या पुढें यंदा बारा विषय येणार आहेत. ही राजकीय व सामाजिक चळवळ अशीच कांहीं वर्षे सतत चालेल तर निःसंशय आपल्या देशाला उर्जित दशा प्राप्त होण्यास विलंब लागणार नाहीं.

नामदार न्यायमूर्ती रानडे यांनीं गेल्या ३० तारखेस युनिव्हरसिटीच्या परीक्षांत देशी भाषा हा विषय निबंधलेखनद्वारा घालण्या विषयीं सूचना आणिली होती. परंतु तिचा पाडाव पुन्हां अवघ्या खेपेस झाला हें कळविण्यास फार दुःख वाटतें. पारशी लोक अपवाद घेतात कीं गुजराथी भाषा आह्मांस कठिण जाईल कां कीं तिचें मूळ भाषा संस्कृत आहे परंतु मराठी भाषेची स्थिती गुजराथी प्रमाणेंच असून तो पुष्कळ अंशीं संस्कृत व पर्शियन या पासून बनलेली आहे तेव्हां हा अपवाद चांगलासा नव्हता. दुसरें, अभ्यास फार वाढतील ही भिती दर्शविण्यांत आली पण आह्मांस तसें वाटत नसून दुसरा एखादा विषय कमी जसला तरी तें आह्मांस बरें वाटलें असतें.

# The Berar Samachar

MONDAY DECEMBER, 10, 1894

### AGRICULTURAL LABOURERS AND THEIR FRIENDS NO. II

Last time we briefly reviewed the advantages of franchise to the

agricultural labour. We have also referred to his ignorance and to his famished state. In November 1891 Lord Salisbury said at Birmingham:—

"We believe that the greatness of this country has risen from its yeomanry and deeply regret that that yeomanry tends to disappear; and therefore, I think it is quite desirable that an experiment should be made, and if by any use of the public credit, we are able to increase the number of small proprietors in this country, I shall think it to be an enormous gain, in the first instance to our country, and in the second instance to the Conservative Party."

This is the sentiment of British statesmen for yeomanry. Here yeomanry has no existence. Even supposing it had it, the unnatural, and unreasonable sameness of pursuit would have undermined, "a bold peasantry their country's pride, when once destroyed can never be supplied!" The agriculture of this country has hopelessly sacrificed on the altar of "Free Trade" the benefit of the country at large.

Even in the matter of agriculture a good deal remains to be done. Our leaders must extend their sympathies to the agricultural classes. The use of machinery is to us like the forbidden fruit. Machinery cheapens, facilitates and increases labour. Manual labour has every where given place to machinery. Improved manures and methods have not been taken a free advantage of. The improved system of drainage converting the nature of fields and pastures and imparting to them any character has been lost sight of. No doubt these are all defects of ignorance. To 'pitchfork' into positions of business responsibility a number of men who have had no business training by means of State Funds; to set up men, as landowners and farmers, who have not proved their fitness for any thing better than the position of farm labourers by any special thrift or ability, and to make the other tax—paying ryot responsible for any losses that may occur, represents a flagrant outrage on our agricultural situation on the part of our rulers. It is then the business of our leaders to make the most of what we got under so many discouraging circumstances.

In the first place, no farm labourer can be made a farmer owing to the law of rent and land obtaining in India. Yet if proper steps and precautions were taken, the Government can raise the condition of the agricultural labour however indirectly by rendering certain agricultural knowledge, a necessary test at the time of granting a new lease. If Government be recognised as the landowner and it fix rent after certain periods of years however assailable this proceeding from some other points of view, it is the business of the Government, at least for its own benefit, if not for that of the ryot to render some professional tests an indispensable test for the issue of a fresh lease. This will necessarily render all aspirants for lease more qualified, no matter how slowly, for the duties and responsiblities they propose to enter into. Education therefore and professional training are in our opinion indispensable for our agricultural tenants whose better state will stimulate like qualities in labourers employed by them. This can only be done by a plan of instructions met by State Funds. Again during the hours of labour in the field the present condition of an agriculturist can hardly allow him to attend to such instructions. For this purpose some night or evening schools are needed.

What with professional training imparted on the plan of H. H. the Guickwar's territories, it is also necessary to enforce compulsory education on the masses. Native States are ever traduced to ridicule and our civilized rulers point to them only as specimens of misrule, barbarity, corruption and indifference to the real interests of their subjects. But the States of Mysore and Baroda are in fact opening the eyes of our benign rulers to a due sense of their responsibilities. The agricultural classes in the latter state and the scheme of compulsory education there are in vain, and helplessly envied by ourselves for our poor brethren!

Next and not the less stimulating will be the influence exercised by "franchise" a word with which we opened our leader in the last issue. Our government ever brags that the Local Fund cess is raised solely for affording increased facilities to agriculturists in carrying on their avocations! But who manages the Fund? How is its administration conducted? Does any of the so—called agriculturists know what articles of consumption some such things known as the Local Fund and the District Boards are? Whether these are edible or combustible substances. This franchise of returning members to Local Fund Committees is given to the agriculturist, say, our rulers. Yes it may have been. But of what avail is it to him in such a state of things? Is he ever taught to learn and respect his franchise. Has it been extended so as to render all possibiliiy of canvassing a nullity. If the State Fund is in a very inconsider—able part devoted to public education does the Government take care to see that it is directed towards fitting men for business? The masses are kept in dark. But they are not made to emerge into light.

This question brings us into direct side—questions regarding technical education. It is of such vital importance that it will for its own justification call forth volumes The sister non—regulated Provinces have an agricultural class and suboverseer's class, at Nagpur. They have also given a stimulus to carpentry, drawing, gardening and several other useful branches of pro—fessional love in their Middle Schools. Of technical education we have a great dearth in Berars. The Inspector General of Education in the Central Provinces, is responsible both to the Government and the public for whatever he may be doing. Hence during the past few years the Provinces have made rapid strides in literary as well as professional lores. The Director of Public Instruction of Bombay, so to say enjoys an immunity from public opinion. The Presidency is large. the castes and languages of the inhabitants are numerous, and the native press is slighted and public opinion almost set at naught. No doubt we have a technical school in Bombay, we have a drawing school there and we have every institution recognised in every faculty by the chief centre of learning. Yet to the origin of which of these institutions can Mr. Chatfield the long remembered veteran Director of the Province lay a just claim!

There is no passport to human respect and honor except virtue, wisdom, learning and character. Where these are wanting, no authority can ever command them. High moral strength, a strict adherence to principle, a steady tenacity of purpose, unflinching devotion to duty, power to appreciate though not counter—balanced by a power to reward merit, unselfishness, love for truth, a shrinking and shuddering contempt for abject sycophancy are all qualities necessary in a labourer as well as in any man. But such character is par—ticularly essential to business life.

Technical education, agricultural education and a moral education which would at once fit men for more work and for an extensive business are therefore the essential requisites at which all who wish to serve the labouring classes must aim. The means by which these can be secured must be found out, adopted and inculcated. Franchise and education moral as well as professional, whether voluntary or compulsory, tend to mould together the scattered elemenrs of all labourers into one harmonious whole. They foster and engender a spirit of patriotism a natural out—come of these and lend to perpetuate Society, the mysterious incorporation between the living and the dead.

Having briefly adverted to the direction which the friends of the labouring classes or their leaders must follow, we come to think of the means if we have any. In Germany we are told a third of the Public Revenue is devoted to Public Education. The education of children is compulsory there. The kingdom is to a great extent a military kingdom imparting military, moral. and technical education to the people by compulsory legislation.

Our rulers have taken up the reins of this vast empire to build up the mind—civilization of the natives of India. They profess to elevate us to the highest moral and mental civilization. They are also willing to forego India this very moment if the people can prove that they are able to build up an empire out of the chaos of caste—disharmonies of ignorance, of barbarity, of difference of lauguages—the curse at Babel's tower and of religious feuds!

---

## वऱ्हाड.

हायस्कुलांस लागूं केलेल्या वयाच्या सरक्युलरा अन्वयें ज्यांस हायस्कुलांत घेतलें जाणार नाहीं त्यांस इतर मिडलस्कूलांतील आठव्या नवव्या इयत्तेंत शिकण्यास हरकत नाहीं. शिवाय वयाची इयत्ता आठवीला १९ वर्षांची ह्मणजे पंधरा पुऱ्या वर्षांची समजावयाची. आणि अंगचा मंदपणा अगर अप्रबुद्धपणा या खेरीज इतर आकस्मिक व आगंतुक कारणामुळें ज्यांचा अभ्यास वयाच्या मुदतींत पुरा झाला नसेल त्यांस विशेष परवानगी पक्की चौकशी करून मे. डायरेक्टर साहेब देतील. रावसाहेब पटवर्धन यांनीं या सरक्युलरात पुष्कळ भाग आपल्या एकनिष्ठ खटपटीनें चांगला सुलभ केला आहे हें त्यांचे लोकांवर उपकार आहेत.

१८९४ चा तुरुंगाचा कायदा वऱ्हाडास लागूं केला.

रा० रा० गणेश बापुजी सिव्हील जज्ज वाशिम यास बहुतक प्रकरणांत डेपुटी कमिशनरचे कोर्टाचा अधिकार देण्यांत आला आहे.

सरकारी पैसा कर्जाऊ घेऊन पेंढीत जमीन लागवडींत आल्या नंतर दहा अगर अ-

शिशान रेसिडेंटाच्या परवानगीनें पंधरा वर्षांनीं जमाबंदीच्या वेळीं जमिनीची लागवडीमुळें वाढलेली किंमत लक्षांत घेतली जाईल.

यंदा पी. इ. च्या परीक्षेस ७६९ विद्यार्थी असून ३३६ पसार झाले त्यांत वऱ्हाडांतील खालील विद्यार्थी आढळतातः— रामचंद्र पुरुषोत्तम देशमुख, सदाशिव वासुदेव सोमण, गोपाळ रघुनाथ तळवळकर, सदाशिवहरी शेवडे

अशिशान रेसिडेंट मि. फ्लोडेन हे रजेवरून परत आपल्या कामीं लवकरच रुजूं झाल्यावर कर्नल मेकंझी हे रजेवर जातात किंवा काय करितात तें पहावें.

गेल्या २ रे तारखेस उमरावतीस जाहिरसभा भरून येत्या राष्ट्रीय सभे साठीं त्या जिल्ह्यातर्फे २१ व सार्वजनिक सभे तर्फे ९ असे प्रतिनिधी निवडण्यांत आले.

अकोला जिल्ह्या तर्फे मुखत्यार निवडण्या साठीं येथील धर्मशाळेंत येत्या रविवारीं जाहिरसभा भरणार आहे.

---

## जाहिरात

मुलुक अमानी हैदराबाद यांतील अबकारी ( दारू, ताडी ( शिंदी ), आफु आणि गांजा ) विक्रीच्या तारखा सन १८९५–९६ साला करितां खालीं लिहील्या प्रमाणें मुक्रर करण्यांत आल्या आहेत. एलिचपूर व उमरावती हे जिल्हे शिवाय करून बाकीचे जिल्ह्यांत दारू, ताडी ( शिंदी ), आफु, व गांजा यांजबद्दल मक्ते हरास होतील.

२. एलिचपूर आणि उमरावती या जिल्ह्यांत सदर भट्टींत सरकारी देखरेखी खालीं दारू उतरून ठरीव दरानें मक्त्यानें विकण्या बद्दल ( Still head duty, central Distillery and guaranteed minimum revenue system ) व्यवस्था राहील करितां तेथें फक्त ताडी ( शिंदी ), आफु व गांजा यांजबद्दल मक्ते हरास होतील.

३. आफू व तिच्या बनविलेल्या जिन्सा याचा मक्ता आणि गांजा व त्याच्या बनविलेल्या जिनसा याचा मक्ता वेगळा वेगळा हरास केला जाईल.

४. प्रत्येक हरास डिपुटी कमिशनर साहेबांचे कचेरींत दिवसा १२ वाजतां होईल.

बुलढाना—सोमवार तारीख २१ जानेवारीं सन १८९५

अकोला—सोमवार तारीख २८ जानेवारीं १८९५.

वाशीम— सोमवार तारीख ४ फेब्रुवारी १८९५.

वणी ( यवतमाळ )— मंगळवार तारीख १२ फेब्रुवारीं १८९५.

उमरावती— सोमवार तारीख १८ फेब्रुवारी १८९५

एलिचपूर— सोमवार तारीख २५ फेब्रुवारी १८९५

५. मक्त्याच्या व हरासाच्या शर्तीं संबंधाची माहिती जिल्ह्याचे कचेरींत मिळूं शकेल.

H. C. A. Szczepanski,
Officiating Commissioner H. A. D.

---

## वर्तमानसार.

निझामाच्या राज्यांत काटकसर चालू आहे. व त्यामुळें सरकारी चाकरींतले जे लोक रिकामे होतील त्यांस पुन्हा चाकऱ्या मिळेपर्यंत त्यांस पोटगीकरतां ह्मणून कांहीं नेमणुका देण्याचें निझामांच्या दिवाणांनी योजलें असून त्याकरतां २४,४०० रुपये मंजूर करून ठेवले आहेत असें सांगतात. आमच्या इंग्रजी अमलांत असा कांहीं प्रकार कधीं होतो काय?

आठ तास कडक लढाई झाल्यावर पोर्ट अर्थर जपानच्या हातीं आलें. या लढाईंत जपानच्या टारपेडोनी फार मारा केला.

जपानी फौजेनें पोर्ट अर्थर मोठ्या शहाणपणानें घेतलें.

जपानचा हल्ला झाला तेव्हां पोर्ट अर्थर येथें चीनचे १३,००० लोक होते, पण ते पळून गेले व जपान्यांनीं तेथील दारूखाना व कोठी आपल्या ताब्यांत घेतली.

चीनानें आपला पराभव झाला असें कबूल करून जपानाशीं तह करण्यास तयार व्हावें व जपानाने त्यास हात द्यावा अशी वेळ आली असें तिऱ्हाइतांचें ह्मणणे आहे.

फक्त सहा तासच चिन्यांनीं कडक लढाई केली.

जपानी फौजेच्या दुसऱ्या तुकडींतील फौज न्युचंगकडे जाण्यास निघाली.

इतक्यांत तहाचें बोलणे होऊन जर लढाई बंद झाली नाहीं तर आतां जपान वई वाई वाइवर जाणार.

जपानी फौज जी पुढें निघाली आहे ती हिरोशिवा हें ठिकाण घेऊन एकदम पेकीनवर जाणार, वई वाई घेण्यांत कांहीं महत्व आहे असें त्यांस वाटत नाहीं.

वझिरी लोक पुन्हा हल्ला करण्याच्या तयारींत आहेत. इकडे सरकारची तयारी चाललीच आहे, व गव्हरनर जनरल हे लाहोरास असतानाच वझिरी लोकांवर स्वारी करण्याचा निकाल लाविला.

बलुच अफगाणसरहद्द कायम करण्याचें काम चालूं आहे. २५० मैल पुरें झालें व आतां क्वेटा सरहद्दीवरील काम चालू आहे.

वझिरिस्थानावर स्वारी करण्याचा जो हिंदुस्थानसरकारचा बेत चालू आहे त्याकरतां जाटा व निळीकच येथें तारायंत्र सुरू करण्याची फार घाई चालली आहे.

दक्षणचिन डोंगरांतील बांगशी प्रांतांत इंग्रज सरकारच्या १५० लशकरी लोकांची एक स्वारी येत्या जानेवारींत जाणार आहे.

रशियन लोकांची एक अर्धवट लश्करी टोळी तिबेटावर जाण्याकरतां ताशखंडाहून निघणार असून त्याचा मुख्य कर्नल यानक आहे.

मांचेस्टरचें कापड एकदम सरळ मुंबईस यावें अशी मांचेस्टरच्या व्यापाऱ्यांनीं व्यवस्था केली आहे.

माधी हा पुष्कळ लोक जमवून कामसाला येथील इटालियन लोकांवर हल्ला करण्याच्या तयारींत आहे.

इटालीच्या उत्तरभागांत व रोमेलियांत धरणीकंप झाल्याची बातमी आली आहे.

अ० द०

बंगाल प्रांतांतील फरीदपूर जिल्ह्यांत दुष्काळाचें पूर्वरूप दिसूं लागलें आहे.

सात मुलें— झालवाड प्रांतपैकीं वानोद गांवीं नुक्तींच एका स्त्रीला एकवेळीं सात मुलें झालीं. त्यांत पांच मुलें व दोन मुली होत्या.

हीं सर्व मुलें शरीरबांध्यांत असावीं तशीं होतीं. परंतु लवकरच एका मागून एक मरण पावलीं.

दरिद्राची कमाल— सुरत येथील सोदागर वाड्यांतील एका स्त्रीनें आपली तीन महिन्यांची मुलगी आपणास खाण्यास नाहीं व मुलीचें पोषण करण्याची शक्ति नाहीं ह्मणून पोलीसच्या परवानगीनें, दुसऱ्या एका गृहस्थास दिली. पहा, हिंदुस्थानांत असे दरिद्र होत चाललें!

मुंबईं लष्करी खेळ व खोटी लढाई.— डिसेंबर ता० १७ पासून २० पर्यंत येथील व्यांडस्यांडच्या मैदानांत लष्करी व आरमारी लोकांत, दररोज नवे नवे खेळ व शेवटीं खोटी लढाई होणार आहे. या साठीं जारीनें तयारी चालली असून, लष्करी लोकांना पहाण्याची मोकळीक ठेविली आहे.

वझीरी लोकांवर हल्ला खालीं दर्शविलेल्या पलटणींस करण्यास यावा ह्मणून फरमाविलें आहे. त्या पल्टणी या:— १ ली ५ वि गुरखा पलटन, अबूताबाद पासून डेरा इस्माइलखानपर्यंत, ६ वी पंजाब पायदळ, कोहात पासून बानुपर्यंत, ५ वी स्यापर्स कंपनी, पेशावर पासून डेरा इस्माइलखान पर्यंत; २ री शीख पलटन, डेरा गाझीखान पासून डेरा इस्माइलखानपर्यंत; १ ली ४ थी गुरखा रायफल, मीनमीर पासून डेरा इस्माइलखान पर्यंत, ३६ वी शीख पलटन, मीनमीर पासून बानू पर्यंत, ४ शीख पल्टन, कोहात पासून बानू पर्यंत, ३७ वी डोग्रा पलटन, नोवेसरापासून बानूपर्यंत. येणें प्रमाणें चोहोंकडून गराडा घालून वझीरी लोकांवर हल्ला करावा असा हुकूम झाला आहे.

स. वि.

कापसाचे आरसे— अमेरिकेंत कापसाचे आरसे करून ते कधीं न फुटणारे असे रसायनिक प्रयोग करून तयार करण्याची युक्ति काढली आहे! अमेरिका काय करील तें सांगतां येत नाहीं.

टीप दगड— अमेरिकेंत टीप कागदाच्या ऐवजी एका प्रकारच्या दगडाचा शाई टिपण्याकडे उपयोग करूं लागले आहेत.

द० बा०

खटपट—बंगालचे लेफ्० गव्हर्नर सर चार्लस ईलियट ह्यांची मुदत भरली, ह्मणजे त्यांच्या मागून सर. माकडोनल हे सत्यप्रिय गृहस्थ गव्हरनर होण्याचा संभव आहे; तसें झाल्यास युरोपियन कामदारांचे गमजे चालणार नाहींत; ह्मणून त्यांच्या नेमणुकीस 'खो' घालण्याची खटपट युरोपियन सिव्हिलियनांनीं वगैरे चालविली आहे, व ह्या खटपटींत बंगाल्यांतील कांहीं जमीनदार गोवण्याचा प्रयत्न चालला आहे, असें 'संजीवनी' पत्रांत लिहिलें आहे.

धूमकेतु— फक्त सूर्य मालेंतच एकंदर १॥। कोटी शेंडी नक्षत्रें आहेत असें मोठाल्या ज्योतिर्विदांनीं अनुमान काढलें आहे. अबब!!

अपूर्व गोमाता— पुणें येथें एक गाय आणिली आहे, तिला ६ पाय, दोन गुदद्वारें ८ आंचूळ; व २ जननेंद्रिय आहेत. ह्या गाईचें प्रदर्शन उद्यांपासून तेथें होत आहे.

स० शो०

## सर्व नजरबंदांच्या माकड चेष्टास ह्मणून पाडता येतें.

मी रस्त्यांत जेव्हां झोकांडे खात चालत असे तेव्हां लोकांनीं माझ्याकडे बोट दाखवून हिणवावें कीं पहा काय बेटा झिंगून गेला आहे आणि प्रथम दर्शनीं तुह्मासही खास त्यांच्या सारखेंच वाटलें असेल. परंतु ते सर्व चुकत होते. भररस्त्यांत मला चालतांना झोंकांड्या येतात ह्मणून आपण मला विचाराल तर त्याचें समर्पक उत्तर देण्यास माझ्या आयुःक्रमाचे पूर्व भागावर थोडेसें गेलें पाहिजे.

आज तागाईत एखाद्या आनंदी व रंगेल मनुष्याप्रमाणें मी सुखी प्राणी होतों परंतु चार पांच वर्षांपूर्वीं मला वाटूं लागलें कीं माझ्यांत कांहीं तरी कमी जास्त होत आहे. जेवतांना पूर्वींसारखी माझी क्षुधा राहिली नव्हती. मला भूक लागे व खाण्याची इच्छा होई परंतु तोंडांत घास गेला कीं लागलीच पक्वाशय उमळून येई व जसें कांहीं वेडावा करून माझ्या हेतूस ह्मणून पाडी हें मला अरिष्ट नवीनच. व त्याचें मला मोठें आश्चर्य वाटे. मी जेव्हां ह्मणून खाण्याचा आव घाली तेव्हां तेव्हां मला फारच तिटकार येई. कदाचित पोटांत कांहीं अन्न गेलें तर तें अन्न किंवा मांस न वाटतां एखाद्या शिशासारखें जड वाटे त्यामुळें जिनापाला जातांना आपल्यास जशी सुस्ती चढून थकवा येतो त्याप्रमाणें मला होत असे. ह्यामुळें रात्रीं झोंपेचा कल अगदीं बदलला. झोंप थोडी पण चांगली येई. कधीं कधीं बरोबर येत नसे, व धुंद झाल्यासारखें मला वाटल्या मुळें मी केव्हां केव्हां अफू किंवा इतर अमली पदार्थ घेत असे. मी जीभ पहातों तों तिच्यावर थर जमलेला आणि काम करण्याचा हौस बिलकूल नाहींशी झालेली असे.

माझ्या बरगड्यांत आणि पाठींत सपाटून दुखत असे व कधीं कधीं ह्या वेदना खांद्यांत भाला टोचल्या सारख्या वाटत. मी आरशांत पाहिलें तों माझे डोळे पिवळे दिसूं लागले. आणि माझ्या दांत व हिरड्या सभोंवतीं कीट जमलेला दिसे व मुखमार्जन करण्यास पाणी न मिळाल्या मुळें किंवा इतर साधनें दांताजवळ नसल्यामुळें माझ्या तोंडाची घाण फारच येई. माझा कोठा फारच जड झाला आणि पक्वाशयांत घाणेरडा वायू उत्पन्न होऊन तोंडावाटे ढेंकर देतांना जिवून जाई. ह्या वेळेस मला किती वाईट वाटत होतें हें मी कधीं विसरणार नाहीं. ह्या वेळीं रस्त्यांत चालत असतां एकदम घेरी यावी, हल्लक वाटावें. आणि गरगर फिरल्या सारखें वाटून झोंकांड्या देत चालावें व जमिनीवर सबशेल पडून नमस्कार घालावा लागत असे. माझ्यानें हें विघ्न जितकें टाळतां येईल तेवढें टाळून येई व आतां तें गेलें असें समजून तो दिवस घालवीत असे.

माझ्या मित्र मंडळींनें व वैद्यानें जीं जीं औषधें घेण्यास सांगितलीं तीं तीं घेतलीं. त्या पासून गुण न येतां मी अगदीं सुदामदेव झालों. व आतां ह्या वस्तीस रामराम ठोकून परलोकचा रस्ता धरावा, असें मला वाटूं लागलें. ह्या प्रमाणें माझा क्रम चालला होता.

आतां मी तुह्मास थोडक्यांत निवेदन करितों कीं बरा कसा झालों ह्याचें कारण आपणास कळवावें हें अगदीं रास्त आहे. लंडनांत माझा एक स्नेही होता. त्याच्या कानावर माझी गोष्ट पडल्या बरोबर त्यानें सांगितलें कीं मदर सिजेलचा रोगहारक सिरप (ह्मणजे माता सिजेलचा रोगहारक पाक) तुह्मांस फारच गुणकारी होईल.

माझा कांहीं त्याच्या ह्मणण्यावर भरंवसा बसेना. परंतु एक बाटली तर थोडे दिवस घेऊन पहावी ह्मणून विचार केला. मला ह्या औषधा पासून इतका जलद गुण आला कीं मला खातांना बरें वाटावें व झोंप चांगली यावी. मला हें पथ्यावर पडल्या मुळें इतकें बरें वाटलें कीं मी ह्या औषधाच्या आणखी चार बाटल्या पार केल्या.

मी बरा झालों. हें औषध दैविका सारखें वाटलें मला खचित वाटलें कीं हें औषध ईश्वराच्या प्रेरणेनेंच मला मिळालें.

मी आतां पुन्हां ताजा तवाना झालों व त्या मुळें ज्या मला आनंदाच्या उकळ्या फुटल्या त्या सांगतां पुरवत नाहींत. आतां केव्हां तरी थोडेसें अपचन झालें कीं, (जें सर्वांस होत असतें,) त्या वेळेस मी ह्या औषधाचा लहान घोट घेतों व लागलीच मला त्या पासून आराम वाटतो.

ह्याचा तत्काळ गुण आल्यामुळें मला नजरबंदीच्या खेळाची आठवण होत परंतु खरोखर माता सिजेलच्या क्युरेटिव सिरपांत डोळ्यांत माती टाकण्या सारखा कांहीं प्रकार नाहीं. मला अनुभवावरून खात्रीनें सांगतां येतें कीं कितीही जुनाट अग्निमांद्य व अजीर्ण अगदीं वाईट स्थितीपासून असो तरी ह्या औषधा पासून हटकून गुण यावयाचाच.

मी तुमचा उपकार मानणारा.

(सही) जे. सी. सिमसन.

२१ ह्यानोवरचा रस्ता, न्युकासल अंडर लाईन, स्टाफर्ड शियर इंग्लंड

B. T.


## घड्याळ.

कि. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे (ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक बिलोरी काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—

गोविंद महादेव पोळ

वाच मेकर

नाशीक


☞ हें पत्र आकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

Single copy.......................... 4 as

सालअखेर, „ ७ „ १८८
किरकोळ अंकास ................ ८४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.... ८१८६
दुसरे खेपेस ........ ८१

# वऱ्हाडसमाचार.

Advertisement
Below 10 lines... 2 Rs.
per line over 10... 4 as
Repetition perline 3 as

THE BERAR SAMACHAR

VOL XXVIII AKOLA MONDAY 17 DECEMBER 1894 NO. 49

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख १७ माहे डिसेंबर सन १८९४ इ० अंक ४९

ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED ANE STRENGTH MAINTAINED.

जा. बी. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या पुतळया, कडीं, लखण्या व गळपट्ट वगैरे.

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे.




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग, अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें, फेंपरें, हातपाय मळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धशिशि, मस्तकशूळ, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पार्ठीतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, जलकर्णी, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा–लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन मुलें निर्विघ्नपणानें निघतात लेखणी— हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सेंप इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्या पासून रोगी बरें झाले आहत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सान्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपट्टा किं. रु. १॥ |

केवर पट्टा किं. रु. ५

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाटवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

## जी. बी. नाईक आणि कंपनी.

मुंबई, भायखळा जुन्या द्रावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालूं असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकास भुसारी, कापड, फरनीचरचें जातींचें सामान, लांकूड, लोखंड, किराणा, हार्डवेर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कसोशीनें व त्वरित पाठवूं एकवेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा मावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवून मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

## तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट, मुंबई.

वऱ्हाडसमाचार

मिती मार्गशीर्ष वद्य ५ शके १८१६

चीन व जपान यांच्या मध्यें तहाचें बोलणें चाललें आहे हें सुचिन्ह होय. चीनचें अफाट व अव्यवस्थेशीर राज्य जपाना पुढें टिकाव धरूं शकत नाहीं. चीननें तह केला नाहीं तर जपानाचें वर्चस्व न होऊं देण्या साठीं युरोपियन व अमेरिकन राष्ट्रें उद्युक्त आहेत तेव्हां बाह्य राष्ट्रांचा शिरकाव न होईल तों पर्यंत ठीक!

सर डेनिस फिटझ प्याट्रिक पंजाबचे लेफटेनंट गव्हरनर यांचें असें मत आहे कीं लोकांच्या पैशाचा विनियोग सरकारी अधिकाऱ्यांच्या सन्मानार्थ व पाहुणचारार्थ व्यर्थ केला जाऊं नये. परंतु संस्थानिकां कडून वर्गण्या पटकावून ज्यांचा पुतळा बनला जात आहे असें मुंबईचे गव्हरनर लार्ड हारिस हे स्वतः सारख्या अधिकाऱ्याचा पाहुणचार करण्या करितां सार्वजनिक पैसा खर्चीं घालावा ह्मणून गुजरायेंतील म्युनिसिपालिट्यांस आज्ञा देत आहेत. हें नवल नव्हे काय! भडोच व सुरत म्युनिसिपालिट्यांवर या प्रकरणांत हायकोर्टाकडे फिर्यादी चालल्या आहेत. अशा गोष्टी चांगल्या निकालास लागल्या खेरीज मुनिसिपल सभासदांच्या ह्मणण्यास चांगलीशी वळकटी येणार नाहीं. आणि तों पर्यंत अधिकाऱ्यांची पातशाही बंद होणार नाहीं!

१८९३–९४ मध्यें एकंदर म्युनिसिप्यालिट्यांचें उत्पन्न ५०८४८२ रुपये १४ आणे ५ पै होतें. पैकीं खुद्द आकोला म्युनिसिप्यालिटीचें २०२१९०–१५–६ होतें. ह्यांत २५०६८–१४–६ शिल्लक ता. १ एप्रील १८९३ व पुढील उत्पन्न १७७१२२–० ११ मिळून २०२१९०–१५–५. म्युनिसिप्यालिटीला उत्पन्नाचे एकंदर सहा मार्ग आहेत ते खाली लिहिल्या प्रमाणें.

१ म्युनिसिप्यालिटीतील दर व कर ह्यांत खालील गोष्टीचा समावेश होतो. घरपट्टी, जमीन पट्टी, ढोर पट्टी, गाडी पट्टी, व्यापार व इतर धंद्या वरील कर, सडके वरील पट्टी, पाण्या वरील कर व भंगी पट्टी.

२ काहीं विशेष कायदा खालील उत्पन्नें ह्यामध्यें कोंडवाड्याचें उत्पन्न ह्याचा समावेश होतो.

३ म्युनिसिपाल मालमत्ता व त्या वरील अधिकार ह्या पासून होणारें उत्पन्न ह्या मध्यें खालील गोष्टींचा समावेश होतो. बंगले, धर्मशाळा, घरें व जमीन ह्या पासून उत्पन्न होणारें भाडें, जमीन व तिच्या उत्पन्नाच्या विक्री पासून होणारी मिळकत, कान्सरव्हन्सी पासून होणारें उत्पन्न, शाळांतून होणारें उत्पन्न व फी, दवाखान्या पासून होणारें उत्पन्न व फी, बाजार व कसाइखान्या पासून होणारें उत्पन्न व फी, किरकोळ उत्पन्न.– म्युनिसिपल कायद्यान्वयें केलेले दंड, व ठेवी पासून उत्पन्न होणारें व्याज.

४ कांहीं विशेष सर्व व साधारण कामासाठीं दिलेल्या देणग्या.

५ किरकोळ उत्पन्नें. ह्यांत खालील गोष्टींचा समावेश होतो. सड्या वरील कर, जागल्या संबंधीं कर, खानगी मनुष्याचें काम केल्या बद्दल मिळणारें उत्पन्न व कांहीं इतर गोष्टी पासून होणारीं उत्पन्नें.

६ न कळत पुढें येणारा खर्च व कर्ज घेणें वगैरे गोष्टी येतात.

कलम १ ह्यांत एकंदर म्युनिसिपालिटींतून झालेलें उत्पन्न.

१००६२७–७–७ ह्यांत खुद्द अकोलें म्युनिसिपालिटीला सरासरी प्रत्येक माणशीं ९ आणे ११ पै पडलें.

वऱ्हाड म्युनिसिपाल कायद्या प्रमाणें खालीं लिहिलेले कर बसविले असतां चालतील.

१ घरें व जमिनीवर पट्टी

२ म्युनिसिपल हद्दींत राहून एखादा धंदा, कला अगर व्यापार करणाऱ्या मनुष्यावर पट्टी.

३ गाड्या बसण्या साठीं; गाडी साठीं अगर ओझें वाहण्या साठीं बाळगलेलीं जनावरें व म्युनिसिपल हद्दींत बाळगलेलें कुत्रें, ह्या वरील पट्टी.

४ वर लिहिलेल्या गाड्या, जनावरें वगैरे जीं म्युनिसिपल हद्दींत प्रवेश करितात त्यावर पट्टी.

५ खासगी नोकरी पतकरणारे लोकांवर पट्टी.

६ जनावरांचें मांस अथवा इतर माल अगर दोन्ही, ज्यांचा खप होण्यासाठीं म्युनिसिपाल हद्दींत आणिली जाऊन ज्यांचा तेथें खप होतो त्यांवर पट्टी

७ दुसरा कोणताही कर, ज्या बदल मे. रेसिडेन्ट साहेब अगर गव्हरनर जनरल साहेब यांची मंजुरात मिळाली आहे

८ भंगी पट्टी

९ पाण्या वरील पट्टी.

ह्या पैकीं दोन कर अकोलें म्युनिसिपालिटींतील लोकांवर बसले आहेत. एक कर नंबर ७, जे लोक म्युनिसिपाल हद्दींत राहतात अगर एखादा धंदा, व्यापार किंवा कला करितात त्यावर कर व दुसरा कर नंबर ८ भंगीपट्टी. आतां वर लिहिलेले कर कसकसे व कोठेकोठें बसविले आहेत ते पाहूं. कर नंबर १ हा फक्त दोन म्युनिसिपाल कमेटींत बसविला गेला आहे एक उमरावती कँप व दुसरी बुलढाणा. कर नंबर २ हा

कोठेंच बसविला गेला नाहीं कारण याचे ऐवजी बहुतेक याचेच सारखा दुसरा कर म्युनिसिपल कायद्याचे कलम ४१ (१) व या अन्वयें बसविण्यात आला आहे. कर नंबर ३ हा तीन म्युनिसिपालिटींत बसविला गेला आहेः उमरावती शहर म्युनिसिप्पालिटी, इलिचपूर शहर म्युनिसिप्पालिटी व बुलढाणा म्युनिसिप्पालिटी.

कर नंबर ४—५—६ हे कोठेंच बसविले गेले नाहींत

कर नंबर ७ हा बुलढाणा व उमरावती क्यांप म्युनिसिप्पालिटी खेरीज करून सर्व म्युनिसिप्पालिटींत बसविण्यांत आला आहे. कर नंबर ८ हा उमरावती शहर, आकोला, खामगाव, आकोट, ईलिचपूर शहर आणि वाशीम या म्युनिसिप्पालिटीतून बसविण्यांत आला आहे करनंबर ९ हा उमरावतीशहर, उमरावती कंप, खामगांव आणि बुलढाणा या म्युनिसिप्पालिटीतून बसविण्यात आला आहे. ह्या वरून दिसून येईल कीं म्युनिसिप्पालिटींसून एकच कर बसविला गेला आहे दोन कर बसविले आहेत अशा ४ म्युनिसिपालिटी आहेत यांतच अकोलें म्युनिसिपालिटीचा समावेश होतो. ३ कर बसविले गेले अशा तीन म्युनिसिपालिटी आहेत. ४ कर बसविले आहेत अशी एकच म्युनिसिपालिटी आहे व ती उमरावती शहर म्युनिसिपालिटी होय.

श्रीमंत महाराज शिंदे सरकार यांस राज्याभिषेक करण्याचा महोत्सव ग्वाल्हेरास होत आहे अशा सुसमयीं त्याच्या भावी उत्तम कारकिर्दीच्या दर्शक अशा कांहीं योग्य मनुष्यांच्या योग्य स्थळीं नेमणूका झाल्या आहेत त्यांत प्रोफेसर श्रीधर गणेश जिन्सीवाले यांस ग्वाल्हेर कालेजचे प्रिन्सिपालचे जागीं नेमले असल्या विषयीं आनंदकारक बातमी कळते. हे कट्टे सत्ववादी, विद्वान, व वक्ते आहेत. त्यांच्या सत्यप्रियतेनें त्यास बेरोजगारी व्हावें लागलें होतें परंतु अखेर सत्याचा विजय झाला हें कळविण्यास आनंद झाला. किंबहुना, संपदा गुणलुब्धच असतात.

रा. रा. बळवंत मनोहर पंडित हे एक सोलापूरचे सुखवस्तु गृहस्थ आहेत. ते हल्लीं आपल्या पत्नीसह अकोल्यास आले आहेत. यांनीं 'मयसंहिता' हा ग्रंथ मोठ्या प्रयासानें नेपाळ देशांत मिळविला आणि तो समग्र ग्रंथ मराठी भाषांतरा सहित ते प्रसिद्ध करित आहेत. मयसंहिता हा सर्व नानाविध विद्यांचा सारभूत कोश आहे अशी आख्यायिका आहे. या पुस्तकाला या प्रांतीं वर्गणीदार मिळवावे या हेतूनें त्यांनीं या प्रांतीं सफर काढिली आहे. तेव्हां अशा लोकोपयोगी व आश्रयास पात्र अशा पुस्तकांस यथाशक्ति आश्रय द्यावा हें निराळें सुचविण्याची गरज उरली नाहीं.

राजश्री बळवंतराव पंडित हे चांगले वक्ते असून कांहीं सामाजिक विषयांचें परिशीलन यांनीं बरेंच केलें आहे. यांच्या पत्नी सौभाग्यवती गोदावरीबाई ग्रंथलेखनांतही कुशल आहेत असें बोलतात स्त्रियांचीच स्वतंत्र सभा भरली तर त्या बायकांच्या उन्नती संबंधानें व्याख्यानही देत असतात.

गेल्या बुधवारीं व गुरुवारीं येथील लायब्ररींत राजश्री बळवंतराव यांचीं दोन व्याख्यानें झालीं. उभय दिवशीं अध्यक्षस्थान राव साहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन बी. ए. डायरेक्टर यांनीं मंडळीच्या आग्रहा वरून स्वीकारलें होतें. पहिल्या भाषणाचा विषय आपल्या देशाच्या सद्यस्थिता विषयीं होता. यांच्या बोलण्यांत चुटके, दृष्टान्त वगैरे बहुत असतात. बोलणें गोड असून यांच्या भाषणामध्यें करमणूक पुष्कळ होते.

सांपतच्या स्थिती विषयीं बोलतांना त्यांनीं सांगितलें कीं, ( १ ) अन्नवैपुल्यामुळें आपले वाडवडील वीर्यवान, कार्यदक्ष, धुरंधर व राज्यकर्ते होते परंतु हल्लीं तसा योग नसल्या मुळें आपली पराधीनता विशेष वाढली असून इंग्रज लोक आपल्या गुणैश्वर्यानें राज्य करीत आहेत. [ २ ] सध्यां आपल्या आचारविचारांत अर्थबोधाशिवाय कृति बहुत येत असतात आणि हा अर्थलोप धर्माच्या प्रकरणांत मनस्वी आढळतो. अर्थबोधा शिवाय क्रिया शून्याकार होते. फक्त अशा क्रियेचा कवाईती प्रमाणें तंत्रदृष्ट्या उपयोग जो असेल तो खरा. आपले धर्ममंत्र आपण पोपटा प्रमाणें उच्चारतों परंतु त्याचा अर्थ ठाऊक नसतो. सर्वजणांनीं खऱ्या भावानें ईश्वराचें भजनपूजन करण्यास शिकावें. ईश्वरी मुख्य गुण म्हणजे दया व न्याय हे आहेत. या दोन गुणांचें संमीलन आपल्या वर्तनांत ज्या प्रमाणानें वाढवेल त्या प्रमाणानें वाढविण्यास मनुष्यमात्रानें चुकूं नये. यथासांग कर्म घडलें नाहीं तर त्या कृतीमध्यें कांहीं पुण्यसंचय होत नाहीं.

( ३ ) अर्थशून्य क्रियेचें देव्हारें धर्मांतल्या प्रमाणें इतर व्यवहारांत देखील पुष्कळ वाढलें आहे. उदाहरणार्थ, घड्याळें पुष्कळ बाळगलीं आणि वेळेची किंमत ठाऊक नाहीं तर त्या घड्याळांचा संचय निष्फळ व भारभूत होय. मन हें आरशा सारखें आहे. त्याच्या पुढें जो पदार्थ येईल त्याचें प्रतिबिम्ब मनावर पडतें. आणि मनापासूनच आपल्या देहाच्या चलनवलनाला शक्ति मिळत असतात तेव्हां तें मन संस्कृत, न्यायशील व दयालू राखण्या विषयीं आपण प्रयत्न केला पाहिजे.

( ४ ) सध्यांचा काल आत्मोन्नति करण्यास फार उत्कृष्ट आहे. पूर्वींच्या वेड्या समजुती दूर होत चालल्या आहेत, विद्या प्रसार झपाट्यानें चालूं आहे, आणि राष्ट्रीय सभे सारख्या संस्था प्रगमनाला आपणांस बोध करित आहेत तेव्हां हाच पातकाल उत्तम आहे. आत्मोन्नति हाच सर्व सुधारणाचा मध्यबिंदु आहे. आपण सुधारलों तर आपलें घर, शेजारपाजार, गांव, प्रांत व देश सुधारला ही खूण प्रत्येकानें ध्यानांत धरली पाहिजे.

( ५ ) आपलें तनु, मन व धन हीच कायती मनुष्याची संपूर्ण इस्टेट होय. आपलें आयुष्यकमल फुलण्यासाठीं आपण या इस्टेटीचा यथाशास्त्र विभाग केला पाहिजे. प्रत्येक विभागांत वरील त्रितयांची मात्र फाटाफूट होता कामा नये म्हणजे सर्वत्र आपली क्रिया तनमनधन अर्पण करून घडत गेली पाहिजे. आपल्या इस्टेटीच्या विभागांत आपण सार्वजनिक गोष्टीचा वांटा ठेवीत नाहीं हें आपल्या वर्तनांत फार चुकतें

'हेंचि दान देगा देवा' या म्हणी प्रमाणें वक्त्यांनीं अखेरीस प्राचीन ग्रंथाची महती वर्णन करून आपल्या 'मयसंहिते' च्या पुस्तकाची खबर जमलेल्या लोकांस दिली.

व्याख्यात्याचें भाषण आटपल्यावरें अध्यक्षांनीं त्यांचे आभार मानले आणि आपली निकृष्टावस्था होण्याचीं दोन मुख्य व सर्वांगभुत कारणें त्यांनीं सांगितलीं कीं आपल्या लोकांमध्यें निरुद्योगीपणा फार आहे आणि ऐक्याभाव आपल्या वर्तनांत सर्वत्र आढळतो. वास्तविक मतभेदानें ऐक्य दृढ व पक्कें होतें आणि मतभेदाच्या खोट्या स्वरूपानें मात्र ऐक्य नष्ट होतें. आपल्या मताचा जसा आपणांस अभिमान वाटतो तसा आपण दुसऱ्याच्या मताचा मान राखला पाहिजे. विश्वकुटुंबांतले आपण भाऊ व लेंकरें आहों ही गोष्ट सार्वजनिक कार्यांत आपल्या मनानें विसरतां कामा नये. आणि आपणांमध्यें एकीचें तत्व वाढलें कीं आपणास राष्ट्रीयपणा निराळा बाहेरून कोठून आणावयास नको.

दुसरें व्याख्यान 'आपण व आपल्या स्त्रिया' या विषयावर झालें. या विषया संबंधानें राजश्री पंडित यांच्या भाषणाचा सारांश येणे प्रमाणें:—

( १ ) आपण वऱ्हाडी मंडळी जमलों आहों म्हणून उत्प्रेक्षेनें प्रस्तुत विषयावर पंडित म्हणाले कीं सुशिक्षित कुटुंब निपजण्यास सुबुद्धी व सदसद्विवेक या वधूवरांचें संलग्न आपण केलें पाहिजे. आपल्या आयुष्य कमलाच्या ठिकाणीं तनमनधन ही त्रिगुणात्मक देवता वास्तव्य करूं लागली म्हणजे धर्म, अर्थ, काम, व मोक्ष या चतुष्टय प्राप्तीच्या व्यापारबाहुल्यानें आपली व आपल्या राष्ट्राची उन्नति स्वयमेव होत जाईल.

( २ ) गृहस्थाश्रम फार धन्य आहे. संन्यासव्रत अत्यंत दुर्गम व कठीण आहे. तेव्हां ईश्वरप्राप्तीचा खरा व सोपा मार्ग म्हणजे गृहस्थाश्रम आहे. शस्त्र, धन, प्रकाश इत्यादिकांचा उपयोग होतो तसा दुरुपयोगही होऊं शकतो त्याच प्रमाणें विद्येची गोष्ट आहे. पुरुषा प्रमाणें बायकांस विद्या ( उच्च प्रतीचें शिक्षण ) शिकविल्या तर त्या प्रत्यक्ष देवता आहेत. गृहस्थाश्रमाचें मूळदैवत उद्योगशीलता आहे म्हणूनच तो फार थोर व धन्य आहे. पुष्कळ लोक आपल्या कुवर्तनानें गृहस्थाश्रमाची विटंबना करितात व असल्या विपर्यास पावलेला आश्रम सर्व दुःखांचा व आपदांचा गुहागार बनल्यास त्यांत कांहींच नवल नाहीं.

( ३ ) जो काल पावेतों विवाहित स्त्रीपुरुषांचें वयसंमीलन झालें नाहीं तों पर्यंत परस्परांवर आत्मसमीलनाच्या अभावा मुळें आत्मत्वाचा हक्क उत्पन्न होत नाहीं त्या अर्थी अशा पायरीला न पोंचलेल्या विधवांचा पुनर्विवाह यथाशास्त्र असून कालमानाला फार आवश्यक आहे.

नंतर अध्यक्ष डायरेक्टर साहेब यांनीं आपले अभिप्राय कळविला तो फार पोक्त बुद्धीचा, उदात्त विचारांचा व सरळ मार्गीचा होता. व अध्यक्षांचें भाषण अगदीं प्रेमळपणाचें व मोकळ्या मनाचें होतें. त्यांच्या सारखे वरिष्ट अधिकारी लोकां मध्यें वारंवार येऊन स्वानुभवांतले हितबोधाचे विचार लोकांस कळवितात हीच गोष्ट राव साहेब पटवर्धन यांच्या मोठ्या मनाची मुख्य खूण होय. रावसाहेबांच्या या स्तुत्य व आदराई कृती बद्दल आम्ही त्याचे फार आभारी आहों आणि त्यांचा कित्ता इतर उच्चपदास पोंचलेले लोक उचलतील असें आम्ही इच्छितों. राव साहेबांच्या संभाषणाचा गोषवारा आम्ही खालीं देत आहों:—

राजश्री पंडीत यांची भाषासरणी गोड व सुगम आहे, त्यांचे दाखले चांगले निवडक आहेत आणि त्यांच्या बोलण्यांतल्या आलंकारिक योजना आल्हादकारक वाटतात. त्यांच्या भाषणानें आपली करमणूक होऊन आपणांस चांगला बोधही होतो. व्याख्यानकारांच्या मेहेरबानीबद्दल त्यांचे आभार सर्वांच्या तर्फे अध्यक्षांनीं मानले.

( १ ) पंचवीस तीस वर्षांपूर्वीं गृहस्थाश्रमी लोक वाईट चालीचे पुष्कळ होते आणि तें प्रमाण राजश्री पंडिताच्या म्हणण्या प्रमाणें शेंकडा ९० देखील असेल परंतु सांप्रत दिवसें दिवस विद्येचा प्रादुर्भाव होतो तसतसे अवगुण कमी होतात. आणि सध्यां अध्यक्षांच्या मतें दुर्गुणी, विषयलंपट, व व्यभिचारी लोक पूर्वीं पेक्षां पुष्कळ कमी आहेत. निदान नव्या पिढी मध्यें ही व्यसनाधीनता कमी दिसते.

( २ ) हजार दहा हजारांत एखादा खरा साधु असेल परंतु सरळ व सोपट मार्ग म्हटला म्हणजे "प्रपंच साधुनि परमार्थसाधन जेणें केलें तो नर भलाभला" आपल्या वाडवडिलांची शरीरयष्टि मजबूत असून ईश्वर भजनांत त्यांचा कालक्षेप इतका होत असे कीं कांहीं गोष्टींत ते विरक्त व इच्छामरणी असत. परमेश्वर भक्तांचा कैवारी आहे तेव्हां त्याच्या कृपेकरितां आपण यथासांग पूजा अर्चा केलीच पाहिजे

परंतु हल्लींचा धर्म गारुड्याच्या खेळ सारखा झाला आहे. फक्त विधिमार्ग तंत्ररूपानें उरला आहे हें आपलें मोठें दुर्भाग्य होय ख्रिस्ती धर्माचा इतिहास पाहतां. त्यांतील धर्मग्रंथप्रथम ज्यू, लाटीन व ग्रीक भाषेंत होते परंतु वरील भाषांचा लोप झाला तेव्हां त्या ग्रंथांचें भाषान्तर होऊन धर्माची उन्नतीच होत गेली. आपल्या धर्मग्रंथांचीं भाषान्तरें व्हावयास पाहिजे आहेत. विद्यमान भाषांत धर्मग्रंथ नसल्यामुळें खऱ्या धर्मतत्वाची ओळख होत नाहीं. याचा दोष कांहीं वाडवडिलांवर नाहीं. धर्माचा सुबोध अर्थ कळविण्यास मार्गच नाहीं तेव्हां ते अर्थातच निरुपाय झाले. विद्वान शास्त्री मंडळीनीं धर्माचीं पुस्तकें प्राकृत भाषांत लिहून लोकांच्या समजुती घातल्या पाहिजेत. असें न होण्यास आपल्या लोकांची एक गैरसमजूत मूळाशी कारण आहे. धर्म ग्रंथाचीं भाषांतरें होऊं देत नाहींत इतकेंच नाहीं तर ते गुप्त ठेवण्याचा सर्वांचा कल असतो. परंतु हल्लीं सगळे ग्रंथ विलायतेंत जाऊन प्रकाशित होत आहेत आणि त्या योगें अडचणी दूर होत आहेत. प्राकृत माणसासाठीं विद्वानांनीं खटपटी करून धर्मप्रसार केला पाहिजे. हल्लीं घोकंपट्टी किंवा कवाईत आहे ती चुकीच्या शिक्षणाचा परिणाम आहे. आपण अधिक धर्मनिष्ठ होण्यास राजश्री पंडिता सारख्यांनीं धर्मग्रंथाचे सुरेख तर्जुमे केले पाहिजेत. उदाहरणार्थ, मयसंहिता हा ग्रंथ वाडवडिलांच्या हातून हरवलेल्या रत्नापैकीं एक रत्न आहे आणि अशा कोहिनूर सारखी संहिता लोकांच्या वाचण्यांत आणण्यासाठीं राजश्री पंडित यांस लोकांनीं यथाशक्ति साह्य अवश्य द्यावें.

( ३ ) श्रीमान लोकांचीं मुलें बहुधा गा-

इंट निघतात आणि तीं वडिलांनीं ठेविलेल्या संपत्तीचा अपव्यय करितात याचें कारण मुलांस सुशिक्षण दिलेलें नसतें. मुलांच्या स्वाभाविक कलांना योग्य शिक्षणमार्गी लावून त्यांस षड्रिपूच्या ताब्यांत जाऊं देतां कामां नये. शिक्षण न मिळेल तर तें मूल फुटक्या नशिबाचें मानलें पाहिजे. भाग्यशाली मुलास त्यांचे आईबाप दुनियेदारीला लायक करित असतात. आई बापांच्या हातून मुलांस हा कित्ता लागण्यासाठीं प्रथम आईबापांचेंच वर्तन पायाशुद्ध व द्रव्यार्जन सरळ मार्गांतलें असलें पाहिजे. न्यायानें मिळविलेल्या धनाला नेहमी बरकत असते. नाहींतर, सोरटी सोमनाथची अपार संपत्ती लुटणाऱ्या गिझनीच्या महमदास मरणकाळीं त्या धनाकडे पाहून फार लोभानें हळहळ वाटली व पराकाष्ठेचें दुःख झालें. देहाचा नाशिवंतपणा लक्ष्यांत ठेवून धनाचा हव्यास केला पाहिजे नाहीं तर धनसंचय म्हणजे जीवंतपणीं चितेवर असल्या सारखेंच आहे.

फार कशाला आपण सुशिक्षणानें सतत उद्योगी बनलों तर आपली गमावलेली राज्यरूपी धनदौलत परत राजीखुषीनें इंग्रज सरकार देतील. इंग्रजांचे मुत्सदी मंत्री आपल्या दरबारांत राहतील आणि आपण गुलामगिरींतून सुटून स्वतंत्र होऊं. आपण वरील शिक्षण मार्गानें एक झालों तर ही गोष्ट अगदीं स्वाभाविक आहे.

आपलें कर्तव्य आपल्या मुलाबाळा संबंधानें नुसता धनसंचय करण्यानें संपूर्ण होत नाहीं. आपण त्यांस लायक केलें पाहिजे. आणि नंतर वृद्धापकाळीं पुत्रसंक्रांतलक्ष्मीक होऊन प्रत्येकानें ईश्वरभजनांत आयुष्याचा उत्तरार्ध घालवावा हें फार चांगलें.

( ४ ) लोकस्थिती सुधारण्याला एकच उत्तम मार्ग विद्या प्रसाराचा आहे आणि तो स्त्रीवर्गाला देखील लागूं आहे. बाई असो कीं बाबा असो, खऱ्या विद्येचें स्वरूपच विनयसंपन्नता व मानमान्यता ही आहे. स्त्रीशिक्षण कसें असावें हा प्रश्न निराळा व गहन आहे परंतु, सध्यां चाललेल्या उहापोहावरून लक्ष्यांत येईल कीं प्रत्येकानें मरे पर्यंत विद्याव्यासंग ठेविला पाहिजे. आणि सतत नवीन नवीन गोष्टी शिकत असलें पाहिजे. शरीराच्या प्रत्येक अवयवांच्या शक्ति व मनाच्या शक्ति ज्या शिक्षणानें वाढतील तेंच शिक्षण उत्तम होय.

[ ५ ] आपल्या स्त्रिया जशा पतीला देव मानून अनन्यभावानें त्याच्या कल्याणाची काळजी ठेवितात त्या प्रमाणें आपण त्यांस देवी मानून त्यांच्या ठायीं सप्रेम मनोनिग्रह कायम ठेवून त्यांच्या सद्गती विषयीं काळजी ठेविली पाहिजे.

---

## The Berar Samachar

MONDAY DECEMBER, 17, 1894

Now that the sessions of the National Congress are close at hand let one remember what we are all about. We have to fight an uphill battle for the common weal but we would urge those in the hostile camp to recollect what Babu Surrendranath has once said about the nature of the National Congress once more.

'Black and White' is an English paper that once published an interview of one gentleman of its staff with the Hon'ble Babu Surrendra Nath Bannerji. The whole is a piece of real instruction which makes, through its masterly eloquence, a permanent impression upon a reader's mind. Perhaps the arguments may be old ones with the people but the vigour and force that sure and firm conviction lends to an argument to make it more attractive and more welcome even to the hearts of our foes have an original charm to claim repetition at our hands. Let one perceive how he convinces his visitor of the loyalty of the National Congress.:—

As to the loyalty of that body, he said: " So far from being disloyal, we Hindoos have more to lose by the disruption of the Empire than any other portion of the community, and the National Congress, as a crude, non—official Parliament, would do more to keep alive that feeling of loyalty than all the stiff, cut and dried red—tape, hide—bound chilly official councils put together. We want to be associated *with* our Rulers, not to supersede them. We want a policy of suspicion to be replaced by one of good—will and confidence. We want you English here; we require you, we cannot do without you." After explaining why Indians cling to the Radical party even though they do not agree with all it says, "If the Queen came to India she would receive such a reception as even she never dreamed of and I would place myself at the head of it, " said Mr. Surrendra Nath Banerjee.

Babu Surrendranath after having talked freely over a number of subjects concludes the sum-total of our demands upon the British Government with a clear attempt to dissipate delusion and false ideas about our movements in politics if they can be so termed. He says:—

"We do not want, in the smallest degree, to weaken the stability, the permanence, or the greatness of the British rule in India. We do not want Home Rule, as a Radical rather ignorantly suggested at a meeting which I once addressed in Plymouth in 1890. We do not want democratic institution; all that we require is that half the members of our Legislative Councils shall be elected and the other nominated as before and that we natives shall be allowed a fair share in the Government of our own country and of ourselves. We natives as Bradlaugh once said to me, must learn to help ourselves, God the father of the Universe will help us if we help ourselves; but above all we ask for sympathy, sympathy, sympathy !"

---

Mr. Roy a Bengali—officer sees the impoverishing effect on the peasantry of India of the unstable land-settlements and thus concludes his advocacy of a permanent system:—

"The land revenue of India is a branch of the administration which is so closely connected with the every-day life of the people, and so important in its political as well as its merely fiscal bearings, that it can never be treated, like salt or customs, as a mere item in a financial account. The welfare and contentment of the people depend upon the wise adjustment of the demand on the produce of the land. . . ." Unfortunately, however, "the welfare and contentment of the people" seem to have been lost sight of in the settlements of Madras and the North-West Provinces, while in Bengal the intentions of Government in making the permanent settlement have never been fully realised. Neverteless, as the late Lord Lawrence, when examined before the last Finance Committee, stated, the prosperity of Bengal is to be attributed chiefly, in spite of many blunders, to the introduction of permanent settlement rather than to the many miscellaneous causes usually assigned to account for it." India.

---

## वऱ्हाड.

अकोल्याचे प्रमुख गृहस्थ रावसाहेब देवराव विनायक यांनीं एक औद्योगिक शाळा स्थापण्याचें मनांत आणिलें आहे. नव्याच्या सर्क्युलरमुळें ज्या विद्यार्थ्यांचा अभ्यास कुंठला त्यांनीं या शाळेस जाऊन फिटरचें, सुताराचें किंवा लोहाराचें काम शिकावें ८।९-१० या इयत्तांतील इंग्रजी, मराठी व गणित हे विषय ही शिकविले जातील. अभ्यासक्रम साधारणपणें २।३ वर्षांचा होईल. प्रयत्न फार स्तुत्य आहे. परमेश्वर रावसाहेबांस यश देवो!

प्रमोदसिंधू वरून कळतें कीं मि. एल्डिडन साहेब रेसिडेंटच्या जागीं रुजूं झाले आणि कर्नेल मेकंझी रजेवर मुंबई कराची कडे गेले आहेत.

उमरावतीची वाक्वक्तृत्वोत्तेजक सभा तारीख १७ जानेवारी रोजीं भरणार आहे या सभेचे एजंट हायस्कूलचे विद्यार्थी असून अभ्यास गुंडाळून वर्गणी गोळा करण्याच्या व्यापारांत आकोल्यास दंग आहेत.

मद्रासच्या राष्ट्रीय सभेला धाडण्याचे मुखत्यार या जिल्ह्यातर्फे कालच्या जाहिर सभेंत मुक्रर करण्यांत आले.

---

## वाशिम.

१२।१२।९४.

( वाशीम जिल्ह्यांतील हालहवाल )

हवामान—थंडी विशेष पडत नाहीं. अभ्रें येतात. हिंवतापाचा आजार सर्व जिल्ह्यांत सुरू आहे. रबीचीं पिकें चांगलीं आहेत. खरीपाच्या पिकांची मळणी सुरू आहे.

मुनसीपालिटी—येथील मु. कमेटीनें तारीख ३१-१०-९४ मु. कायद्याचें कलम ४२ प्रमाणें नवीन कर [ स्कॅव्हिंजिंग टॅक्स—संफाईचा कर ] बसविण्याचें योजिलें आहे. हा कर कमेटीचे प्रथमचे ठरावाप्रमाणेंच मंजूर झाला तर ( १ ) जमिनी व घरें हीं वापरणाऱ्यांच्या कोणत्याही प्रकारच्या वार्षिक ५० रु. किंवा त्यापेक्षां जास्त उत्पन्नावर शेकडा १२ आणे प्रमाणें कर बसेल. मात्र अशा कराची रकम १२ रुपयांपेक्षां जास्त असूं नये. ( २ ) हा कर देणारांस जर कमेटीच्या नोकराकडून पायखाने सफा करविण्याची इच्छा असेल तर त्यांनीं वरील रकमेखेरीज शेकडा आठ आणे प्रमाणें जास्त रकम ( भंगीपट्टी ) दिली पाहिजे. ही रकम आठ रुपयांपेक्षां जास्त असूं नये. ( ३ ) पायखाना ह्या सदरांत युरोपियन किंवा युरेशिअन लोकांच्या रिवाजाप्रमाणें रहाणाऱ्या लोकांच्या शौच्याच्या जागांचा समावेश होऊं नये ( ४ ) ज्याचें उत्पन्न सालीना १०० रुपये किंवा जास्त आहे त्यांस खानगी पायखाना ठेवणें भाग पाडिलें जाईल. ( ५ ) खानगी पायखाना जर खानगी नोकराकडून सफा केला जात असेल तर तो बरोबर सफा होत आहे किंवा नाहीं हें कमेटी पाहील. ( ६ ) कमेटी ठरवील त्या नमुन्याचे व ठरवील त्या अटी प्रमाणें खानगी पायखाने असले पाहिजेत. ( ७ ) वरील रकमांत आठ आण्या पेक्षां कमी असा रुपयाचा भाग होऊं लागला तर आठ आणे व आठ आण्या पेक्षां जास्त भाग होऊं लागला तर पुरा रुपया समजला जाईल. हे मुख्य मुख्य नियम आहेत.

सन १८९५–९६ सालचे नू० बजेट कमेटीनें पास केलें त्यांत पुढील सालीं कमेटीनें बरेच झाडूवाले कमी केले आहेत. तसेंच गाई व बकरी मारण्या पूर्वी ती हास्पिटल असिस्टंट यांनीं तपासण्या करितां त्यांस दरमहा १० रुपये मिळत असत ते कमी केले. लायब्ररीस हल्लीं दरमहा १० रुपये देतात ते दरमहा पाच रुपये प्रमाणें बजेटांत रकम शेरीक केली आहे ह्या प्रमाणें बऱ्याच काटकसरी केल्या आहेत. वाशीम येथील बालाजीच्या तळ्यांतील गाळ काढण्याचे खर्चा करितां बालाजीचे दागिने कमेटीनें जप्त करविले होते. ते खर्चाची रकम कमेटींत भरून परत नेले. परंतु सदर्हू रकम बालाजीचे संस्थानापासून विनाकारण घेतली ह्मणून ती कमेटीपासून परत मिळण्या करितां कमेटीवर दिवाणी कोर्टांत संस्थानांतून फिर्याद होणार असल्याचे समजतें. येथें टाऊनहाल जनरलचा बगिच्याला पाणी नसल्यानें खराब होत आहे.

शाळा— येथील इं० म० शाळेचे कायमचे हेड मास्तर मि० पुरुषोत्तम गणेश हे सहा महिन्याचे फर्लो रजेवरून परत येऊन आपले कामीं रुजू झाले. व आफिशीयेटींग हेड मास्तर आणि येथील मराठी फर्स्ट अ० मास्तर यांची बदली वणी इं० म० शाळेचे हेड मास्तरचे जागीं ६० रुपयावर झाल्या प्रमाणें ते तिकडे निघून गेले. या वर्षीं येथील आठवे इयत्तेचे वर्गाकरितां ३०० रुपये भरण्याबद्दल बरीच अडचण पडली. परंतु रा० साहनी यांचे खटपटीनें रकम जमून खजिन्यांत जमा केली. तसेंच येथील शाळेस किंडर गार्टनची उपकरणीं विकत घेण्याकरितां रा० रा० सो. शामराव साहेब अभ्यंकर यांनीं मागें २५ रु० दिले होते; त्यास आणखी ३५ रुपये पाहिजे होते ते ही रा. सोहनी ह्यांच वेळेस जमा होऊन सदर उपकरणीं विकत आणण्या करितां सर्व रकम पाठविली. येथील देवपेट शाळेचे हेडमास्तरची जागा २० रुपयाची होती, ती २५ रुपयांची केली आहे त्या जागीं ह्याच जिल्ह्यांतील विठ्ठल येथील हेड ह्यांची नेमणूक झाली.

म. डे. ये. इन्स्पेक्टर साहेब ह्यांची स्वारी शिरपुर येथें आहे,

ले. मारिस अ. कमिशनर हे हिंगोली येथें आहेत.

खा. ब. शमशुद्दीन अली खान डे. कमि. हे आठ दिवसांचे किरकोळ रजेवर हैद्राबादेस गेले होते ते काल यावयाचे होते. परंतु अद्याप आल्याचें कळत नाहीं.

फारीष्टाचे नाकयांनीं लोकांस त्राही त्राही करून सोडिलें आहे.

उद्यां येथें लष्कर यावयाचें आहे त्याच्या सरबराईची गांवांत एकच गर्दी उडाली आहे. रयतेचा हा सरबराईचा रोग कधीं नाहींसा होईल तो होवो.

मे. डिस्ट्रीक्ट फारेस्ट आफिसर सा. मंगरूळ तालुक्यांत फिरत आहेत.

---

## वर्तमानसार.

उष्णतेनें लोखंड विस्तृत होतें; एफेल टावर थंडी पेक्षां उन्हांत ८ इंच लांब होतो.

गलबतांचें आयुष्यः— एक गलबताप्रीत्यर्थ निघालेल्या वर्तमानपत्रानें गलबतांचे आयुष्य खाली लिहिल्या प्रमाणें दिलें आहे. युनायटेड स्टेट्समध्यें १८ वर्षें, फ्रांन्सांत २०, हालंडमध्यें १२ जर्मनींत २९, ग्रेटब्रिटनमध्यें २९, इटलींत २७ व नार्वेत ३० वर्षे दरसालें शेंकडा ४ गलबतें नाहींशी होतात व शेंकडा ९ नवी होतात.

एक फ्रेंच कामगारानें एक बंदुक काढली आहे, तींतून 'व्हिट्रियल' तेल दोन हजार फूटांवर फेकतां येतें याचा उपयोग रानटी लोक जेव्हां अंगावर धुसून येतात तेव्हां चांगला होईल.

दिवस स्वच्छ जाणारा असला तर मधमाशा सकाळचें प्रहरीं तरतरीत असतात व ढगें येणार असला तर त्या थंड व मंद होतात. यावरून मधमाशा ह्मणजे हवामापक यंत्रच होत!

टामस आल्व्हा एडिसननें ६०० नवीन युक्त्यांची पेटंटें घेतलीं आहेत.

सेंट ओमर या नांवाच्या एका शोधक स्त्रीनें युरोप, एशिया व अमेरिका या तिन्ही खंडांमधून प्रवास केला आहे, परंतु तिजपाशीं सामान मुळींच नसतें. सर्व सामान ती आपल्या खिशांत ठेवते.

सुधारलेल्या देशांतील मुलींच्या लग्नाच्या वयाची इयत्ता सरासरीनें २९ वर्षे आहे.

कांच जगांत इ० स० पूर्वी २००० वर्षांच्या सुमारास माहीत होती.

लंडन शहरीं रोज ५७९११ खासगी पत्रें लिहिलीं जातात व यांना ३० ग्यालन शाई लागते.

हलींच्या चीनच्या बादशाहाच्या लग्नाला २०,००,००० पौंड खर्च झाला होता.

( अति मोठें मधाचें पोळें )

युनायटेड स्टेटसमधील केंटकी संस्थानांत एका खडकाला एक पोळें आहे. हें पोळें ह्मणण्यापेक्षां एक मोठी गुहाच आहे ह्मटलें तरी चालेल. ही गुहा उभी आहे तिची उंची १५० फूट आहे. तिचे तोंडावर मधमाशांनीं पोळें बांनून आच्छादुन टाकलें असून तींत मध सांठवितात, ह्मणजे ही एक मधाची विहिरच आहे. कालिफोर्नियामध्यें मि० हार्बिसन नांवाचा एक गृहस्थ मधमाशा पाळणरा आहे. त्यांच्या बागेंत ६,००० पोळीं आहेत. व त्यांपासुन दरसाल २,००००० रत्तल मध उत्पन्न होतो.

## सुएजचा कालवा

हा कालवा ८८ मैल रुंद आहे. यापैकीं ६६ मैल खणून काढलेला असून बाकीचे २२ मैल शेजारी असलेलीं तळीं वगैरे सामील करून केला आहे. हा कालवा खणण्याकरितां जी कंपनी निघाली होती, तिचे शेअर्स ४००००० होते. त्यापैकीं सुमारें निमे भाग ब्रिटिश सरकारनें विकत घेतलेले होते. ह्या कालव्याची खोली २८ फूट असून तळाशीं रुंदी फक्त १२९ फूट आहे. हा कालवा खणण्यास एकंदर खर्च १,७१,१८,७२९ पौंड आला. त्या कालव्यामधून व्यापार करणाऱ्या जहाजांमध्यें तीन, चतुर्थांश ब्रिटिश जहाजें असतात. हा कालवा सुरू झाल्यामुळें इंग्लंडाहून हिंदुस्थानात येण्याचा मार्ग सुमारें ४००० मैलांनीं कमी झाला आहे. इतका मोठा कालवा जगांत दुसरा कोठेंही नाहीं.

( तीन हजार अडतीस वर्षें कैदेची शिक्षा. )

इतकी वर्षें कैदेची शिक्षा ह्मणजे आहे तरी काय? असा प्रश्न वाचकांच्या मनांत तावडतोब उभा राहील. परंतु ही शिक्षा दिली ही कांहीं त्रेत युगांतील गोष्ट नाहीं. नुकती गेल्या सालच्या जुलई महिन्यांत घडलेली गोष्ट होय. आश्या येथील टॉन जासे गार्लिडो यांजवर खोटें कागदपत्र तयार केल्याचा व खोटी सही केल्याचा आरोप येऊन खटला झाला. हा खटला पार्लेशिया प्रांताच्या न्यायाधिशापुढें चालला होता. आरोपी गार्लिडो यांजवर २१७ निरनिराळे अपराधांची शाबिती झाली; व प्रत्येक अपराधाबद्दल १४।१४ वर्षें कैदेची शिक्षा झाली. ही शिक्षा एक संपल्यानंतर दुसरी, अशी झाली. ही शिक्षा एक संपल्यानंतर दुसरी, अशी भोगावी असा ठराव केला होता, परंतु इतकी काय!- परंतु याचा पन्नासावा हिस्सा वर्षें तरी त्या माणसाला कैदेंत राहतां आलें असतें कीं नाहीं, याचा न्यायाधिशांनीं बिल्कुल विचार केला नसावा, असें उघड दिसतें. अमेरिकेंतील टेक्सास शहरीं एका शहरच्या सरदाराचा खून केल्याबद्दल एकाला ९० वर्षें कैदेची शिक्षा झाली होती. आस्ट्रेलियात व्हिक्टोरिया वसाहतींत १८०१ सालीं १०१ वर्षांचा मनुष्य येथील तुरुंगांत मरण पावला, तो शेवटची ७१ वर्षें तुरुंगांत होता. तसेंच इंग्लंडचा राजा तिसरा वुइलियम याचा प्राण घेण्याचा बेत केल्याच्या आरोपावरून मेजर बर्नीडे यास ४० वर्षांची शिक्षा झाली होती.

( आजारी माकडांची सुश्रुषा. )

दिल्ली शहरांत यमुना नदीचा कालवा नेला आहे, त्याच्या बाजूला जीं झाडें आहेत त्यांवर माकडांचे थवेच्या थवे असतात. या कालव्याच्या आसपासची वस्ती फार दाट असल्यामुळें तेथील हवा फार खराब आहे व त्यामुळ तेथें तापसराई नेहमीं असते. तेव्हां तेथें असलेल्या माकडांपैकीं एखादें आजारी पडलें असतां, लठ्ठ माकडें त्याच्या जवळ टपून बसतात व संधि साधून त्याला कालव्यांत ढकलून देतात. तें लागलेंच बुडून मेलें नाहीं तर, तें वर आल्या बरोबर पुनः त्याला आंत ढकलतात. ह्मणजे आजारी माकडानें एक मेलें तरी पाहिजे किंवा त्या कळपापासून दूर तरी राहिलें पाहिजे.

(गाड्या मुळींच नाहींत.)

चीन देशांतील मोठें बंदर जें कंतान त्या ठिकाणीं गाड्या मुळींच नाहींत. कारण त्या शहरांतील रस्ते एकंदर ६०० आहेत, परंतु सगळे वाकडे तिकडे आहेत. या ठिकाणीं इकडून तिकडे जाण्याला खुर्च्या असतात व त्या भोई उचलून नेतात. मोरोक्को देशांतील मोठें बंदर जें टांगिअर शहर त्याची हीच स्थिति आहे. तेथील रस्ते अतिशय अरुंद असल्यामुळें गाढव, घोडे, व उंट याच वाहनांचा उपयोग करतात. क.

आर्मेनियांतील टर्कीच्या शिपायांकडून होत असलेल्या कत्तलीबद्दल चालु आहे त्याकरतां राशियानें आपल्या त्या सरहद्दीवर नवी १९,००० फौज रवाना केली आहे.

राशियानें आपल्या तीन लढाऊ गलबतांस चीनच्या सरहद्दीवर जाण्याचा हुकूम केला आहे.

निझामसरकारचा वार्षिक जमाखर्च पाहिला ह्मणजे जमेंतून खर्च वजा जातां ४॥ लाख शिलक राहातात. त्या सरकारास १९२ लाख कर्ज आहे असें सांगतात. सुमारें ३२ सावकार १०० वर्षांच्या पूर्वीचे आहत. एकंदर सावकारांचा नक्की आकडा करण्याकरतां एक कमिशन नेमलें आहे व त्यावरून कित्येक सावकारास कोर्टांत जाण्याबाचून कांहीं मार्ग नाहीं असें झालें आहे.

मुंबईचे प्रसिद्ध वकील मि. चंदावरकर हे पुण्याच्या स्टेशनावर फर्स्ट क्लासाच्या डब्यांत बसत असतां त्यांत बसलेल्या एका साहेबानें त्यांस बराच ठोक दिला असें प्रसिद्ध झालें आहे. ठोक देणाऱ्या साहेबाचें नांव ही बाहेर आलें आहे.

निझामचे माजी कामदार प्रसिद्ध मेदी अली यांस निझामानें घालवून दिल्यावर ते एकदम अलीबाग येथें गेले व पुढें हवा बदलण्यास मुंबईस आले. ते मुंबईस राहून निझामाच्या राज्यकारभांत कांहीं ढवळाढवळ करतात अशा संशयावरून २४ तासांत मुंबई सोडून जाणार नाहीं तर तुमचें पेन्शन बंद केलें जाईल अशी निझामांच्या दिवाणांनीं त्यास नोटीस केल्यावरून ते मुंबई सोडून निघून गेले.

निझाम सरकारचे हिशोबीवर्ष गेल्या अक्टोबरच्या ७ व्या तारखेस पुरें झालें त्या वर्षांचा हिशेब जमा ६,६४,१८०,४९ रुपये असून खर्च रुपये १,९२,७४,२४६ रुपये झाला व निवळ शिलक ४,४७,४३,८०३ राहिले असें सांगतात. यांत मागच्या वर्षाची शिलक १,०९,९४,४९६ असून त्यांत वऱ्हाडप्रांताच्या खर्चांतून शिलक राहिलेली ४६,४९,९९९ रुपये होती.

निझामसरकारचे दिवाण नवाब सर जा हे हवा पालटण्याकरतां फार मोठ्या परिवारासह हल्लीं मुंबईस येऊन आहेत. ठा० अ०

संस्कृत विश्व विद्यालय— भारत धर्म महत् मंडळाच्या खटपटीनें काशीस एक संस्कृत युनिव्हार्सिटी स्थापन होणार अशी सुवार्ता बाहेर आली आहे. या सत्कृत्या साठीं आज पर्यंत १७९००० रुपये वर्गणी जमली आहे असें समजतें.

हैड्रोफोबियावर औषध— कुत्रीं वगैरे पिसाळलेलीं जनावरें चावतात त्यावर १० वर्षांच्या अनुभविक एका जर्मन जंगल कामगारानें एक उपाय प्रसिद्ध केला आहे. त्यांत तो ह्मणतो कीं जखम गरम पाणी व व्हिनेगार यांनीं धुवावी, आणि वाढल्यावर तीव्र म्युरिआटिक आसिडचे कांहीं थेंब सोडावे ह्मणजे सर्व विकार नाहींसा होतो. शु. सु.

दोनसें रुपयांचा पगारदार युरोपियनची नेमणूक, स्टेट सेक्रटरी मार्फत होत असे ती आतां व्हाइसराय मार्फत होण्याचा हुकूम मिळाला.

म्यांचेस्टरच्या व्यापाऱ्यांचे डोळे आतांशीं उघडले कारण, हिं० सरकार जेव्हां सर्व जिनसांवर जकात बसवूं लागलें, तेव्हां अर्थातच कापडावरही ही घोरपड येईल ह्मणून आतां म्यांचेस्टरचे व्यापारी ह्मणू लागले आहेत कीं, मुळींच कशावर जकात बसवूं नये. शिवाय परदेशीय व्यापाऱ्याला या मुळें कमीपणा येऊं लागला आहे. हें सगळें पण खजिन्याची तूट भरून येण्यासाठीं युरोपियनांचा वटाव कमी करावा अशी सल्ला देण्यास व्यापारी लोक तयार आहेत काय?

इंग्लंड, फ्रान्स व राशिया या तीन राज्यांनीं एकत्र होऊन तह करावा व एक मतानें वागावें अशाबद्दल कांहीं फ्रेंच पत्राच्या शिफारसी चालल्या आहेत. असें झाल्यास हा त्रिफळा सगळ्यांना रेचकारक होईल यांत संशय नाहीं?

फ्रान्सच्या तिजोरींत चांदी कमी करून सोनें वाढविण्याचें काम चाललें आहे. व अमेरिकेंत लौकर आणखी रुप्याचें नाणें करण्याचें ठरलें असें अनुमान दिसूं लागलें आहे.

चीन व जपानची लढाई

लढाई एकदांची संपवून टाकावी अशा विवंचनेत चीन आहे. परंतु जपान, आपल्या अटी भक्कम रीतीनें कबूल करून घेतल्याशिवाय लढाई आटोपत नाहीं. खर्चीबद्दल वाळीस कोटी येन नाणें व ताब्यांत घेतलेल्या मुलखावरचे स्वामित्व इतकें मिळेल, व त्यांच्या जामिनाविरीसाठीं पेकीन शहर किंवा दुसरी मजबूत वचनें मिळतील तरच जपान तह करून लढाई बंद करील असें ह्मणतात.

वझिरी व इंग्रजी यांची लढाई

अफगाण सरहद्दीवरील वझिरी लोकांवर हल्ला करण्या साठीं इंग्रजाची जी तयारी झाली आहे त्यांत दानूजवळची लष्करी तुकडी, ब्रिगेड जनरलच्या अधिपत्याखालीं आणि [illegible] येथील तुकडी, जनरल सर विलियम लॉक हॉर्ट यांच्या अधिपत्याखालीं राहण्याचें तजवीज झाली. वझिरी लोकांचीही तयारी जारीनें चाललेली दिसते. ते लोक बोलून चालून रानटीच असल्यामुळें त्यांना सर्व रान हें च घर असून टोळ्याटोळ्यानें घाले घालणें हेंच लढणें आहे. या लढाईच्या धास्तीमुळें डेरा इस्माइलखान येथील नाचरंगाचा समारंभ बंद ठेवण्यात आला होता. वानू येथील इंग्रज छावणींत वझीरी लोकांनीं जो छापा घातला होता, तो फार भयंकर व चमत्कारिक होता त्या वेळीं जे वझीरी लोक पकडण्यांत आले, त्यांच्या अंगावर कमेसरिएट खात्यांत ल्या घावली सांपडल्या. त्या स्वारी पूर्वी बक्षीस दिल्या पैकीं असाव्या असा एक तर्क आहे.

महसूद जिरगा या वझीरी मनुष्याच्या टोळीनें, ता० १२ पर्यंत विचार करण्यास इंग्रजांजवळ मुदत मागितली आहे. मुल्ला पोविंदा याच्या सल्लामसलतींत इंग्रज गुंतले आहे. तथापि इंग्रजही लष्करी तयारींत असून त्या रानटी लोकांच्या टोळयाही जागजागी टपून बसल्याबद्दलच्या बातम्या येत आहेत. वानू येथें झालेल्या हल्ल्यांत गुरखा पलटणीच्या लेफ्टनंटला मृत्यु मुखीं पडावें लागलें; त्यामुळें त्याचें प्रेत मोठ्या समारंभानें पुरण्यांत आलें.

लंडनच्या तालमींत बायका देखील तालीमबाजी करीत असतात.

मुंबई किंवा एकंदर हिंदुस्थानाशी व्यापार वाढविण्याबद्दल आस्ट्रेलियांतील व्यापाऱ्यांची खटपट जारीनें चालली आहे. स. वि.

---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.


जी. बी. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळया, कडीं, लेखण्या व गळपट्टे वगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर वि-
कल्पा, रोज पुष्कळ
खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों
दाखले मिळाले आहेत
व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें फेंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धांशीशी, मस्तकशूल, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा-गनकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा–लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात. लेखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरे झाले आहेत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २१ | रेशमी गळपटा किं. रु. १॥ |

केबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्यांचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

जी. बी. नाईक आणि कंपनी.

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईत फार दिवसांपासून चालूं असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकूड, लोखंड, किराणा, हॉर्डवर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कसोशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कामिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवून मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्त्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट. मुंबई.

नमुना [ जी ]

नादारी मुकदमा नंबर ४ सन १८९५

विद्यमान नादारी कोर्टाचे ज्यडज जिल्हे अकोलें.

सर्व धनको यांस नोटीस देण्यांत येते कीं ... व० अंबूजी शिंपी राहणार उमरी ता. लुके अकोट हा नादारी आहे असा आज तारिख ९ माहे ३ सन १८९५ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख ६ माहे ४ सन १८९५ हा दिवस नादाराचे सावकारानीं नेमण्याकरितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटकेविषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटकेसंबंधी ज्या सावकाराची तकरार सांगण्याची इच्छा असेल त्या सावांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तकरार सागणें असेल ते व त्याजबद्दल ज्या साक्षीस समन्सें करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमुद करावीं. ही नोटीस नेमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांना पहाण्याकरितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्या नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी व ते दावे खरे असल्याबद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दुरचे राहणार असतील त्यांणीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी. आणि ती यादी टपालाकडून कोर्टास पाठवावी ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील ता. १३-३-९५ इ०

P. Govindraj.
Judge
B. Court
Akola District.

नमुना ( जी )

नादारी मुकदमा नंबर ३ सन १८९५

विद्यमान नादारी कोर्टाचे जज्ज जिल्हे अकोला.

सर्व धनको यांस नोटीस देण्यांत येते कीं पुरुषोत्तम अच्युतराव देशपांडे राहणार बाळापूर हा नादारी आहे असा आज तारीख २ माहे ३ सन १८९५ इसवी रोजीं ठराव झाला आहे. आणि तारीख ६ माहे ४ सन १८९५ हा दिवस नादारीचे सावकारांनीं नेमण्या करितां आणि सावकारांनीं आपले तर्फेचा असायनी नेमून देण्या करितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा निकाल करण्या करितां नेमला आहे.

नादारीच्या सुटके संबंधी ज्या सावकाराची तकरार सांगण्याची इच्छा असेल त्या सावांनीं त्याबद्दल आठ आण्याच्या स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जानें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तकरार सांगणें असेल ते व त्याजबद्दल ज्या साक्षीस समन्से करण्याची इच्छा असेल त्या साक्षीदारांचीं नांवें नमुद करावी. ही नोटीस नेमण्या करितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वीं दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्या करितां नादारानें दाखल केलेल्या यादी उघड्या ठेविल्या आहेत. ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपांवर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असल्याबद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्याजवर अर्जदारानें आपली सही केली पाहिजे.

जे सावकार दूरचे राहणारे असतील त्यांनीं आठ आण्याचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशिअल आफिसरापुढें तिच्या खरेपणा विषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालाकडून कोर्टांत पाठवावी. ह्मणजे दावे रजिस्टरांत दाखल होतील.

P. Govindraj
Judge
Bankruptcy Court
Akola District.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ प्रमाणें

( वर्ग १५ ) दि. कि. मि. नंबर $\frac{३}{१८९५}$

दिपुटी कमिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव मोतीलाल

बापाचें नांव गिरधरचंद मारवाडी

राहणार वानोसा तालुके दर्यापूर

जिल्हा एलिचपूर यास मयत.

रेणुकाबाई जवजे सिवलाल मारवाडी राहणार खल्लार ता. दर्यापूर जि. एलिचपूर यांनें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकेट मिळावें ह्मणून सदर्हु अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांणीं तारीख १० माहे एप्रिल सन १८९५ इसवी रोजीं परतवाडा अगर स्वारी असेल तेथें सदरहु अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख १ माहे मार्च सन १८९५ ई०

H. Godwin Austen
Offg. Deputy Commissioner
दि० जज्ज एलिचपूर.

## घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत ) चावी देण्यास मोगरा, कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक बिलोरी कांचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।१२ वर्षे दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता–
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक

नोटीस.

रा. रा. टिकमदास सुंद नीम जमनादासभय्या व चुनिलाल दुकान मुराहणार आकोला—यांस नेलाल गुलाबचंद

खालीं सही करणार यांज

खानवर्ये कळविण्यांत येतें कीं, कडून या लेनामें शिवलाल साहेबराम व माझा माझे चुलते क व शिवलालचा दत्तक मुलगा बनसिलाल हे उभयतां मरण पावल्यामुळें स्थावरजंगम इस्टेटीच्या अफरातफरीचा मोठी भिती पडली आहे तथापि दुःखांत सुख एवढेंच कीं, तुह्मा उभयता जवळ मिळून मुरूप तिजोरी, तिच्या किल्या, कपडालत्ता, इतर मौल्यवान चिजवस्तु व ठोकळ रकमेची धरवर आदि करून उभयतांच्या ताब्यांत आहे. तुह्मी सर्व इस्टेटीची व मालमत्तेची व्यवस्था काळजीपूर्वक विश्वासानें व मैत्रीच्या नात्यानें उत्तम ठेवाल असें मी जाणून आहे. परंतु आपणास विनंती ही कीं, आपण आपल्या हातीं असलेल्या हरएक प्रकारच्या इस्टेटींतून कोणासही कांहीं देऊ घेऊ नये. सरकार मार्फत आपणास हुकूम येऊन पोंचला ह्मणजे त्या प्रमाणें तुह्मी करावें आणि त्या हुकुमापुर्वी कांहीं एखादी गोष्ट कराल तर त्याची जबाबदारी तुमच्या उभयतांच्या शिरावर राहील आणि आमचं नुकसान भरून द्यावें लागेल. कळावें, ही विनंती. तारीख २९ मे सन १८९५ इ०

( सही ) श्रीकृष्ण आणि हंसराज तर्फे
नारायणदास राठी अकोला.

नोटीस.

रा. रा. सिधाजी वल्लद रामचंद्र देशमुख वस्ती नांयगांव तालुके अकोलें यांस.

खालीं सही करणार यांज कडून कळविण्यांत येतें कीं तुह्मी तारीख २ जानेवारी सन १८९४ इसवी रोजीं सर्वे नंबर ९ एकर १९ गुंठ ३२ आकार रुपये ३३ यांतील एक तृतियांश हिस्सा ९ वर्षांच्या कौलपत्यानें संताराम वल्लद लक्षमण माने यांस दिला तो तारीख १३।६।९४ इ० रोजीं संतुरानें रेणुप्रसाद उत्तमचंद यांच्या नावें करून दिला आणि तोच रेणुप्रसादनें ता० १६ मे १८९५ रोजीं खालीं सही करणार यांस दिला आणि कौलपत्र्या बरोबर शेताचा ताबा, प्रत्येकीं बदलत बदलत माझ्या कडे आला आहे. तर या कौलपत्र्या प्रमाणें मझे जे हक्क आहेत त्यांचा कायदेशीर उपभोग घेत असतांना तुह्मा कडून कांहीं प्रत्यवाय होता कामा नये. तुमच्या दांडगाईनें जी माझी नुकसानी होईल ती या नोटिशीच्या खर्चा सह कोर्ट मार्फत भरून घेतली जाईल.

त्याच प्रमाणें हेंही या लेखानें कळविलें जातें कीं तुह्मीं तारीख २६ नोवेंबर सन १८९२ रोजीं सर्वे नंबर ५१६१४२ या तीन शेतांचे संतुरामास लिहून दिलेलें गहाण दस्तावजाचा सर्व प्रकारें धनकोचा हक्क संतुराम कडून रेणुप्रसादकडे आणि रेणुप्रसादकडून आमच्याकडे अखेर आला आहे आणि त्या बद्दल योग्य कायदेशीर कागदपत्र आलेले आहेत तर कर्जाची फेड वेळच्यावेळीं आमच्या कडे करीत जावी. यांत चुकल्यास ती जबाबदारी तुमच्या माथीं राहून आमचें नुकसान भरून द्यावें लागेल. कळावें तारीख १९ माहे मे सन १८९५ इ०

विष्णु वासुदेव खरे
रेल्वे स्टेशन, अकोला.

## जाहिरात,

सर्वत्र लोकांस आणि दुख्यत्वेंकरून आकोला व बाळापूर तालुक्यांतील निबलगांव व माझोड या गांवच्या लोकांस जाहिरखबर दिली जाते कीं मयत शिवलाल साहेबराम व मयत बनसीलाल शिवलाल या उभयतापैकीं कोणच्याही नांवाचे व मालकीची दुकानदारी, बगीरोखे, जमीनजुमला, व इतर स्थावर जगम इस्टेट ज्यापाशीं असेल त्याशीं कोणीही देवघेव व इतर व्यवहार करूं नये. अशी देवेव किंवा व्यवहार वर नमूद केलेल्या इस्टेटीस किंवा तिच्या वारसदारास लागूं होणार नाहीं. जो करील तो जबाबदारी आपल्या शिरावर घेईल. या सर्व इस्टेटी संबधानें वारसपणाच्या हक्कदारीचें नातें सरकार ज्याच्याकडे देईल तो खरा व कायदेशीर व्यवस्थापक होईल आणि असा मनुष्य कोर्टमार्फत मुक्रर होईपर्यंत ही मनाईची जाहिरात सर्वांच्या माहितीसाठीं प्रसिद्ध केली आहे. कुळांनीं पैसा देणें असल्यास तो पाहिजे तर त्यांनीं सरकारांत भरावा ह्मणजे योग्य वारसदारास मिळेल कळावे तारीख २२ मे १८९५ इसवी.

सही— श्रीकृष्ण आणि हंसराज तर्फे
नारायणदास राठी आकोला.

## घड्याळ.

कि. रुपये ८ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचें ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसाविलेले आहेत ) चावी देण्यास मागरा. कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक चिनीचे कांचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षें दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त कांच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्हीं. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक

ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

जी. बा. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळया, कर्डी, लखण्या व गळपट्टेवगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

कर्ड्यो, शीश ु वर् विखपत आहेत.

गुण आल्यांचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात.

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें फेंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धांशीशी, मस्तकशूळ, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठीतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुखें निर्विघ्नपणानें निघतात लेखणी हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरे झाले आहेत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतील.

### विजेच्या वस्तूची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपट्टा किं. रु. १॥ |

केबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवूं देऊं आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थाचे हजारों दाखल्यांचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक माला बरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करणावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

**जी. बी. नाईक आणि कंपनी.**

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईंत फार दिवसांपासून चालू असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकांस भुसारी, कापड, फरनीचरचें जातीचें सामान, लांकूड, लोखंड, किराणा, हार्डवर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें झाल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कमेशनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कमिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्का प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्हाल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवून मागवावा. पण व्हाल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रकम आगाऊ पाठविली पाहिजे ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्त्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकिट पाठवावें.

**तईयब अली मुलावली भाई.**

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट, मुंबई.

## विक्रीस तयार

**APKAR'SDIARY FOR 1895 WITH ALENDAR FOR 1896.**

**नकराची रोजनिशी. १८९५ सालाकरितां**

मराठी तिथि, वार, महिने, सूर्योदया व उपवास, ग्रहणें, सण, सरकारी व दिवाणी कोर्टांस असणाऱ्या सु. ोविवाहाचे मुहूर्त. इंग्रजी व मुसलमा, तारखा. रेल्वे, तारायंत्र, स्टांप, पोस्ट, मुंबई ब्यांकेच्या रुळी, प्रोसिजर, मुदतीचा. विशेष न्याया त्रम नोंदण्याचा. जनरल स्टांप, को छसगाईड, डिस्ट्रिक्ट आणि गांवचें क्रिमिनल प्रोसिजर, इत्यादि नेहमी ागणाऱ्या विषयांची माहिती दिली नमुरा चुकता करण्याच्या माहिती दिलें आहे अखेरीस जमा खर्चा राची व कांहीं कोरी पृष्टें जोडली

| ची किंमत | कि. | ट. हां- |
|---|---|---|
| १.................. | ०१२ | ०२ |
| २.................. | ०८ | ०१॥ |
| ३.................. | ०७ | ०१॥ |

बद्दल रोख पैसे आह्मांकडे पाठवि रोजनिशी रवाना करण्यांत येईल.

भाऊ गोविंद सापकर.
ज्ञानचक्षूचेमालक,



## जाहिरात,

क पौष्टिक पहा, व त्वरित गुण— मजेबाज—किंमत थोडी, व फायदा सेवन करून अनुभव घ्या. ह्या ातुवृद्धि होऊन मर्दुमी वाढते, व तें व स्मरणशक्ति फार मिळेल. आ- पडून मेंदु बिघडतो तो मस्तक मेंदु होईल. हात पाय व कंबर व सर्व ववात वो वायु व बाऊंत वायु व सर्व दूर होतील. सर्व स्त्रियांस व बाळंतिनीस व तिचे रोगावर खा- ण देणार योग्य—सौभाग्यसुंठ. हे मचे दवाखान्यांत विक्रीस तयार ज्यांना लागेल त्यांनी रोख पैसे पा- गर व्हाल्युपेबल पार्सलनें मागवावें. रीतीचा खर्च या सोबत देऊं. दूर ाहिले बनोजी.

करा! पोटास खा!! गेला हिंवाळा ाहीं!!! वाचा पहा— सालंमिश्री १ शेरास किंमत रु० ३; बदाम शेरास २॥८; गोखरू पाक शेरास पांच; कोहळे पाक शेरास रु० ४; सुंठ उत्तम शेरास रु० २. प्रत दु- सालंमिश्री व बदाम पाक दर शेरास

पत्ता व सही.
चरणगारे रामगीर वैद्य कुरणखेडकर
दवाखाना अकोला वऱ्हाड.


## जाहिरात

मुलुक अमानी हैदराबाद यांतील अबकारी ( दारू, ताडी ( शिंदी ), आफु आणि गांजा ) विक्रीच्या तारखा सन १८९५—९६ साला करितां खालीं लिहिल्या प्रमाणें मुक्रर करण्यांत आल्या आहेत. एलिचपूर व उमरावती हे जिल्हे शिवाय करून बाकीचे जिल्ह्यांत दारू, ताडी ( शिंदी ), आफु, व गांजा यांजबद्दल मक्ते हरास होतील.

२. एलिचपूर आणि उमरावती या जिल्ह्यांत सदर मर्दीत सरकारी देखरेखी खालीं दारू उतरून ठरीव दरानें मक्त्यानें विकण्या बद्दल ( Still head duty, central Distillery and guaranteed minimum revenue system ) व्यवस्था राहील करितां तेथें फक्त ताडी ( शिंदी ), आफु व गांजा यांजबद्दल मक्ते हरास होतील.

३. आफू व तिच्या बनविलेल्या जिनसा याचा मक्ता आणि गांजा व त्याच्या बनविलेल्या जिनसा याचा मक्ता वेगळा वेगळा हरास केला जाईल.

४. प्रत्येक हरास डिपुटी कमिशनर साहेबांचे कचेरींत दिवसा १२ वाजतां होईल.

बुलडाना—सोमवार तारीख २१ जानेवारी सन १८९५

अकोला—सोमवार तारीख २८ जानेवारी १८९५.

वाशीम— सोमवार तारीख ४ फेब्रुवारी १८९५.

वणी ( यवतमाळ )— मंगळवार तारीख १२ फेब्रुवारी १८९५.

उमरावती— सोमवार तारीख १८ फेब्रुवारी १८९५

एलिचपूर— सोमवार तारीख २५ फेब्रुवारी १८९५

५. मक्त्याच्या व हरासाच्या शर्तींचे संबंधाची माहिती जिल्ह्याचे कचेरींत मिळूं शकेल.

H. C. A. Szczepanski,
Officiating Commissioner H. A. D.

---

### नोटिसीचें उत्तर.

किसनलाल वल्द कालुराम मारवाडी राहणार आकोली जाहागिर तालुके आकोट यास खालीं सही करणारिन जडाव मर्द चुनिलाल मारवाडी दुकान आकोलि जाहागिर तालुके आकोट इजकडून नोटिसिचें उत्तर देण्यांत येतें कीं तुम्ही आम्हास तारीख २२ नवंबर सन १८९४ इसवीची नोटिस आकोला वैदर्भ पत्रातून प्रसिद्ध करून दिली ती मला पावली ती तुम्ही मला विनाकारण दिल्ही आहे तत्रापि जबाब देते.

सिवनाथ चोथमल या नावाचे दुकान आकोलि जाहागिर या गावी असून सिवनाथ यांस औरस पुत्र नसल्या मुळें सिवनाथ याणी तुमचा साक्षात वडिल बंधु चुनिलाल यांस दत्तक घेतले व तुमचा बाप कालुराम याणी दत्तक दिल्हे तेव्हा पासून चुनिलाल सिवनाथ हे नाव चालले व दुकान सिवनाथ चोथमल या नावानी आजवर चालु आहे. चुनिलाल माझा नवरा असून तुमचे आई बाप मरण पावल्या मुळें व तुह्मी अज्ञान असून तुमचे पालन करण्यास कोणी नसल्या मुळें माझे नवऱ्यानं तुमचे पालन केले नौरा मरण पावल्या पासून मि पालन तुमचे केले आहे.

वास्तविक पणे पाहता तुमचि माझे दुकानावर कोणते ही प्रकारं मालकि नाहीं तुम्ही मजपासी असून माझे तर्फे जे कुलमुखत्यार राहत गेले त्यास तुह्मी आपले पुख्यात घेऊन त्याज कडून दुकानातील जालेले दस्ताऐवजात व केलेले कुलमुखत्यार पत्रात तुमचे नांव ही मालक ह्मणोन ह्मणजे चोथमल सिवनाथ मालक चुनिलाल व किसनलाल अज्ञान पालन करणार जडाव असें नाव लिहीत गेले ही वार्ता मला आता कळ्लें कारण मी बापकोचि जात मला कांहीं लिहिता वाचतां येत नाहीं म्हणून मी पुर्वीचे मुख्त्याराचे मुख्त्यारपत्र रद्द करूण नवीन नेमले.

तुमची दुकानावर कोणतेंही प्रकारे मालकी नाहीं तुह्मी ह्मणता मी मालक आहो तर दिवाणी कोर्टांत हक्काचा दावा करून आपल्यास मालक ठरून घ्यावें तो पर्यंत कोणतें ही तऱ्हेनी दुकान दारिचे संबंधांत तुम्हीं हात घालू नयेत तसेंच लोकाकडे आमचे दुकानचे घेणे आहे त्या लोकाकडून पैसा वसूल करूं नये केल्यास तुमचा परिणाम चांगला होणार नाहीं. तसेंच कुठ्या पासून नवीन दस्ताऐवज आपले नांवें करूं नयेत या प्रमाणें तुह्मी बर्तन न केल्यास तुमचेवर फौजदारींत फिर्याद केली जाईल कळावें तारीख ५ माहे दिसेंबर सन १८९४ दस्तुर हणमंत राम राव पि. रा.

( सही )
सही जडाव मर्द चुनिलाल
मारवाडी निशाणी बांगडी

---

### नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें ( वर्ग १५ ) दि. की. मि. नंबर २२/१८९४

वि. सिव्हिल जडज्य साहेब. जिल्हा आकोला.
यांचे कोर्टांत.

नांव पुंडलीक
बापाचें नांव राजाराम
राहणार पुंड तालुके अकोट
जिल्हा आकोला यास मयत.

राजाराम बापाचे नांव गोंडीबा राहणार पुंड तालुके आकोट जिल्हा आकोला यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदर्हु अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्यांच मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांणीं तारीख २२ माहे दिसेंबर सन १८९४ इसवी रोजीं सदरहु अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपाले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी. तारीख ८ माहे दिसेंबर सन १८९४ इ०

V. N. Dandeker.
सिव्हिल जडज्य. आकोला.

---

### सर्व नजरबंदीच्या माकड चेष्टास हाणून पाडता येतें.

मी रस्त्यांत जेव्हां झोकांडा खात चालत असे तेव्हां लोकांनीं माझ्याकडे बोट दाखवून हिणवलें कीं पहा काय बेटा झिंगून गेला आहे आणि प्रथम दर्शनीं तुह्मासही खास त्यांच्या सारखेंच वाटलें असेते. परंतु ते सर्व चुकत होते. भररस्त्यांत मला चालतांना झोकांड्या येतात ह्मणून आपण मला विचाराल तर त्याचें समर्पक उत्तर देण्यास माझ्या आयुःक्रमाचे पूर्व भागावर थोडेसें गेलें पाहिजे.

आज तागाईत एखाद्या आनंदी रंगेल मनुष्याप्रमाणें मी सुखी प्राणी होतों परंतु चार पांच वर्षं पूर्वीं मला वाटूं लागलें कीं माझ्यांत कांहीं तरी कमी जास्त होत आहे. जेवतांना पूर्वीसारखी माझी क्षुधा राहिली नव्हती. मला भूक लागे व खाण्याची इच्छा होई परंतु तोंडांत घास गेला की लागलींच पक्काशय उमळून येई व जसें कांहीं बंडावा करून माझ्या हेतूस हणून पाडी हें मला अरिष्ट नवीनच. व त्याचें मला मोठें आश्चर्य वाटे. मी जेव्हां ह्मणून खाण्याचा आव घाली तेव्हां तेव्हां मला फारच तिटकारा येई. कदाचित पोटांत कांहीं अन्न गेलें तर तें अन्न किंवा मांस न वाटतां एखाद्या शिशासारखें जड वाटे त्यामुळें जिनापाला जातांना आपस्पास जशी सुस्ती चढून थकवा येतो त्याप्रमाणें मला होत असे. ह्यामुळें रात्रीं झोंपेचा कल अगदीं बदलला. झोंप थोडी पण चांगली येई. कधीं कधीं बरोबर येत नसे, व धुंद झाल्यासारखें मला वाटल्या मुळें मी केव्हां केव्हां अफू किंवा इतर अमली पदार्थ घेत असे. मी जीभ पहातों तों तिच्यावर थर जमलेला आणि काम करण्याचा हौस बिलकूल नाहींशी झालेली असे.

माझ्या बरगड्यांत आणि पाठींत सपाटून दुखत असे व कधीं कधीं ह्या वेदना खांद्यांत माला टोंचल्या सारख्या वाटत. मी आरशांत पाहिलें तों माझे डोळे पिंवळे दिसूं लागले. आणि माझ्या दांत व हिरड्या सभोंवतीं कीट जमलेला दिसे व मुखमार्जन करण्यास पाणी न मिळाल्या मुळें किंवा इतर साधनें दांताजवळ नसल्यामुळें माझ्या तोंडाची घाण फारच येई. माझा कोठा फारच जड झाला आणि पक्काशयांत घाणेरडा वायू उत्पन्न होऊन तोंडावाटे ढेंकर देतांना जिवून जाई. ह्या वेळेस मला किती वाईट वाटत होतें हें मी कधीं विसरणार नाहीं. ह्या वेळीं रस्त्यांत चालत असतां एकदम घेरी यावी, हल्लक वाटावें. आणि गरगर फिरल्या सारखें वाटून झोकांड्या देत चालावें व जमिनीवर सबशेल पडून नमस्कार घालावा लागत असे. माझ्यानें हें विघ्न जितकें टाळतां येईल तेवढें टाळून घेई व आतां तें गेलें असें समजून तो दिवस घालवीत असे.

माझ्या मित्र मंडळींनें व वैद्यानें जीं जीं औषधें घेण्यास सांगितलीं तीं तीं घेतलीं. त्या पासून गुण न येतां मी अगदीं सुदामदेव झालों. व आतां ह्या वस्तीस रामराम ठोकून परलोकचा रस्ता धरावा, असें मला वाटूं लागलें. ह्या प्रमाणें माझा क्रम चालला होता.

आतां मी तुह्मास थोडक्यांत निवेदन करितों कीं बरा कसा झालों ह्याचें कारण आपणास कळवावें हें अगदीं रास्त आहे. लंडनांत माझा एक स्नेही होता. त्याच्या कानावर माझी गोष्ट पडल्या बरोबर त्यानें सांगितलें कीं मदर सिजेलचा रोगहारक सिरप ( ह्मणजे माता सिजेलचा रोगहारक पाक ) तुह्मांस फारच गुणकारी होईल.

माझा कांहीं त्याच्या ह्मणण्यावर भरंवसा बसेना. परंतु एक बाटली तर थोडे दिवस घेऊन पहावी ह्मणून विचार केला. मला ह्या औषधा पासून इतका जलद गुण आला कीं मला खातांना बरें वाटावें व झोंप चांगली यावी. मला हें पथ्यावर पडल्या मुळें इतकें बरें वाटलें कीं मी ह्या औषधाच्या आणखी चार बाटल्या पार केल्या.

मी बरा झालों. हें औषध दैविका सारखें वाटलें मला खचित वाटलें कीं हें औषध ईश्वराच्या प्रेरणेनेंच मला मिळालें.

मी आतां पुन्हां ताजा तवाना झालों व त्या मुळें ज्या मला आनंदाच्या उकळ्या फुटल्या त्या सांगतां पुरवत नाहींत. आतां केव्हां तरी थोडेसें अपचन झालें कीं, ( जें सर्वांस होत असतें, ) त्या वेळेस मी ह्या औषधाचा लहान घोट घेतों व लागलींच मला त्या पासून आराम वाटतो.

ह्याचा तत्काळ गुण आल्यामुळें मला नजरबंदीच्या खेळाची आठवण होत परंतु खरोखर माता सिजेलच्या क्युरेटिव सिरपांत डोळ्यांत माती टाकण्या सारखा कांहीं प्रकार नाहीं. मला अनुभवावरून खात्रीनें सांगतां येतें कीं कितीही जुनाट अग्निमांद्य व अजीर्ण अगदीं वाईट स्थितीपासून असो तरी ह्या औषधां पासून हटकून गुण यावयाचाच.

मी तुमचा उपकार मानणारा.

( सही ) जे. सी. सिमसन.
२१ ह्यानोवरचा रस्ता, न्यूकारटन
अंडर लाईन, स्टाफर्ड शियर इंग्लंड

B. T.

---


### घड्याळ.

कि. रुपये ६ हमी ३ [illegible]ची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत ) चावी देण्यास मोगरा. कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक चिनांरी काचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेले. या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।१२ वर्षे दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त काच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असे वाच आज पर्यंत मुळींच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशिक

सालअखेर " ७ " १८८
किरकोळ अंकास ............... ०४

नोटिशीबद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस.... ०।०६
दुसरे खेपेस ........ ०३

Six monthly ......... 3 ,, 8 as
Single copy ......................... 4 as

Advertisement
Below 10 lines... 2 Rs
per line over 10... 4 as
Repetition per line 3 as.

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXVIII AKOLA MONDAY 31 DECEMBER 1894 NO. 51

वर्ष २८ आकोला सोमवार तारीख ३१ माहे डिसेंबर सन १८९४ ई० अंक ५१

ESTABLISHED IN 1880.

HEALTH REGAINED AND STRENGTH MAINTAINED.

जी. बी. नाईक कंपनीच्या

जग प्रसिद्ध गुणावह.

विजेच्या आंगठ्या, पुतळ्या, कर्डी, लेखण्या व गळपट्टे वगैरे

प्रत्येक वस्तुवर G. B. N. मार्क पाहून घेत जा. खोटा माल घेऊन फसू नका.

११०००० वर विकल्या, रोज पुष्कळ खपत आहेत.



गुण आल्याचे हजारों दाखले मिळाले आहेत व नित्य मिळतात

रक्त हें मनुष्याचें जीवित आहे व विद्युल्लता रक्ताचें जीवन आहे




रक्त खराब असल्यामुळें होणारे सर्व रोग, अशक्तपणा, संधिवायु, शिरागतवायु, पोटांत वायु धरणें, फेंपरें, हातपाय गळून जाणें, स्त्रियांचे बाळंतरोग वगैरे काळजाचे दर्द, सर्व प्रकारचे ज्वर, अर्धशिशि, मस्तकशूळ, मलावरोध, छातींत जळणें व दुखणें गळा सुजणें, सर्व प्रकारच्या मुळव्याधी. पाठींतील अशक्तपणा निद्रा न लागणें, मूत्राशयांतील रोग, खोकला, दमा, गजकर्ण, त्वचेचे विकार, मेह व इतर रोग, हे ह्या वस्तु वापरल्यानें बरे होतात, हें जगत्प्रसिद्ध आहे. गळपट्टा—लहान मुलांचे दंतोत्पत्तिसमयीं होणारे रोग शमन होऊन सुळे निर्विघ्नपणानें निघतात. लेखणी—हातास कांपरें व स्मरणशक्ति, अशा ह्या उत्तम, गुणकारी, सर्व रोग शमविणाऱ्या, अंगावर सुशोभित दिसणाऱ्या, औषधी खटपट चुकविणाऱ्या वस्तूंच्या संग्रहावांचून राहूं नका.

सर्व इस्पितळांमध्यें विजेचा प्रयोग रोग्यांवर करितात, व ज्या मनुष्याच्या अंगांत शुद्ध रक्त नाहीं त्या मनुष्यावर विजेचा प्रयोग केलेला पुष्कळांनीं पाहिला असेल. व त्यापासून रोगी बरे झाले आहेत. त्याबद्दल हजारों डाक्टर साक्ष देतात.

विजेच्या वस्तूंची किंमत.

| | | |
|---|---|---|
| पितळी आंगठीस किं. रु. १॥ | पि. पुतळीस किं. रु. १। | धातूचे कड्यास किं. रु. १॥ |
| चांदीचे आंगठीस किं. रु. ३ | चां. पुतळीस किं. रु. २ | धातूचे लेखणीस किं. रु. १॥ |
| सोन्याचे आंगठीस किं. रु. २० | सो. पुतळीस किं. रु. २२ | रेशमी गळपट्टा किं. रु. १॥ |

कंबर पट्टा किं. रु. ६

एकदम बारा नग घेणारास एक नग जास्त मिळेल. रोख दाम आल्यास किंवा व्ही. पी. पार्सलनें मागविल्यास पाठवून देऊं. आंगठी करितां बोटाचें माप पाठवीत असावें पत्ता असावा. अनेक रोगांवर गुण आल्याचे डाक्टर, वैद्य, पत्रकर्ते, राजेरजवाडे वगैरे सद्गृहस्थांचे हजारों दाखल्याचे व विशेष माहितीचे, व एजंट व्यापारी दराचे पुस्तकाकरितां अर्धा आणा पाठवा, किंवा तें पुस्तक मालाबरोबर फुकट पाठवूं. १ पासून ६ पर्यंत ट. ह. ६ आणे बंगी करजावळ माफ.

G. B. Naik and Company
Byculla Bombay

जी. बी. नाईक आणि कंपनी.

मुंबई, भायखळा जुन्या दावणी समोर; व पुणें, रविवार पेठ नं० ६०

## जाहिर खबर

बाहेर गांवच्या सर्व व्यापारी लोकांस कळविण्यांत येतें कीं; आमची पेढी मुंबईंत फार दिवसांपासून चालूं असून आह्मी पुष्कळ फायद्यानें माल खरेदी करून पाठवित असतों. ज्या व्यापारी लोकास भुसारी, कापड, फरनोचरचें जातीचें सामान, लांकूड, लोखंड, किराणा, हॅंडवेर ( चुका, स्क्रू वगैरे ) स्टेशनरी व ग्यासलेट वगैरे कोणत्याही जातीचा माल मागणें असल्यास आह्मी पुष्कळ फायद्यानें आणि कसोशीनें व त्वरित पाठवूं. एक वेळ माल मागविल्यावर खात्री होईल. आमच्या कापिशनचा भावही फारच कमी ह्मणजे शेंकडा एक टक्या प्रमाणें आहे. माल मागविणें तो व्ह्याल्यू पेबलनें अगर आगाऊ रुपये पाठवून मागवावा. पण व्ह्याल्यू पेबलनें माल मागविणारांनीं शेंकडा २५ रुपये प्रमाणें रक्कम आगाऊ पाठविली पाहिजे. ज्या लोकांस माल मागविणें असेल त्यांनीं खालील पत्त्यावर आपलें नांव, गांव, स्टेशन वगैरे स्पष्ट खुलासेवार लिहून पत्रव्यवहार करावा. पत्रें पोस्टपेड पाठवावीं व उत्तराकरितां टिकीट पाठवावें.

तईयब अली मुलावली भाई.

मच्छी बाजार, अबदुल रहिमान स्ट्रीट, मुंबई.

## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येत आहे कीं आकोला प्रांत वऱ्हाड ह्या जिल्ह्याचा अबकारी ह्मणजे सिंदी, कलाली, आफू, गांजाचा हरास सन १८९५–९६ सालाकरितां दिपुटी कमिशनर साहेब जिल्हा आकोले यांचे कचेरींत सोमवार तारीख २८ जानेवारी सन १८९५ इसवी रोजीं दिवसा बारा वाजतां केला जाणार आहे. हरास घेणारे इसमानें हरासाच्या चतुर्थांशा इतकी रक्कम अमानत ठेविली पाहिजे अगर दोन इसम लायक जामीन ज्यांची जंगम जिनगी आकोले जिल्ह्यांचे हद्दींत आहे असे इसम जामीन दिले पाहिजेत. या शिवाय जास्त माहिती हरासाचे पूर्वी ऑफिसांत विचारल्यास दिली जाईल कळावें तारीख १७ डिसेंबर सन १८९४ इसवी.

R. A. Simpson.
for Deputy Commissioner.
Akola District.

वऱ्हाडसमाचार

मिती पौष शुद्ध ५ शके १८१६

मुंबईचे नवीन येणारे गव्हरनर-

अथवा

## लाट साहेब

ज्या प्रमाणें आकाशातील ग्रहांची उदयास्ताची दैनिक व सांवत्सरिक गति नियमित काळाची असते, त्याप्रमाणेंच या हिंदुस्थानांतील राज्य हांकणाऱ्या प्रत्येक इलाखाधिपतीचा आगमनिक व गमनिक काल नियमित असतो. त्या अन्वयें हल्लींच्या मुंबई इलाखाधिपति. लाट साहेबांचीं—ह्मणजे लार्ड हारिस साहेबांची--प्रस्थान ठेऊन ह्या देशाला शेवटला रामराम ठोकण्याची वेळ जवळच आली आहे. त्यांच्या कारकीर्दीचा अस्त लवकरच होणार ! त्याची पुरी मोळवण होण्यापूर्वीच यांच्या मागून मुंबई इलाख्याचीं राज्यसूत्रें कोणाच्या हातीं देण्याचें करावें या संबंधी विलायतेंतील मंत्रि मंडळीमध्यें भवति न भवति होऊन, अखेर, विल्यिम मॅन्सफिल्ड ऊर्फ लार्ड सॅन्डहर्स्ट या नांवाच्या बड्या उमरावाच्या गळ्यांत राज्यसूत्राची माळ घालण्याचें पक्कें ठरलेलें बाहेर आलें आहे. सध्या हे सरदार, लार्ड हारिस साहेब हिंदुस्थानांत येण्यापूर्वीं ज्या खात्यांत ज्या जागेवर होते ह्मणजे तेथें लष्करी खात्याचे उपचिटणीस आहेत. हारिस साहेबाप्रमाणेच भावी लाट साहेबांचा आमच्या देशाशी पूर्वापारसंबंध असल्या सारखा आहे. कारण त्यांचे वडील हिंदुस्थानांत कमान्डर–इन–चीफ होते त्यांनीं कानपूर व लखनौ येथें मोठा नांवलौकिक मिळविला. व हिंदुस्थानांतच त्यांना बॅरनची पदवी मिळाली काकतालीयन्यायानें पाहतां हारिस साहेब ज्या स्थित्यंतरांतून हिंदुस्थानांत आले त्याच स्थित्यंतरांतून भावी लाट साहेब येणार आहेत. त्यावरून भावी लाट साहेबांचे कारकीर्दींत, हारिसशाही प्रमाणेंच दांडगी कोतवाली माजेल, जिकडे तिकडे बलबलपुरी व दंगे यांची नौबत झडेल, हम करे सो कायदा व झोटिंग पातशाही याचें साम्राज्य होईल, निरपराध्यांची व्यर्थ व हृदयद्रावक अशी छळणा अधिकारी वर्गाकडून होईल, असें हल्लींच्या मनूवरून कोणाला ही वाटण्याचा संभव आहे. परंतु भावी लाट साहेबांच्या दुसऱ्या कांहीं गोष्टीचा विचार केला असतां अशी भीति वाटण्याचें - निदान सध्यां तरी कांहीं कारण नाहीं. मग भावी लाट साहेबांचा हिंदुस्थानाला पाय लागल्या बरोबर त्यांच्यापदेंपें मंथरासंचार झाल्यास न कळे ! असो. सॅन्डहर्स्ट साहेबांचा जन्म सन १८५५ सालीं झाला. यांचा शिक्षणक्रम रुग्बी येथें संपला. सन १८७६ मध्यें ते आपल्या वडिलांच्या पाठीमागें आपलें अमिरी काम पाहूं लागले. व दर्जादर्जानें ते हल्लींच्या वैभवास आले आहेत. यांची सन १८८१ मध्यें चौथे अर्ल स्पेन्सर कन्या व्हिक्टोरिआ अलेक्झांड्रिना स्पेन्सर इच्याशीं विवाह केला. त्यांच्या आईचें नांव मार्गारेट् फेलोज् . ही नॉर्फाक् येथें शोट्टशाम पार्क मध्यें राहणाऱ्या रॉबर्ट फेलोज् नामक गृहस्थाची कन्या होय. ही बाई स्त्रियांच्या तर्फेची प्रतिनिधी ह्मणून प्रसिद्ध आहे. दुर्दैवानें यांचा पति— ह्मणजे भावी लाट साहेबाचे वडील परलोकवासी झाले; परंतु त्यांनीं आपल्या प्रिय पत्नीचा आपल्या मागें वेतन रूपानें सोय करून ठेविली आहे. त्यामुळें ह्या बाईनां लोक कल्याणार्थ झटण्यास बराच अवसर झालेला आहे. राजनीतीच्या विषयांमध्यें ह्या बराच पुढाकार घेतात. ग्लॅडस्टन पक्षाच्या ह्या एक आधारस्तंभ आहेत. ह्यांनीं राजनीति संबंधानें लहान लहान ग्रंथही लिहिले आहेत. त्याचे कांहीं विचार मासल्या करितां देतों.

राजनीतींचीं खरीं तत्वें खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत. प्रथमतः राजनीति रूपी प्रचंड इमारतीचा पाया जो ' स्वार्थ पराङ्मुखता ' तो भक्कम केला पाहिजे. कारण तो पक्का केल्या शिवाय लोकहित साधितां यावयाचें नाहीं. व इहार्थ व परमार्थ यांची ही सांगड तुटावयाची नाहीं. आपल्या विषयीं जपलें ह्मणजे झालें असें समजूं नये. दुसऱ्या विषयीं ही जपलें पाहिजे. आपल्या शेजाः

त्यावर प्रीतिकरणें हें आपलें कर्तव्य आहे. मग तो शेजारी कितीही दारिद्री असला, कितीही अज्ञान असला कितीही दुष्ट असला, कितीही हलक्या दर्जाचा असला तरी हरकत नाहीं. जनसमूहाचें कल्याण करणें आपलें काम आहे हें सदां मनांत बाळगलें पाहिजे- व तें करण्यास झटलें पाहिजे; मात्र तें कल्याण वरपंगी नसावें. आध्यात्मिक व नैतिक शिक्षणा शिवाय सर्व ज्ञानसंपादन व्यर्थ आहे. त्याचा वांचून संपदेची अप्रयोजकता वाटते. सुखा वांचून वैभव निरर्थक होय. कुटुंबांतल्या प्रत्येक गृहिणीनें किंवा प्रत्येक जननीनें आपल्या आयुष्यभर स्वधर्म पराङ्मुखतेचा नेम धरला पाहिजे. असें झाल्यास, ज्यांच्या ज्याच्यांशी तिचा सहवास असेल, अथवा ज्यांच्या ज्यांच्यांशी तिला बोलण्या चालण्याचे प्रसंग येत असतील, त्यांच्या हृदयांत असणारा 'स्वकार्य साधू पणा, दुसऱ्यांपासून अलग राहण्याची हाव, मनाचा कठोरपणा, व दुष्ट वासना' इत्यादि जे पाषाण त्यांचा, तिच्या मुखांतून निघणारे शब्द व तिच्या हांतुन घडणारीं कृत्यें हेंच कोणी घण त्यांनीं चुराडा होईल. तिच्या हातून घडणाऱ्या सत्कृत्यांना परिमितिच राहणार नाहीं. या तऱ्हेनें एका पिढीला उद्धरणाचें न कळतच वळण लावल्याचें श्रेय तिला मिळेल. किती उदात्त विचार हे ! असल्या जातीच्या हातचे शिक्षण मिळालेले चिरंजीव मुंबईचे गव्हरनर होऊन येणार ! मग त्यांची कारकीर्द कशा तऱ्हेची होईल याचें अनुमान वाचकांनींच करणें बरें ! असो काय होतें तें पहावें. दृष्ट लागाव याची नाहीं तर !

## राष्ट्रीय सभा

### ( दहावी बैठक )

गेल्या बुधवार पासून मद्रासेस राष्ट्रीय सभेच्या दहाव्या वार्षिक समारंभास प्रारंभ झाला. नामदार आलफ्रेड वेब हे अध्यक्षस्थानीं होते. सर्व समारंभ भव्य, मनोहर व रमणीय असा झाल्या विषयी विद्युत्संदेश आले आहेत. सभेचें स्थळ या प्रांतापासून फार लांब असल्यामुळें सभेची हकीकत या अंकीं देण्यास साधनें नाहींत. यद्यापि अध्यक्ष नामदार वेब साहेब यांनीं सभेच्या सुरुवातीच्या समयीं जें भाषण केलें त्याची एक छापील प्रत मुंबईच्या प्रेसिडेन्सी असोसिएशन सेक्रेटरी कडून आली आहे तिचा आभारपूर्वक स्वीकार करितों. या मंडळीनें या प्रसंगीं आपली कार्यदक्षता उत्तम प्रकारें व्यक्त केली एवढेंच नाहीं तर या लोकहितवादी मंडळीच्या द्वारें लोकांची जिज्ञासा फार लवकर तृप्त झाली.

स्वागत— मंडळीचे अध्यक्ष नामदार मि० पी. रंगैय्या नायडू यांनीं बुधवार दोन प्रहरीं तीनें वाजतां आपल्या स्वागतवर भाषणास प्रारंभ केला. त्यांच्या भाषणाचा प्रथम भाग मराठींत सारांशानें येणें प्रमाणें:—

दक्षिण हिंदुस्थानच्या लोकांच्या वतीनें मी आपले आभार मानतों आणि या नगरीं आपणा सर्वांचें मी स्वागत करितों. सात वर्षां पूर्वी राष्ट्रीय सभा या शहरीं भरली होती त्या वेळीं आपलें स्वागत करण्याचा मान कै० सर टी. माधवराव या थोर गृहस्थाकडे होता. त्या बहुमानाला अपात्र असा मी हें मान्य करून घेतलें आहे. कै० सर टी. माधवराव म्हणत असत कीं राष्ट्रीय सभा हा ब्रिटिश राज्याचा मुख्य विजयस्तंभ आणि ब्रिटिश राष्ट्रांचें वैभवशिखर होय त, पंडित अयोध्यानाथ इत्यादिकां सारखे आपले महात्मे मृत्युमुखीं पडले. ही हानी भरून येण्यासारखी नाहीं तथापि अपत्र एकराष्ट्रीयत्व वृद्धिंगत होऊन आपला पक्ष मजबूत व भक्कम होत आहे.

या खंडांतल्या चाऱ्ही दिशां कडून जे हजारों थोर, विद्वान व अग्रणी लोक जमले आहेत त्यांच्या आगमनानें आणि मद्रास-फंडाला राजा व रंक, कारागीर व मोलमजूरदार इत्यादि प्रत्येक वावरत्यांनीं जी अल्पबहु वर्गणी दिली तिनें आपल्या शत्रूचे आरोप मिथ्या ठरले आणि आपणा मध्यें विलक्षणच संघशक्ति प्रेरित झाली.

आपल्या राजकीय कार्यमालेचा परिघ फार विस्तृत असून त्यांत सर्व देश समाविष्ट होतो. एकंदर निरनिराळ्या समाजांतील लोकांचे एकी भवन होईल किंवा निरनिराळे समाज बंधुत्वाच्या स्नेहभावानें एकत्र होतील असा भावी परिणाम दिसतो. आपली प्रस्तुतची कार्यसीमा नवीन संस्था उभारण्याच्या आणि पूर्वीच्या मोडून टाकण्याच्या काल्पनिक विचारांची नसून आवश्यक व निकडीच्या गरजा भागविण्याची आहे.

१८५८ सालचा महाराणी साहेबांचा जाहिरनामा ही आपल्या हक्कांची सनद आहे. इंग्लिश लोकांनीं आपल्या जुलमी राजांना पेचांत आणून युक्ती युक्तीनें त्यांचे कडून क्रमाक्रमानें आपले हक्क संपादले परंतु आमची सनद राजीखुषीची असून त्यांत सर्व राज्यपद्धतीचा स्पष्ट उलगडा आहे आणि ही सनद आपल्या राज्यकर्त्यांच्या सद्गुणखाणीची व औदार्याची साक्ष देते. जों पर्यंत न्याय, सत्य आणि प्रामाणिकपणा हीं राज्य चालविण्याचीं तत्वें असून केवळ वेळ मारून नेण्या करितां पाहिजे तें करावें हेंच तत्व आहे असें आमचे राज्यकर्ते स्पष्टपणें प्रतिपादन करीत नाहींत तों पर्यंत १८५८ सालच्या सनदेच्या पायावरच आह्मी आपल्या कार्यदेशीर मनोरथांचा किल्ला बांधतों.

परंतु या जाहिरनाम्याचें महत्व कमी करून आपली स्वार्थपर राज्यपद्धती आतां सारखीच चालूं ठेवण्याचा इकडील अधिकारिवर्गांचा पक्का संकल्प आहे हें गेल्या ३५ वर्षांच्या इतिहासावरून स्पष्ट कळेल. वरील पद्धतीचा प्रतिकार करण्यासाठीं आह्मी ही संस्था स्थापिली आणि त्या कामीं बरेंच यश मिळून इंग्लंडांतल्या लोकांस इकडील खरी स्थिती कळून पुष्कळजण आपल्या पक्षाला येत चालले आहेत.

इंग्लंडांत आपला मित्रवर्ग अधिकाधीक वाढला पाहिजे आणि मि. वेब हे आपल्यास अध्यक्षस्थानीं लाभल्यानें पार्लमेंटांत आपले हितकर्ते अधिक होतील आणि अशा प्रकारें इंग्लिशांची न्यायबुद्धि व मोठेपणा हीं आमच्या विषयीं जागृत होतील.

आमचे इकडील अधिकारी तर आपल्या पैकीं विद्या विषयीं वाईट ग्रह करण्याची काशी कमाल करितात हें सिव्हील सरव्हिस परीक्षे विषयी झालेल्या पत्रव्यवहारावरून स्पष्ट दिसतें. ते असें ओरडतात कीं आमच्या शिक्षणाकडे प्रतिवर्षीं कोट्यावधि रुपये खर्च होतात ते केवळ फुकट जातात आणि शिकण्या पेक्षां इंडियन लोक अक्षरशत्रु राहतील तर बरें! तेव्हां अशा अधिकाऱ्यां कडून आमच्या आशा कितपत फलद्रुप होतील हें सांगणें नको.

आपल्या पैकीं शिकलेल्या मंडळीस राजद्रोही व राज्यक्रांती करणारे अशीं विशेषणें दिल्यानें आपण तसे होत नाहीं परंतु दुर्योवना प्रमाणें आंग्लो इंडियनांस स्वतांच्या दौर्बल्यामुळें जिकडे तिकडे सर्व दुर्जनच दिसतात.

या नंतरचा भाषणाचा भाग फार महत्वाचा असल्यामुळें व तो उशिरा मिळाल्यामुळें हें भाषण व मि० वेब अध्यक्ष यांचे भाषण हीं दोन्ही अपुरीं ठेवणें आम्हांस भाग झालें आहे.

अध्यक्ष नामदार वेब साहेब यांच्या भाषणाच्या पुर्वभागाचा मराठींत गोषवारा खालीं देण्याचा आह्मी यत्न करित आहों.

राष्ट्रीय सभेच्या १० व्या बैठकीस मला अध्यक्षस्थान देऊन माझा जो आपण गौरव केला त्याबद्दल मित्र मंडळींचा व असमद्देश बांधवांचा मी आभारी आहे.

राष्ट्रीय सभेचे उद्देश तिच्या पहिल्या अध्यक्षांनीं सांगितले आहेत आणि त्यापेक्षां ते अधिक सुगम करितां येणार नाहींत. या विस्तीर्ण राज्यांतील सर्व भागांत जे देशाचे हितकर्ते आहेत त्यांच्या मध्यें निकट संबंध व स्नेहभाव जडावा, सार्वजनिक पुरस्कर्त्यांमधील जाति, धर्म व राष्ट्र यांच्या निमित्तानें उद्भवणारे भेदाभेद लयास जावेत, आणि लार्ड रिपन साहेबांच्या संस्मरणीय कारकिर्दींत जें एक राष्ट्रीयत्व प्रेरित झालें त्याचा पूर्ण विकास होऊन सर्वत्र त्याची व्याप्ती व्हावी. इंडियन समाजांतले जे महत्वाचे व नडीचे प्रश्न आहेत त्या संबधानें विद्वान लोकांचे अभिप्राय प्रथम एकत्र करावयाचे आणि नंतर काळजी पूर्वक पुष्कळ भवति न भवति झाल्यावर काय तो विचार ठाम करावयाचा, आणि त्याच्या अनुसंधानानें व योग्य उपायांनीं संपादावयाच्या लोकहिताच्या राजकीय गोष्टि पुढील वर्षासाठीं नेमस्त करावयाच्या असा क्रम आहे.

जसे आपले राजकीय विचार तसेच पृथ्वीवरील अन्य राष्ट्रांत प्रचलित आहेत. आपल्या कार्याला विघ्नें मात्र बहुत आहेत. अन्य त्रतात्विक दृष्ट्या निदान सर्व लोक राजकीय गोष्टींत समसमान व सारखे हक्कदार असतात परंतु समानत्वाचे व उन्नतीचे हे संस्कार अद्याप ज्यांच्यावर घडावयाचे आहेत अशा लोकाचें पुढारीपण आपल्याकडे आहे तेव्हां राष्ट्रीय सभे सारख्या संस्थाच्या द्वारानें निराशेला थारा न देतां जीं जीं संकटें उद्भवतील त्यांच्या बरोबर फार लवकर सामना आपण केला पाहिजे.

ध्यानांत ठेवण्याची गोष्ट ही कीं या राष्ट्राच्या इतिहासांत सांप्रतचा काळ अगदीं निकराचा व आणीबाणीचा प्राप्त झाला आहे. पूर्वीचें औदासिन्य जाऊन आता लोकांच्या मनांत राजकीय गोष्टीं विषयीं जागृती झाली असून नव्या आशा उत्पन्न झाल्या आहेत. हें खरें कीं आत्मसंयमनाच्या संबंधी व स्वकर्तव्या विषयीं महत्वाकांक्षा या आपल्या अंतःकरणांत जागृत झाल्या वसत नाहींत. चुका या हातून होतच असतात पण त्यांचा संबंध सांप्रतच्या उन्नतावस्थेशीं भलत्याच रितीनें जुळविण्यास आपले शत्रू चुकणार नाहींत. वास्तविक चुकीचें कारण आपली मूळची निद्रितावस्था ही होय. अशा कुतर्कांला व मिथ्या आरोपाला आपण भितां कामा नये. पण आपण स्वकीय पुढारपणांत लोकापवादास योग्य कारण न ठेवण्या विषयीं खबरदारी घेतली पाहिजे.

मुंबई, कलकत्ता, अल्हाबाद, नागपूर लाहोर व मद्रास येथें आपल्या सभा एकदां दोनदां भरलेल्या आहेत. पहिल्या सभेला ७२ प्रतिनिधी होते पण पुढें ही संख्या एका हजारावर जाऊं लागली तेव्हां ती संख्या ७०० पासून १००० नियमित करण्यांत आली. आपल्या सभेच्या कामात पोक्तपणा, न्यायदृष्टी, शिष्टसंप्रदाय व कुशलता हीं चांगलीं दिसून येतात.

आपल्या सभेचे आजपर्यंतचे अध्यक्ष फार थोर गृहस्थ होते. आणि त्यांत नामदार दादाभाई नवरोजी हे अग्रस्थानीं आहेत. त्यांनीं देशसेवा उत्कृष्ट केली इतकेंच नाहीं तर ते इंडियातर्फे एकटेच नेटीव गृहस्थ पार्लमेंटचे सभासद आहेत. कै० यूल साहेब हे बहुतेक तुमच्यामध्यें गणले जात असत. सर वेडरबर्न हें इंडियाचे पार्लमेंटरी सभासद असून आपले अध्यक्ष होते. कै० ब्राडला साहेब हे अध्यक्ष नव्हते तरी इंडियाचे निस्सीम हितकर्ते व पुरस्कर्ते होते. त्यांच्या मृत्यूमुळ बहुत मनुष्यांचा तोटा झाला आणि तो भरून येण्यासारखा नाहीं.

नेटीव अध्यक्ष कांहीं बैठकीस झाल्या नंतर आपण इंग्लिश लोकांची त्या सन्मान्य स्थानीं निवड केली. दोन स्कॉच गृहस्थांची पाळी झाल्या नंतर मी आयरिशमन असल्या मुळें माझी निवड आपण केली. माझ्या अंगीं माजी अध्यक्षा प्रमाणें उत्तम गुण नाहींत तथापि आपल्या निवडीचा वरे वाईटपणा मी पहात नाहीं. अमेरिका स्वतंत्र झाली त्या वेळेच्या राज्यक्रांतीनें मला राजकीय शिक्षणाचा श्रीगणेशायनमः घालून दिला. ग्यारिसनच्या उक्ती प्रमाणें माझा देश हेंच माझें जग, आणि माझे देशबांधव हीच माझा अवघी मनुष्यसृष्टि होय. माझ्या आयुष्याचा उत्तरार्ध माझ्या मातृभूमिच्या उन्नती कडे वेंचला गेला आहे. ओकोनेल म्हणतात त्या प्रमाणें माझे विचार माझ्या बेटा पुरतेच नाहींत. सर्व जगा मधील धर्म प्रकरणांतल्या व व्यवहारिक स्वतंत्रतेचा मी कट्टा दोस्त आहे शेटिंगशाही व जुलूम यांचा मी वैरी आहे आणि तशांत आमच्या राज्यकर्त्यां मुळें तसा प्रकार असेल तर मी स्वतांला अधिक जबाबदार समजतों. पराधिनतेचा कटुपणा मी अनुभवीत आहे. पार्लमेंटातील आयरिश पक्षाभिमानी मी आहे. पार्लमेंटांतील इंडियन पक्षापैकीं मी एक आहे. विचार व आचार यांच्या स्वातंत्र्यासाठीं मी माझ्या 'क्वेकर' नामक पवित्रपंथी लोका प्रमाणें मी अभिमानी असून क्याथोलिक लोकांनीं मला प्राटस्टंट असूनही पार्लमेंटचे सभासद निवडलें आहे. धर्माच्या प्रकरणात हट्टवादी पणा व वैरवृत्ती ही लयास जात नाहींत तों पर्यंत स्वतंत्रतेचा खरा मार्ग कुठ-

## ह्या राजश्रींनें केव्हां तरी पळ काढला असावा

एक गृहस्थास त्याच्या धर्मवेडामुळें एका जुलमी सरकारानें कारागृह दाखविला. तो ज्यांत कोंडला होता त्याच्या मजबूत दगडी भिंती पाहून त्याच्या मनाची खात्री झाली कीं आतां आपलें राहिलेलें आयुष्य ह्या एकांत व भयाण कारागृहांत घालविलें पाहिजे. जरी त्याला आतां पुढची गत चांगली नाहीं असें भासत होतें तरी दुःखांत सुख इतकेंच वाटत होतें कीं मला जुलमामुळें बळी व्हावें लागलें परंतु सद्वर्तनाचें उल्लंघन केल्यामुळें कांहीं नाहीं. जर त्याच्या स्वाधीनची गोष्ट असती तर या संकटांतून तो सहज पार पडला असता.

असें असून त्या बिचाऱ्यास सतत सोळा वर्षे हाल काढीत रहावें लागलें. हीं वर्षे संपतात तों त्याच्या मनांत आलें कीं त्या भिंतीवर पुढें आलेल्या दगडाच्या आधारानें वर चढावें व त्यानें खिडकीच्या वरून काय दिसते ह्मणून वर डोकें केलें, आणि असें केल्या मुळें त्याला वाटलें कीं पुढें कोंडवाड्याचे गज आहेत ते काढून टाकतां येतील व त्या चौकटीची आगळही लावली नव्हती. त्याच्या मनांत बोलूं लागलें कीं, काय मी पळ कां न काढावा? त्यानें खिडकी वर उघडली आणि सहा फुट उडी जमिनीवर मारली आणि त्या प्रदेशास शेवटचा राम राम ठोकला. जर त्यानें त्याच्या ठाम झालेल्या विचारास एकीकडे ठेवून विचाराची दोरी वर लेल सोडली असती तर या स्थळीं इतके दिवस कुंपत रहावें लागलें नसतें.

या स्वधर्मार्थ प्राण अर्पण करणाऱ्या या बिचाऱ्याची दैवघटित गोष्ट साधक व बाधक आहे. त्याच्या मनाची धांव बंद केल्यामुळें साधक त्याला ज्या कारणास्तव बंदींत टाकावयास होता तें नसल्यामुळें बाधक.

ही गोष्ट पत्र रुपानें जी सर्वांस आवडते त्या प्रमाणें खालीं थोडक्यांत व साध्या शब्दांत सांगतों एक लेखक बाई ह्मणते कीं. आज सोळा वर्षे झालीं. पित्त क्षोभानें व अशक्तपणामुळें फारच गांजून गेलें आहे. नेहमीं थकून जाऊन अगदीं हलक होऊन जाई. माझी अन्नावरची वासना उडाली. पुढें आणलेले ताटास हात लाविला तर नसे. लि त्येक दिवस माझ्यानें एक घास देखील खाववत नसे, कधीं कधीं मला मळमळ सुटे. पोटाचा नगारा होई आणि तोंडावाटे मोठा घट्ट बेटका येई.

मला फारच त्रासदायक खोकला होऊन व बरगड्यांत फारच वेदना होत व दम बरोबर छाटत नसे. मी फारच हल्लक झाले आणि दुकानांत आंत बाहेर करण्याचा माझा तर्केंवा अगदीं निघून गेला. सन १८९१ च्या दिसेंबरांत माझ्या एका गिऱ्हाइकानें मदर सिजेलच्या क्युरेटीव सीरप ( माता सिजेलचा रोगहारक पाक ) बद्दल बरेच गुणानुवाद गाइल्यामुळें मी तें औषध घेण्यास सुरू केलें. मी थोडे येंव घेतल्या बरोबर मला बरेंच समाधान वाटलें. आणि पुढें पंधरा दिवस औषध घेतलें नाहीं तरी मला बरें वाटत होतें. मला असा धीर आला ह्मणून मी अगदीं बरी होई तों पर्यंत या औषधाचा उपयोग केला. आमचे चिरंजीव आरथेरास एक वर्ष सतत जेवल्यावर जड झाल्या सारखें व वेदना होत होत्या आणि पोटाची दामटी होऊन खळगा पडल्या सारखें वाटे. त्याला हें औषध देण्याची मी गळ घातली आणि त्याचा शेवट ह्मणाल तर माझ्या सारखाच झाला. मला पक्कें माहीत आहे कीं ह्या प्रदेशांतल्या वऱ्हाड मंडळींनें दुसरे नाना उपाय करून थकले व जेव्हां ह्या शिरपाचा ( पाकाचा ) उपयोग केला तेव्हां तात्काळ गुण आला. ह्या औषधाचा ह्मणजे ( मातासिजेलच्या पाकाचा ) मला रामबाण गुण आला तो इतर पिडीतास ह्या मुळें यावा असें आपणास वाटत असेल तर हें पत्र आपण बेलाशक छापावें.

मी तुमची
( सही ) ( मिसीस ) एम वार्ड
१९४ हकसटन रोड
शडफर्ड नोटिंग हाम.
ता. १ ली माहे एप्रील सन १८९२

मिसीस वार्ड बाई साहेब ह्या त्रासदायक व भयंकर रोगापासून मुक्त झाल्या ह्मणून आह्मी तीस अभिनंदन करितों. आपल्या आयुष्यांत सोळा वर्षांचा काळ सतत शारीरिक व मानसिक वेदनेंत घालवावा ह्मणजे फारच खराब समजावयाचें. कुबेराचे सोबती होणें फारच थोड्यांच्या ललाटीं लिहिलेलें असतें. परंतु सुदृढता ही सूर्य प्रकाशासारखी सर्व जागा जिकडे तिकडे सारखी पसरते तद्वत ही पसरली पाहिजे. ही कमी राखावी हें त्याला अवगत आहे. तर तो त्याची काळजी घेईल व तो दूर झाल्यास आपल्या स्वाधीन करून घेईल.

ह्या बाईचा रोग पक्वाशय पिडाचा ह्मणजे अग्निमांद्य व अजीर्णाचा होता. जो रोग फारच धोक्याचा व दुःख देणारा आहे कारण कीं त्या रोगाचा पगडा इतका बसतो कीं शरीरांतलीं सर्व अंगें त्याच्या बळी पडतात व रक्ताभिसरणा मुळें त्या रोगाचें विष सर्व शरीरांत पसरतें या रोगाचें मुख्य कारण निरनिराळ्या नांवानें होणारे परिणाम व चिन्हें ही होत. सि जें औषध सांगते त्याच्या गुणाची ज्यास चांगली माहिती झाली आहे त्यास नवल वाटण्यास नको. मोठमोठाले असाध्य रोग त्या औषधास शरण येतात.

आमचे वीर जे आपल्या गुहेंत कसा तरी तेल जाळीत होते त्यास बाहेर निघून जाण्याची गुळगुळी पाहिजे नव्हती.

जर त्या ओळी अवलोकन करणारे दुःखाचे गुलाम झाले असतील तर त्यास तसें राहण्यास कांहीं कारण दिसत नाहीं.

तिच्या सचोटीच्या आटोक्यांत लिहिलेल्या पत्रावरून रोगाचें शमन कसें होईल याचा रस्ता दाखवून देते. हें आमच्या पत्रांतर करणाऱ्या गृहस्थास लेखावरून समजेल.

D. H.

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्या साठीं सरटीफिकिट मिळावें ह्मणून त्यांनें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात.

सन १८८९ चा अक्ट नंबर ७ प्रमाणें ( वर्ग १९ ) दि. की. मि. नंबर $\frac{२२}{१८९४}$

दिपुटी कामिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव सिताराम
बापाचें नांव भंगाजी कुणबी
राहणार चौसाळ तालुके दर्यापूर
जिल्हा एलिचपूर यास मयत.

आकाराम बापाचे नांव भंगाजी कुणबी राहणार चौसाळ तालुके दर्यापूर जिल्हा एलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार यानें अर्ज केला आहे त्याजकरितां सदरहू मयत मनुष्याच्या मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यास जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं त्यांणीं तारीख १४ माहे जानेवारी सन १८९५ इसवी रोजीं सदरहु अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत स्वारी असेल तेथें हजर होऊन आपले हक्काविषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

तारीख १० माहे दिसेंबर सन १८९४ इ०
C. E. Biddulph.
Offg. Deputy Commissioner.
दि० कजज एलिचपूर.

---

## जाहिरात

या नोटिशीनें सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, सन १८८६ चा वऱ्हाड मुनिसिपल कायदा कलम ८३।९२ प्रमाणें खालीं दिलेल्या हद्दींत झोपड्या अथवा दुसऱ्या घराच्या छावण्या किंवा बाहेरील भिंती गवत, तट, पाने, अगर दुसरे फार जलद पेट घेणाऱ्या जिनसाचे केलेले असू नयेत किंवा बांधूं नयेत किंवा दुरुस्त करूं नयेत असें कमिटीनें ठराविलें आहे.

शहर बाजू
गावकुसाचे आंतील सर्व भाग.
पेठ बाजू.

दस्तुर बहिमंजी साहेब यांना पट्ट्यानें दिलेल्या बगीच्या पासून मे० डेपुटी कमिशनर साहेब यांचे कचेरी व टाउनहाल वरून गंगाधर यांचे बगीच्यास जाणारा रस्ता काकाजीचे दुकाना पर्यंत तेथून अकोला अकोट सडकेस मिळणारा रस्ता व सदर्हू ठिकाणापासून पुला पावेतो अकोला अकोट रस्ता व पुला पासून वर सांगितलेल्या बगीचाचे पर्यंतचा रस्ता या रस्त्यांचे आंतील सर्व भाग.

Md. Husain.
सेक्रेटरी
म्युनिसिपल कमिटी.
अकोला.

---

## जाहिरात

या नोटिशीनें सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं अकोला म्युनिसिपाल कमेटीनें मेहेरबान डेपुटी कमिशनर साहेब यांच्या मंजुरी वरून कमेटीच्या तर्फेनें अकोला अकोट सर्व्हे शेत नंबर ४ यांत पुरण्याच्या व जाळण्याच्या जागा खालीं दाखविल्या प्रमाणें नेमून दिल्या आहेत.

मुसलमान लोकांस पुरण्या करितां ९ एकर व ११ गुंठे इतकी जमीन तोडून दिली आहे. शावन वासपूर सर्व्हे शेत नंबर २१ पातील ९ गुंठे जमीन व नदीच्या सर हद्दीतील २९ गुंठे जमीन हिंदुंना जाळण्या करितां नेमून दिली आहे. मुकापूर सर्व्हे शेत नंबर १० व शावन वासपूर सर्वे शेत नंबर २१ या दोन नंबरांतून प्रत्येकीं ४ एकर जागा हिंदुंना पुरण्या करितां दिली आहे.

तानवापूर सर्वे शेत नंबर १३ हें सर्व शेत मुसलमान लोकांना पुरण्या करितां दिलें आहे.

ताजनापूर सर्वे शेत नंबर १३ यातील ९ एकर १४ गुंठे जमीन हिंदू लोकांना पुरण्या करितां व नदीच्या हद्दीतील ३ एकर व २९ गुंठे इतकी जमीन हिंदुंना जाळण्या करितां नेमून दिली आहे.

Md. Husain.
सेक्रेटरी
मुन्सिपाल कमेटी
आकोला.

---

## NOTICE

It is published for general information that the Municipal Committee at Akola have, under section 83 and 92 of the Berar Municipal Law 1886, prohibited the roofs and external walls of huts or other buildings being allowed to remain, or made or renewed of grass, mats, leaves, or other highly inflammable materials within the following limits:—

Town Side

The whole area bounded by the Townwall.

Peth Side

The whole area bounded by the road from the Municipal Garden leased out to Dastur Bymanjee. via Deputy Commissioner's office and Town Hall, to Gangadhar's Garden to meet the cross road at Kakajee's shop and the road from Kakajee's shop to join the Akola Akote road and the Akola Akote road from the point upto the Town bridge and further on to the above mentioned garden.

Md. Husain
Secretary
Municipal Committee
Akola

---


## घड्याळ.

किं. रुपये ६ हमी ३ वर्षांची

दिसण्यांत सुंदर, लहान, नियमित वेळ दाखविणारें, रेल्वे रेग्युलेटरचें, उघड्या तोंडाचें, व ६ ज्युएलचे ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविलेले आहेत ) चावी देण्यास मोनरा. कांटे रासकोप प्रमाणें, आंकडे ठळक चिनांरी कांचेचे मुद्दाम युरोप मध्यें करविलेलें या वर आमचें नांव आहे. हें खिशांतील घड्याळ एकदां घेतल्यास १०।११ वर्षे दुसरें घेण्याची जरूर लागणार नाहीं. जास्त कांच, कमान व पेटी मिळेल. उमेद धरा आणि खात्री करा. असें वाच आज पर्यंत कुठेंच स्वस्त विकलें नाहीं. व्ही. पी. अगर पैसे पाठवा.

पत्ता—
गोविंद महादेव पोळ
वाच मेकर
नाशीक

का नसतां. पण तो प्रकार अलिकडे बंद आहे हें माझ्या निवडणुकीनें स्पष्ट दिसेल.

( पुढें चालेल. )

---

गुरुवार ता० २७ रोजीं राष्ट्रीय सभेंत खालील पांच ठराव करण्यांत आले ते येणें प्रमाणें:——

( १ ) इंडियांत तयार होणाऱ्या कपड्यावर कर बसवूं नये. निदान २४ नंबरी खालील सुताच्या कपड्यावर तरी कर ठेवूं नये. हा ठराव तारेनें व्हाइसराय साहेबांस कळविण्यांत आला.

( २ ) बंगाला, बिहार व मद्रास कडील जमिनीचा नियमित धारा असतांना त्यांत चालूं असलेल्या फेरफाराच्या तजवीजी बंद व्हाव्यात.

( ३ ) पांच कोट लोक अन्नान्न करीत असून साळोसाल असे लोक अधिकाधिक उपास मार्‍यामुळें मरत आहेत.

( ४ ) सेक्रेटरी आफ स्टेटचे कौंसिल मोडण्यांत येऊन त्याच्या ऐवजी हाउस ऑफ कामन्सची एक स्टांडिंग कमिटी नेमण्यांत यावी.

[ ५ ] हिंदुस्थानच्या खर्चा संबंधानें बसणाऱ्या पार्लमेंटाच्या निवडक कमिटीनें इंडियन लोकांची ऐपत, त्यांच्या वरील बोजा, आणि इंडिया व ब्रिटन यांच्या दरम्यानच्या खर्चाच्या बाबी या तिन्ही मुद्यांचा विचार करावा ह्मणून सरकारास विनंती करण्यांत यावी.

---

# The Berar Samachar

MONDAY DECEMBER, 31, 1894

In its leader of the 18th. instant, the Bombay Gazette disparages and tries to throw eversticking dirt of contumely on Native Society and the press. It quotes a sentence of a Babu essayist which runs as follows:—

"The horse is a noble animal, but, unfortunately, he does not always do so." Taking this sentence as a basis, it goes, by way of an analogy, to prove the disloyalty of the Indians, as regards their feeling, conduct, and writing. It unhesitatingly recognizes that the Indian races are normally loyal; but, like the Babu's horse, the Indian subjects, sometimes, grow otherwise. The illustration, we believe, is equally applicable to the British Government—we mean to the British officials. The officials we recognize are generally just and kind; but often, like the Babu's horse, some Individual officials grow oppressive, cruel and unjust. In support of what the Gazette lays down, it alludes to the recent public meetings held at Wai, Satara and Poona for the purpose of doing honor and showing sympathy towards the noble and respectable innocents of Wai, whom the misused law of the land had condemned and the oppressive official hand had incarcerated. It also refers to the speeches delivered and addresses presented in these meetings. It further hurls its wrath at the authors of the writings—in connection thereof—that came out of the Native press. "These are," remarks the Gazette, "the specimens of disloyalty." But we fear, under these specimens of disloyalty, there lurk primarily specimens of despotism and abuse of power by the official class. We need not enter into an unprofitable discussion and say that even England had had and presents even now such occasions—when crowded public meetings had been and are being held, similar to but of a more furious character than those held in India. Speeches and writings rousing the masses even to sedition were made and published. Yet these proceedings at home were regarded and are considered as loyal. But the case with the meetings, speeches, and writings of the Indians—though of a peaceful stamp is otherwise. All this to an Anglo—Indian is disloyalty and sedition ! It is simply a pity that even such an Indian as the Hon. Mr. justice Rande should not have escaped the attacks of carping and sarcastic criticism at the hands of an Anglo— Indian like the Hon. Mr. Birdwood, who, a few days before, disgorged some iniquitous and injudicious expressions before some of the Hindoos at Belgaon and said:—

"There is Mr. Ranade fighting for you in the High Court. The Gazette teaches the Indians "an essential element of loyalty" which is "to respect constituted authority" But who dares deny this ? We are thankful to the teacher for the gospel he has preached. But we hope that the teacher, in giving this lesson to the Indian subject, has not himself forgotten that the essential element of Good Govt. is to treat the subjects with kindness, justice and uprightness of character. The decisions of the constituted authority, according to the Gazette, are like the Umpire's "out" on the cricket field— i.e. they are not to be disobeyed and disrespected. But were the orders, referred to by the Gazette, ever disobeyed and disrespected ? We do not know they were. Perhaps, to speak and write the truth, or to bring the mistakes—be they conscious or unconscious—of Government in matters of justice, to its notice,—by way of memorials and public criticisms as appear in loyal and peace—going meetings andthe press—( all these and similar being the first duties of a true and loyal subject ) amounts, according to the idea of the Gazette, to disloyalty. Then, we regret to say that *our* ideas of disloyalty vastly differs from that propounded by the Gazette. We are sorry at the same time to remark that the term loyalty is tending to become a misnomer It is, however, widely known, that our present idea of loyalty or disloyalty is the out—come of the British rule and British education which has been proved to be enormously benign and congenial and thus officious We fear the Gazette is dislodging the heavenly principles of the British from their heart and head. We stop, here, because we deem it an unpleasant task, to stretch the tension of criticism—thus suffering the Gazette to take pleasure in its usual hobby.

---

"In the Tariff Act passed in March last cotton yarns and piece-goods remained exempt from duty. The existing state of the finances is such as to render necessary the revenue to be derived from the duties on these classes of goods, and this Bill is introduced to authorize the levy of them. The opportunity has been taken of introducing several detailed amendments which the experience of the past eight months has shown to be desirable, and of which the object is to make the Tariff classifications more clear and precise and more easy of application.

The finer classes of cotton manufacture in India enter into direct compition with the cotton manufactures imported from England. As it is intended to weight these last with an import-duty, it is considered necessary to levy at the same time a countervailing duty upon the competitive classes of Indian manufactures."

These are the two statements of the objects of the new bills. The first bill ought to have been an act in March last and the last should have been adopted with the amendment of the Hon. Mr. Fazal Alli Visbrambhai. But no ! Indian interests may be safely sacrificed to those of the Lancashire mill-owners.

---

## वऱ्हाड.

रा० रा० अंताजी नारायण वेंचलेकर हेड मास्तर, कारंजा यांनीं पेनशन घेतल्यामुळें खालील बदल्या करण्यात आल्या आहेतः—

| नांव | गांव | पगार |
|---|---|---|
| राजश्री | | |
| गोविंद महादेव आसखेडकर | कारंजा | ७५ |
| गंगाधर रावजी साहनी | तळेगांव | ६० |
| दत्तात्रय यादव दांते | वणी | ६० |
| गंगाराम आत्माराम सबनिस | परतवाडा | ५० |

रा. रा. जनार्दन केशव नगरकर असि. मास्तर हायस्कूल यांस ४० पगारावरून ५० रुपयावर बढती जळगांवच्या शाळेंत दिली आणि रा. रा. सुंदर निळकंठ असि. मास्तर दर्यापूर यांस ३० चे ४० पगारावर वाशिमास बदललें.

मेजर वारन हेस्टिंग्स हे दोहों महिन्यांच्या फर्लो वरून परत आले आणि त्यांनीं बुलढाण्याचे डेपुटी कमिशनरचे कामाचा चार्ज गेल्या २४ तारीखेला घेतला.

मि. गाडीवन आस्टिन यांची बुलढाण्याहून इलिचपूर डेपुटी कमिशनरचे जागीं बदली झाल्या अन्वयें ते आज रोजी आपले कामावर रुजूं होतील.

आणि आफिशिएटींग डेपुटी कमिशनर मि. बिडल्फ हे शिकंदराबादेस परत आपले कामावर रवाना होतील.

रा. रा. गोविंद पांडुरंग हेड क्लार्क पोस्ट आफिस आकोला यांची बदली वाशिम पोस्ट मास्तरचे जागीं झाली. हे गृहस्थ चांगले मनमिळाऊ, कार्यदक्ष व मेहनती असून बढती शिवाय त्याची बदली झाली हें ठीक नाहीं.

मि. मानकीफ पोस्ट मास्तर आकोला हे उद्या पासून एक वर्षांचे आजारीपणाचे रजेवर जाणार आहेत.

त्यांच्या जागी रा. रा. व्यंकटेश कृष्ण इनस्पेक्टर—बुलढाणा यांस तीन महिन्या करितां तूर्त नेमून नंतर मि. हाफहाइड हे आपली रजा संपल्या नंतर रायपुराहून आकोल्यास येतील

---

### नोटीस

नोटीस राजमान्य राजश्री बळवंत व्यंकटेश पाठक हेड मास्तर मराठी शाळा बाभळी तालुक दर्यापूर जिल्हे इलिचपूर यांस खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आमचे दुकानची खातेबाकी तुमचे कडेस ऐन रुपये ४०२।-॥। चारशें दोन पावणे सहा आणे शिवाय सुरूं खाते पासून व्याज अशी रकम घेणें असून आपली बदली बाभळी येथें झाली त्या वेळीं व त्या नंतर दोन तीन वेळां येथें आपण आला होतां तेव्हा सदहू बाकीचा निकाल करण्या विषयीं आपणांस ह्मटलें असतां लवकरच हिशेब करून निकाल करितों असा आपण जबाब दिला पण अद्याप कांहींच तजवीज आपण केली नाहीं. करितां नोटीस देण्यांत येते कीं आज पासून १२ बारा दिवसांचे आंत आपण आमची रकम आपणा कडे घेणें निघत आहे ती चुकती करावी. आणि आमची पावती घ्यावी. तसें आपण न केल्यास आह्मास कोर्टमार्फत रकम वसूल करण्याची तजवीज करणें भाग पडेल व मग आपली कोणतीही खर्चाची वगैरे तक्रार ऐकिली जाणार नाहीं. हें आपणास कळावें तारीख २६ माहे दिसेंबर सन १८९४ इ०

( सही )

मोतीसिंग बिसनसिंग वहिवाटदार तुळशीराम बिसनसींग किराड साहू दुकान कसबे पथ्रोट तालुके व जिल्हे इलिचपूर दस्तूर खुद्द.

---

### NOTICE

It is hereby published for information that the Municipal Committee at Akola have with the sanction of the Deputy Commissioner set apart the following plots as burial and burning grounds within Municipal area Akalkote Survey field No. 4 acres 9 gunthas 13 have been set apart as burial ground for Mohamedans.

Shavanawaspur Survey field No. 21 5 gunthas with 29 gunthas from the river limit has been set apart as burning ground for Hindus.

| | |
|---|---|
| Sukapur S. field No. 10 | 4acres from each of the fields as burial ground for Hindus. |
| Shaaanawaspur S. field No. 21 | |

Tajnapur S. field No. 12—whole of the field as burial ground for Mohamedans.

Tajnapur S. field No. 13—5acres 24gunthas as burial grounds for Hindus and 8 acres 29 gunthas from the river limits as burning ground for Hindus.

Md. Husain
Secretary
Municipal Committee
Akola

---

## वर्तमानसार.

लार्ड हारीस साहेबांच्या स्मारकासंबधानें ' इंडिया ' पत्र ह्मणतें —या प्रमाणें याचवेळीं अशा प्रकारचें स्मारक करणाऱ्या खटपटा मंडळींचेंही जर स्मारक एकदम करण्यांत येईल, तर सरसकट पुतळे खरेदी करण्यास चांगली सवड सांपडून, किंमतींत स्वस्त, मेह नतींत थोडी आणि दिसण्यांत पुष्कळ अशी व्यवस्था लागून, स्मारकांचें खरें स्मारक होईल!

हिंदुस्थानांतील संस्थानांपैकीं ज्यांवर इंग्रज सरकार देखरेख करतें, तेथें वर्तमानपत्र काढण्यास परवानगी मिळत नाहीं ती मिळावी हा विषय येत्या कांग्रेसमध्यें कोणी एक काढणार आहे असें कळतें. वास्तविक प्रश्न मोठा विचारणीय आहे, व तेथेंच बंदी असेल तर मोठेंच आश्चर्य आहे.

निजाम सरकारच्या राज्यांत शिक्षणाची जास्त तजवीज करण्याबद्दल जारीनें विचार चालला आहे. होईल तेव्हां खरें.

बेळगांव जिल्ह्यांत चोऱ्या व दरोड्यांचा सुळसुळाट झाला आहे.

रोग हरकुंड — बंगाल प्रांतांत अलीपूर जिल्ह्यांत एक कुंड हल्लीं फार प्रसिद्धीस आलें आहे. त्यांत स्नान करण्यानें व त्यांतील माती अंगास लावल्यानें जलोदर, अर्धांगवायु वगैरे रोग नाहींसे होतात. असा बऱ्याच लोकांस अनुभव आल्याचें सांगतात.

एक यांत्रिक मनुष्य काळिकटकडे आला आहे. तो केळीच्या पानावर बसून, नावेप्रमाणें नदींतून पैलतीरावर जाऊं शकतो.

निजाम हैद्राबाद येथील रेसिडेंट मार्च पासून एक वर्षाच्या रजेवर जाणार. तेथें मि. ली वार्नर हे आपली वर्णी लावणार आहेत असें कळतें. मि. ली वार्नर यांना तें ठिकाण फायदेशीर होईल असें दिसतें कीं काय?

रंगून येथें धरणीकंपाचे आंचके बसल्यानें, सरकारी प्रेस, पब्लिक आफीसें, टौनहॉल, एक मशीद वगैरे इमारतींनां पुष्कळ धक्का बसला. शिवाय नुकसानही पुष्कळ झालें. कांहीं लोक गांव सोडून गेले व जात आहेत.

रेल्वे लाइनीवर होणाऱ्या खटल्याचा निकाल आह्मींच करणार असा ब्रिटिश गव्हरमेंन्टनें हट्ट धरल्यामुळें, गायकवाडी राज्यांत कांहीं नव्या रेल्वे लाइनी बांधण्याचें काम तहकूब राहिलें असें ह्मणतात.

आफ्रिका खंडांत हिंदुस्थानांतील देशी लोकांनीं वसाहत करण्यास जावें अशी चहूंकडून शिफारस होत आहे. पण हिंदुस्थानचे लोक इतके ऐदी झाले आहेत, कीं त्यांनां हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत थोड्या दूर सवडी आहेत तिकडेही पहावत नाहीं यामुळेंच खाण्याचे हाल भोगावे लागतात. हल्लींचा काळ आला आहे त्याला अनुसरून वागल्याशिवाय कसें चालेल!

आस्ट्रियाची राजधानी व्हायना व जर्मनीची राजधानी बर्लीन मधील ४१० मैलांच्या अंतरांत टेलिफोननें बोलण्याची व्यवस्था, चालू महिन्यापासून सुरू झाली. बोलणारास दर मिनिटास अदमासें १२ आणे पडतात.

पृथ्वींतील एकंदर सगळ्या भागांत पोष्टाचा व्यवहार सुयंत्र चालावा ह्मणून विचार चालू होता तो बहुशः पुरा होत आला आहे. तो ता. १ जानेवारी १८९५ पासून अमलांत येईल असें दिसतें. छापील कागदांनां व मनिआडरीनां यामुळें सर्व देशांत सारखा चालना मिळेल.

मादागास्करवर फ्रेंचांनीं स्वारी केली

आर्मीनियांत ख्रिस्ती लोकांवर झालेल्या जुलमाचा विचार करण्याबद्दल, इंग्लंड, फ्रान्स व रशिया या तिघांनीं मनावर घेतलें आहे. व त्यामुळें हीं राज्यें आतां एक दिलानें वागतील असें अधात्री तर्क होऊं लागले आहेत.

वझीरी व इंग्रज.

वानुरी व नीली या सरहद्दीवरील गांवामधील तार कोणी तोडली होती. ती दुरुस्त केल्यावर गेल्या मंगळवारीं पुन्हा कोणी तोडली होती. बहुशः हें वझीरी लोकांपैकींच कोणाचें कृत्य असावें असा तर्क आहे सर्व वझीरी लोक अद्याप समजावणवर येत नाहींत. कांहीं थोड्याशा लोकांनीं हिरावून नेलेल्या जिनसा परत केल्या, पण बहुसमाज विरुद्ध राहिला असल्यामुळें, मुल्ला पोविंदा व गैर लोकही विरुद्ध बाजूला राहिले आहेत असें कळतें. वझीरी लोकांविषयीं कांहीं जरूरीचें वर्णन कळलें आहे तें असें:—ते लोक पठाणी व कट्टे मुसलमान आहेत. हिंदुस्थानच्या वायव्येस शिरावनी पहाडांत हे लोक रहातात. तेथें अत्यंत खडकाळ असतो. तेच लोक त्या जागेंत राहू जाणत. काळ्या कटईचे तंबू हीं त्यांचीं घरें. वडारी लोकांसारखा यांचा सर्व प्रपंच घरांसुद्धां फिरतीवर असतो. पहाड, गुहा, जंगल अशा ठिकाणींच हे रहातात. जनावरांचें मांस व कांहीं कंदमुळें हें त्यांचें खाणें. ते रहातात तेथें त्यांना लोखंड पुष्कळ सांपडतें. तरवारी, ढाल, सुऱ्या, बंदुका वगैरे शस्त्रास्त्रें ते वापरतात. बंदुका, इंग्रज लोकांच्या चोरून नेलेल्या असतात. रीती भाती बहुतेक पाश्चिमात्यांच्या अर्धवटच तऱ्हेच्या आहत. शत्रूशिवाय हे कोणाला त्रास देत नाहींत. एखाद्या अपंगाला किंवा बिनमाहीतगाराला, हे लोक योग्य आदर करून त्यास सुखरूप पोंचवून देतात. त्यांच्याशीं वैर करणाराचा हरतऱ्हेनें सूड उगवितात.

स० वि०

म्हैसूर सरकारचा हत्ती पकडून विकण्याचा एक व्यापार असून तो बराच कायदेशीरही आहे. हल्लीं पकडलेल्या ४१ तरुण हत्तींचें तें सरकार लवकरच लिलाव करणार असून त्यांची किंमत ४९,३०० रुपये आहे!

इजिप्तच्या खेदीव राजाचा एक नातलग हिंदुस्थानांतल्या इंग्रजी पलटणींत नोकरीस रहाणार आहे.

सरहद्दीवरचें गिलजित ठिकाण काश्मीर सरकारच्या मालकीचें आहे. हल्लीं सरहद्दीच्या प्रकरणाच्या कारणानें त्या ठिकाणीं योग्य रीतीचा बंदोबस्त ठेवणें विशेष खर्चाचें झालें आहे. काश्मीर सरकारास त्या ठिकाणापासून जो फायदा आहे त्या पेक्षां खर्च जास्त असून त्या ठिकाणीं बंदोबस्त ठेवणें इंग्रज सरकारच्या हिताचें असल्यामुळें तें ठिकाण तुह्मी आपल्या ताब्यांत घ्या व या च्या खर्चाच्या त्रासांतून आह्मांस सोडा असें काश्मीरच्या महाराजांनीं इंग्रज सरकाराकडे बोलणें लावलें आहे असें ह्मणतात.

निजामाचे रिविन्यु कामदार नबाब फ्रामर्स जंग बाहादुर यांणीं फार जुन्या अशा हस्त लिखित लेखावरून बेदरचा एक चांगला इतिहास तयार केला आहे.

अफ्रीकेंत गेलेल्या फ्रेंच फौजेस हिंटर लांडच्या राजानें बराच ठोक देवून हाकून लावलें. फ्रेंचाकडचे ८ युरोपियन व पुष्कळ आफ्रीकन शिपाई ठार झाले.

ब्रह्मदेशापासून चीन पर्यंत तारायंत्र सुरू करण्याची पहाणी वगैरे सुरू झाली.

रेल्वे कंपनीचे मांजर—पुण्यांत रेल्वे कंपनीच्या टिकिटें विकण्याच्या ऑफिसांत एक पिवळसर रंगाचा बोका आहे. ऑफिसांत उंदराचा वगैरे उपद्रव होऊन कागदपत्राचा नाश होऊं नये ह्मणून हें मांजर दरमहा तीन रुपये खर्चून ठेविलें आहे. ऑफिसाची वगैरे तपासणी व पहाणी करण्यास जेव्हां रेल्वेचे अधिकारी येतात तेव्हां ऑफिसांतल्या इतर सामाना बरोबर हा बोकाही सुरक्षित असल्याचें त्या ऑफिसरास पाहून जावें लागतें.

म्हैसूर इलाख्यांत बंगलोर येथें एका गरीबाच्या आंगण्यांत मी येऊं का? असा आवाज होत असे. ये मी संभाळतों असा त्यास घरवाल्यानें एक दिवस जबाब दिला. जमीन वरून एक लोखंडी पेटी वर येऊं लागली. तीन चार फूट वर आल्यावर आतां मला काढा असा आंतून आवाज झाला. हें भूत असावें असें समजून कोणी हात लावीना. एक अवलीया पंचाक्षरी आला, पण तुझ्यानें कांहीं होणार नाहीं असा आंतून आवाज झाला. एकानें हिंमत करून पेटीवर पाहारीचा एक टोला मारला. त्याबरोबर पेटीस भोंक पडून त्यांतून सोन्याच्या दोन मोहोरा बाहेर आल्या व वर आलेली पेटी पुन्हा खालीं गेली. बाहेर आलेल्या मोहोरा प्रत्येकीं ४० रुपये प्रमाणें आहेत. त्या पडलेल्या भोंकांतून पाहिल्यास आंत मोहोरा आहेत असें दिसतें व सूर्याच्या किरणानें तर अगदीं साफ दिसतात. खालीं गेलल्या पेटीस वर काढण्याचा कोणाचा हिंय्या नाहीं. एका महान अवलीयास फार लांबून आणला व तो हात लावण्यास जातांच तुझ्यानें कांहीं होणार नाहीं असा आंतून आवाज झाला. अशी एक गोष्ट कर्नाटकांतल्या एका वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाली असून ती पेटी पाहाण्याकरतां मोठी यात्रा जमत असते असेंही त्यांत लिहिलें आहे.

ठा० अ०

योग्य सोय—मुंबई सरकारानें बंगाल सरकारचें अनुकरण करून सर्व लोकांस अतिस्वस्त दरानें कोयनेल मिळेल अशी व्यवस्था करण्याचें ठरविलें आहे. प्रत्येक पोस्ट आफिसांत, इस्पितळामध्यें व डिस्पेन्सरीमध्यें ५ ग्रेन किनाइनची पुडी एका पैशास मिळेल अशी व्यवस्था केली आहे.

शु० सू०

बेरड लोकांचा दंगा—बेळगांव जिल्ह्यांत बेरड लोकांनीं फार धुंडाई चालविली आहे. रस्त्यानें एकट्यानें जाण्याची सोय नाहीं, चोऱ्याचा तर धडाका चालला आहे. त्यांनीं १।२ पोलीस शिपाई ठार मारले. एका वाकिलास बेरडांनीं अडविलें होतें. एक नाक कान कापल्याचा खटला सेशनांत चालला आहेच. कोर्टांत कोणी कोणावर फिर्याद करण्याची सोय नाहीं. कारण द्वेषानें फिर्यादीचा सूड उगविण्यांत येतो. असें ह्मणतात कीं त्यांनीं एका पोलीस पाटलाचा खून करून त्यास जाळून ही टाकलें पण भीतीमुळें खून करणाराचें नांव कोणी घेत नाहीं. या लोकांचा पत्ता लागण्याकरितां हल्लीं स्पेशल पोलीस नेमिले आहे असें कळलें.

इं० प्र०

चतुर्भुज कन्या— कडापा ( मद्रास ) जिल्ह्यांत पाळपेंट येथें द्विमुखी व चतुर्भुजा अशी मुलगी एका मनुष्याला झाली होती, ती दोन दिवस जिवंत राहून तिसरे दिवशीं मरण पावली. या चतुर्भुज मुलीचें विलक्षण ध्यान पाहून घरांतील मनुष्यें भ्याली आणि त्यांणीं तिजकडे पहाण्याचें सोडलें, यामुळेंच ती कन्या कदाचित् मेली असेल.

साहेब मुसलमान झाले— सिल्हट येथील मुसलमान लोकांनीं एका उपदेशक युरोपियनाला मुसलमान धर्माची दीक्षा दिली.

मास्तरास दंड— गुजराथ म्युनिसिपालिटीच्या ताब्यांतील कांहीं मास्तरांनीं सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा हिंदुस्थानांत होण्याबद्दलचे अर्जावर सह्या केल्या ह्मणून त्याला दंड करण्यांत आला; तसेंच याच अर्जावर सह्या घेण्याचें काम जो मनुष्य करीत होता त्याला तेथून घालवून देण्याचा हुकूम डेपु० कमिशनरांनीं केला, असें लाहोर येथील ट्रायब्यून पत्रांत लिहिलें आहे.

चेष्टेचा परिणाम— ठाणें येथें ता० १६ रोजीं गोकूळ नांवाच्या एका परदेशी पोलिस शिपायानें पहाऱ्यावर असतां गोळ्या घालून, ५।६ इसमांस जखमी केलें. जखमी मनुष्य दवाखान्यांत नेले असून आरोपीला पकडला आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं ह्या शिपायाची चेष्टा करून त्याला त्रासविल्यामुळें त्याणें हें कर्म केलें असें सु. द. लिहितें आहे.

मोहीम झाली— वझिरी लोकांवर इंग्रज सरकारची फौज शेवटीं चाल करून गेली.

मुलत्पारांकरितां गाणें— असें ऐकतों कीं यंदाच्या राष्ट्रीयसभेस येणाऱ्या मुलत्पारांच्या मनोरंजनार्थ कांहीं मित्रमंडळीनीं गाणें तयार केलें आहे. हें गाणें रा० आनंदा चार्लू यांचे बंगल्यांत तारीख २६ रोजीं होणार. या गाण्यांतील मुख्य भाग एका निष्णात हिंदु स्त्री अप्सरे सारखें गाणें हा होय ज्यांनीं या बाईस गातांना ऐकिलें आहे ते तिला म्याडम प्याटीचा उपमा देतात.

वायव्य प्रांतांत गोवधाची बंदी करावी या बद्दल हिंदूंनीं, व मुसलमानांनीं हिंदु लोकांच्या लग्नाच्या वराती मोहरमांत काढूं न देण्याबद्दल, असे सरकाराकडे अर्ज केले होते; त्यांचा विचार करून बऱ्याच समदृष्टीनें ठराव हल्लीं सरकारानें केले आहेत असें हिंदु पेट्रिअटवरून समजतें: गोवध अगदीं बंद करून मुसलमानांस दुःख व्हावयाचें किंवा लग्नाच्या वराती वगैरे बंद करून हिंदूला दुखवावयाचें, असें करण्यास सरकार तयार नाहीं. मुसलमानांचा धर्माचार चालविण्यासाठीं नियमित गोवध नियमित स्थळीं अधिकाऱ्यांनीं करूं द्यावे; मात्र हिंदु लोकांस त्यापासून चीड येई असें न करूं देण्याची जबाबदारी सरकारी अंमलदारांवर आहे, तसेंच हिंदु लोकांच्या लग्नाच्या मिरवणुकी मोहरम असला तरी पूर्ववत काढूं द्याव्या; त्या बंद ठेवितां येत नाहीं असें सरकारानें ठरविलें आहे. अगदीं एक तर्फी वर्तन करणाऱ्या अंमलदारां पेक्षां ह्या ठरावांतील विचार बरेच युक्तीचे आहेत असें दिसतें.

स० शो०

---

☞ हें पत्र आकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे " वऱ्हाडसमाचार " छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.